
# माणूस

८ फेब्रुवारी १९६९ । चाळीस पैसे

‘एक नवा मोहन रानडे जन्माला येत आहे.’ मुंबई विमानतळावर वार्ताहरांना मुलाखत देताना रानडे म्हणाले. पण हे चित्र जुना मोहन रानडे यांचे आहे. १५ ऑगस्ट १९६६ ‘माणूस’ मुखपृष्ठ. या अंकाद्वारे मोहन रानडे यांच्या पराक्रमाची गाथा मराठी वाचकांना श्री. सुधीर फडके यांनी सादर केली होती. लेख लिहून, सभा घेऊन, दिल्ली–लंडन गाठून फडके यांनी केलेले अविरत प्रयत्न सर्वश्रुत आहेत. या यशस्वी प्रयत्नांबद्दल फडके यांचे अभिनंदन आणि मोहन रानडे यांचे सहर्ष स्वागत.
**— संपादक.**





समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : आठवे : अंक : सदतिसावा

वार्षिक वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे


स. न. जानेवारी, २६

ना. २५ च्या अंकातील शास्त्रज्ञांच्या निर्यातीबद्दलच्या मुलाखती वाचल्या. संयोजन आवडले. श्री. दत्तप्रसाद दाभोळकर अभिनंदनास पात्र आहेत.

माझे विचार मात्र असे आहेत. शास्त्रज्ञांची कायमची निर्यात, परकीय धान्याची आणि भांडवलाची आयात, विद्यार्थ्यांचा असंतोष, देशातील बेकारी आणि इतर अनेक प्रश्न हे निर्माण होण्याचे प्रमुख कारण एकच आहे. ते म्हणजे अर्थशास्त्रातील आपली उमेदवारी. विज्ञान आणि रसायनशास्त्र ह्या विषयांच्या संशोधनात भर घालणारे, मूलभूत संशोधन करणारे आपणाकडे थोडेसे लोक तरी आहेत. पण अर्थशास्त्रात मूलभूत संशोधन करण्याची आपल्याला कधी गरजच वाटलेली नाही. परकीय शास्त्रज्ञांनी 'अप्रगत देशांसाठी' म्हणून तयार केलेले सिद्धांत आपण जसेच्या तसे स्वीकारले, म्हणून ही आजची परिस्थिती उद्भवली आहे. खरे पाहता 'माणसाच्या इच्छा अमर्याद असतात' (Wants are unlimited) ह्या पायावर उभे असलेले संपूर्ण परकीय अर्थशास्त्र आपल्याला आपल्या परंपरेला धरून नाही. म्हणून मला असे वाटते


किंमत : ४० पैसे
१०२५ सदाशिव
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९



प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

की, हुशार संशोधकाची गरज आहे ती आपल्या अर्थशास्त्राला. नवीन अर्थशास्त्र नव्हे, जुनेच भारतीय अर्थशास्त्र पण नव्या विज्ञानाच्या जोडीला बसेल अशाप्रकारे मांडावयाला कुणीतरी पुढे यायला पाहिजे.

राष्ट्रवादी म्हणवणाऱ्या पक्षांची ही खरी जबाबदारी आहे. सावरकर आणि गांधी ह्या वरवर परस्परविरोधी दिसणाऱ्या व्यक्तींनी अनेकदा जे अर्थविषयक उल्लेख केले आहेत त्यांपासून आपणांला एकसंघ असे भारतीय अर्थशास्त्र तयार करायला कठीण जायचे नाही. 'मार्क्सचे सिद्धांत' हे विचार. त्यावर रशियन अर्थशास्त्रज्ञांचे सतत संशोधन चालूच होते आणि अजूनही त्याच विचारातून नवनवीन अर्थ परिस्थितिनुरूप निघताहेत. 'अंथरुण पाहून पाय पसरावे' ह्या आमच्या आजीच्या एका सूत्रात आपल्या देशाला आवश्यक असलेले सगळे तत्त्वज्ञान आले आहे असे मला वाटते. **अरविंद खानोलकर, मुंबई ९२**

**स. न.** **जानेवारी, २६**

नेहमीप्रमाणे दि. २६ जानेवारीचा 'माणूस'चा विशेषांक वाचला. गेल्या तीन अंकापासून प्रसिद्ध होत असलेला ॲड. माधव कानिटकर यांचा 'तो मी नव्हेच' हा लेखांक फारच सुरेख आहे. 'माणूस' इतका उच्च दर्जाचा अंक दुसरा कोणताच मी पाहिलेला नाही. परंतु काही वेळेस असा अंक निघतो की तो वाचल्यावर 'माणूस'ची पातळी कमी होत चालली आहे असे वाटते. सहसा ते न होईल याची दक्षता घ्यावी.

'भितीच्या तुंबड्या' हे सदर वाचनीय आहे. 'पिंड' ही कथा त्या मानाने छान आहे, हवा तसा रस यात नाही. पण तरीही वर्तकांचे अभिनंदन.

**दिनकर खोगरे, अंबेजोगाई.**

**स. न.** **जानेवारी, २६**

दिनांक २६ जानेवारीच्या अंकातील श्री. गो. बा. सावंत यांचे 'तो मी नव्हेच' या क्रिमिनल गोष्टीबद्दलचे पत्र वाचले. परंतु त्यांनी व्यक्त केलेल्या मताबद्दल, त्यांच्या वाचनाच्या दृष्टीबद्दल, कीव करावीशी वाटते. ते म्हणतात की, ता. ४ जानेवारीच्या अंकात श्री. माधव कानिटकरांनी सरदार लाभसिंगाची जयपालकौर ही चौथी व शेवटची मुलगी, आणि ता. ११ जानेवारीच्या अंकात जयपालकौरला पाचवी बहीण 'हरबीरकौर' दाखविली आहे हे कसे? सुंदर कथारचनेचा त्यामुळे विचका उडाला आहे, असे सावंतांचे म्हणणे आहे.

पण अमरसिंग बचावासाठी कोर्टासमोर जी कपोलकल्पित कहाणी सांगतो त्या कहाणीतील 'हरबीरकौर' हे पात्र आहे. ॲड. कानिटकरांच्या कथारचनेतील ते पात्र नव्हे. तेव्हा सावंतांच्या विधानाबद्दल वाटते की, त्यांनी जे काय मत व्यक्त करावयाचे होते ते विचार करून करायला हवे होते.

एकंदरीत या क्रिमिनल गोष्टीकडे लोकांचे लक्ष वेधले गेले आहे. 'माणूस'ला आणि ॲड. कानिटकरांना धन्यवाद. **प्रकाश देशपांडे, लातूर**

स. न. जानेवारी, २७

धन्यवाद ! 'डॉ. खोराना प्रकरणाच्या निमित्ताने' हा दत्तप्रसाद दाभोळकर यांचा अप्रतिम व विचारप्रवर्तक लेख वाचला. मनाला समाधान मिळाले. हा लेख नुसता वाचनीय नव्हे तर मननीय व चिंतनीय असा ठरला आहे. गेल्या ५ ते ६ अंकांत जे हे समाधान मिळत नव्हते, ते या अंकात मिळाले. 'माणूस' हा असाच असला पाहिजे. 'डॉक्टर'ची कथा फारच छान आहे. मला वाटते, आपल्या भारतातीलच नव्हे तर इतर देशांतीलसुद्धा अशा निवडक व अभ्यसनीय गोष्टी प्रसिद्ध कराव्यात. मानवी जीवनातील विविधतेचे दर्शन यातून उत्तम होते. कल्पनेपेक्षा सत्य हे कठोर असते हे मनाला पटते. मानवी जीवनातील रुक्ष सत्य कुठपर्यंत जाऊ शकते याची कल्पना आपणांस 'डॉक्टर' या कथेत सापडते.

'पिंड' ही कथासुद्धा मार्मिक व पटणारी अशीच आहे. त्यातील माणसे ही आपली आहेत ही भावना मनाला सुखप्रद वाटते. **वामन परब, सांताक्रुझ**

स. न. **जानेवारी, २८**

आपला २५ जानेवारीचा अंक अगदी संग्रही ठेवण्यासारखा आहे. डॉ. खोराना प्रकरणात घेतलेल्या मुलाखती म्हणजे सामाजिक, शैक्षणिक व राजकीय परिस्थितीला वाचा फोडण्यासारखेच आहे. असो. कित्येक महिन्यांत कविता आपल्या अंकात छापल्या जात नाहीत; कृपया एखादी तरी कविता छापणे इष्ट आहे.

**अं. म. मळेकर, पुणे २.**

स. न. **जानेवारी, २६**

२५ तारखेच्या 'माणूस'मधील 'डॉ. खोराना प्रकरणाच्या निमित्ताने' घेतलेल्या मुलाखती आताच वाचल्या आणि कळवल्यावाचून राहवेना ! खरोखर या मुलाखतींचे संयोजक श्री. दत्तप्रसाद दाभोळकर यांनी यामागे घेतलेले श्रम कित्येक शास्त्रज्ञांच्या अंतरात चालणाऱ्या घालमेलीला वेगळी दिशा दाखवतील.

**दिलीप परीख, मुंबई १९.**

**स. न.** **जानेवारी, २२**

आपला 'मार्ग' व नंतरचे 'अन्नस्वतंत्रता संचलन' हे दोन उपक्रम स्तुत्य आहेत. आजच्या तरुणांनी 'माणूस' वाचला तर त्यांना हरवलेले निश्चितच सापडल्यासारखे होईल. आपण अलीकडे सुरू केलेले 'मराठे' लिखित 'ट्रॅक्टर आणि बॉयलर' हे सदर फार माहितीपूर्ण आहे. **अशोक कोर्डे, फोंडा.**

**स. न.**

मागच्या अंकातील (१–२–६९) 'वर्धा साहित्य संमेलना'संबंधीच्या वृत्तांतात वर्ध्याचे विनोदी कवी 'बालकवी दे. गं. सोटे' यांचे नाव चुकून 'स्मेटे' असे छापले गेले आहे. वऱ्हाडातील 'घोटे' आणि 'स्मेटे' ही दोन्ही आडनावे तिकडे निरनिराळ्या कारणांमुळे प्रसिद्ध आहेत. **भीमराव कुलकर्णी, पुणे**

मुंबई समाचार

सु. ल. सोमण

# व्यर्थ न हो बलिदान !

जान पॉलाक, एमॅन्युल स्पको, कु. ब्लान्का नॅचॅझेलोव्हा आदी सात झेक तरुण-तरुणींनी रशियन आक्रमण, रशियनांचे झेकोस्लावाकियातले अस्तित्व, तिथल्या राजकारणावरचे दडपण इत्यादींच्या विरोधात अलीकडेच आत्मार्पण केले आणि जगाला पुन्हा एकदा हंबरडा फोडून सांगितले की, झेक प्रश्न मिटलेला नाही. झेक नागरिकांच्या स्वातंत्र्याला पायदळी तुडवले जात आहे ! किंबहुना, रशियासारख्या बलाढ्य राष्ट्राच्या पाशवी अत्याचारांविरुद्ध, दंडेलीविरुद्ध, साम्राज्यशाहीविरुद्ध झेक जनतेने एकाकीपणाने चालविलेल्या स्वातंत्र्ययुद्धाचाच हा एक भाग आहे ! दुर्दैव इतकेच की, व्हिएटनाम प्रश्नावर रण माजवणारे, राष्ट्राराष्ट्रांच्या सार्वभौमत्वाच्या तत्त्वाला मान द्यायचे घोष बडवणारे, लोकशाहीवादी राष्ट्रांचे पुढारी म्हणविणारे ब्रिटिश-अमेरिकन्स-वगैरे कुणी, कुणीसुद्धा झेक तरुणांच्या ह्या स्वातंत्र्ययुद्धाला सक्रिय पाठिंबा दर्शवीत नाहीत, देत नाहीत ! जागतिक लोकमताचा उत्स्फूर्त पाठिंबा ह्या स्वातंत्र्यलढ्याला मिळेल तेव्हाच रशियन साम्राज्यवाद्यांवर दडपण येईल व ह्या स्वातंत्र्यवाद्यांना विजय मिळू शकेल; पण जागतिक लोकमत-निदान विभिन्न राष्ट्रप्रमुख-आज ह्या मनःस्थितीत दिसत नाहीत. भारताने तर प्रत्यक्ष आक्रमणाच्या वेळीही रशियाविरोध ठामपणे दर्शविला नाही. खुद्द अमेरिकनांनीही ह्या वेळी रशियाला फारसा विरोध दर्शविला नाही, कारण अशा संघर्षातून जागतिक युद्धाला आमंत्रण देण्याचे धाडस कुणालाच परवडणारे नाही. जी गोष्ट झेक प्रकरणात अमेरिकेची तीच गोष्ट आपल्या साम्राज्याखाली आर्थिक, वैचारिकरीत्या छोट्या राष्ट्रांना जखडून टाकणाऱ्या अमेरिकेच्या विरोधात रशियाची ! मग, एखाद्या बलाढ्य राष्ट्राने छोट्या, दुर्बळ शेजाऱ्याचा घास गिळायचे ठरवले तर त्या छोट्या राष्ट्राचा त्राता कोण ? दोन मोठी राष्ट्रे प्रत्यक्ष संघर्ष टाळण्यासाठी समोरासमोर येऊन विरोध करणार नाहीत, अन्य राष्ट्रे त्यांच्या तालासुरावर त्यांच्या वर्तुळात फिरत राहणार, तर अलिप्त म्हणवणारी राष्ट्रे लांबून तमाशा पाहत राहणार किंवा सहानुभूतीचे उद्गार काढत बसणार ! मग ह्या छोट्या

राष्ट्रांचे भवितव्य काय ? की साम्राज्यशाहीच्या विळख्यात त्यांनी मान टाकून पडून राहायचे ? हंगेरी, पोलंड आज असेच पडले आहेत. झेकोस्लावाकियाचीही अशीच गत होणार का ? ह्या राष्ट्रांचा स्वतंत्र आवाज़ जर दडपला जाऊ दिला तर त्याचा अर्थ एवढाच होईल की, ब्रिटिश, फ्रेंच, नाझी साम्राज्ये ज्या स्वातंत्र्य-प्रिय मानवांनी मोडून तोडून टाकली, तो मानव पुन्हा एकदा रशिया–अमेरिकनांच्या राजकीय–आर्थिक साम्राज्यांच्या विळख्यात स्वतःचे स्वातंत्र्य हिरावून बसला ! पुन्हा एकदा सर्व स्वातंत्र्यप्रेमी, राष्ट्रवादी व्यक्तींना ह्या साम्राज्यांवर घाव घालायसाठी बद्धपरिकर व्हावे लागणार आहे !

गेल्या वर्षापर्यंत पदच्युत अध्यक्ष नोव्होट्नी ह्यांच्या नेतृत्वाखाली झेकोस्लाव्हाकिया रशियाचे अंकित राष्ट्रच होते. अध्यक्ष स्वोबोदा, पंतप्रधान चेर्निक, कम्युनिस्ट पार्टीचे सेक्रेटरी ड्युबचेक ह्या पुरोगामी नेतृत्वाखाली, नोव्होटनींच्या जुलमी राजवटीला झेक जनतेने रामराम ठोकला. स्वोबोदा, चेर्निक व ड्युबचेक हेदेखील कम्युनिस्टच, पण उदारमतवादी ! झेकोस्लाव्हाकियात कम्युनिझमच्या आर्थिक शिस्तीबरोबरच, लोकशाही स्वातंत्र्यही विकसित व्हावे ही त्यांची प्रामाणिक धारणा. त्यासाठी त्यांनी प्रयत्न केले, नवीन व्यक्तिस्वातंत्र्य झेक जनतेला बहाल केले. परंतु रशियन नेत्यांना ह्या सुधारणा मानवल्या नाहीत. झेकोस्लाव्हाकियातले हे व्यक्ति-स्वातंत्र्याचे लोण हळूहळू सर्वच कम्युनिस्ट जगात पसरेल आणि रशियाच्या आर्थिक-राजकीय साम्राज्यालाच त्यामुळे सुरुंग लागेल ही भीती रशियनांना वाटली. ह्या भीतीपायीच, एकीकडे वाटाघाटींचा देखावा निर्माण करीत असतानाच गेल्या ऑगस्ट-मध्ये रशियन व अन्य वॉर्सा राष्ट्रीय फौजा झेकोस्लाव्हाकियात घुसल्या आणि त्यांनी झेक व्यक्तिस्वातंत्र्याचा गळा घोटला. गेले सहा महिने झेक जनतेची स्वातंत्र्या-कांक्षा पार मिटवून टाकण्यासाठी रशिया व अन्य चार वॉर्सा राष्ट्रांच्या फौजा झेक भूमीवर पाय रोवून बसल्या आहेत, आणि त्यांनी झेक जनतेला शरण आणण्या-साठी कोणत्याही सूक्तामूक्त मार्गांचा अवलंब बाकी ठेवलेला नाही. स्वोबोदा, चेर्निक व ड्युबचेक हे अद्यापही अधिकारपदावर आहेत, पण त्यांना रशियन सैनिकांच्या पहाऱ्यात आपले शासन राबवावे लागते. परंतु ह्या सर्व प्रतिकूल परिस्थितीतही झेक जनतेचे स्वातंत्र्य-आंदोलन सुरूच आहे ! झेक कामगार, राष्ट्रीय उत्पादनावर परिणाम होऊ नये म्हणून संप वगैरेसारख्या प्रत्यक्ष कृतींत भाग घेत नाहीत पण विद्यार्थी, अन्य बुद्धिजीवी वर्ग ह्यांनी चळवळीची सूत्रे हाती घेतली आहेत; आणि त्यांना कामगारांचा पाठिंबा आहे !

ह्या स्वातंत्र्ययोद्धयांच्या मागण्या चार-पाच आहेत. सेन्सॉरशिप उठवली जावी. झेकोस्लाव्हाकिया व्यापून असलेल्या फौजांतर्फे चालवल्या जाणाऱ्या वृत्तपत्रांवर बंदी घातली जावी. सरकारी व कम्युनिस्ट पार्टीच्या अधिकारपदातील नेमणुका खुल्या निवडणुकांनी व्हाव्यात, कम्युनिस्ट पार्टीच्या मध्यवर्ती समितीची ताबडतोब बैठक

बोलावली जावी व रशियन फौजा काढून घेण्याबाबत बोलणी व्हावीत; आणि जनतेपुढे झेकोस्लाव्हाकियाच्या सध्याच्या आर्थिक परिस्थितीचे सत्य निवेदन केले जावे—ह्याच त्या स्वातंत्र्ययोद्धयांच्या मागण्या! सध्याच्या सरकारातले अनेक वरिष्ठ अधिकारी व कम्युनिस्ट पार्टीचे पदाधिकारी जनतेच्या ह्या मागण्यांबाबत सहमत आहेत, पण रशियन दडपणामुळे त्यांचा नाइलाज आहे. आणि अशा रीतीने सर्वच बाजूंनी निराश झालेल्या झेक तरुणांनी हा आत्मसमर्पणाचा मार्ग चोखाळला आहे. त्यामागे प्रखर राष्ट्रीयत्व आहे, महान त्याग आहे. जर्मन, ब्रिटिश साम्राज्ये दुर्दम्य स्वातंत्र्यप्रम व प्रखर राष्ट्रवाद ह्यांच्यापुढे धडाधड कोसळली आहेत. त्याचप्रमाणे त्यात्र स्वातंत्र्यलालसेतून ही आजची साम्राज्येही कोसळतील आणि ह्या सात झेक तरुणांचे बलिदान व्यर्थ ठरणार नाही अशी आशा बाळगावी का ?

झेक स्वातंत्र्यलढयातून भारतीय कम्युनिस्ट डावे आणि उजवे काही स्फूर्ती घेतील का ? तिथल्या तरुण-तरुणींच्या राष्ट्रार्थ बलिदानातून आजचा आमचा अंधःकारात चाचपडणारा, निष्कारण विध्वंस माजवणारा तरुण विद्यार्थी समाज काही बोध घेईल का ?

## वसंतरावांनी दंड थोपटले !

२३ जानेवारीला महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाच्या तेराव्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे सचिवालयात उद्‌घाटन करताना मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईकांनी सांगितले की, " महाराष्ट्राचा औद्योगिक विकास रोखण्याचा कोणत्याही गोटातून कसलाही प्रयत्न झाला तर त्याच्याशी मुकाबला केला जाईल." त्यांनी पुढे सांगितले की महाराष्ट्रात सहकारी क्षेत्रात उत्तम काम चालले आहे, त्याला रोखण्याचा अधिकार कोणालाही नाही...नियोजन हे समृद्धीसाठी हवे, टंचाईकरता नको. उत्पादकाला ज्या नियोजनात प्रोत्साहन मिळत नाही ते नियोजनच नव्हे....तुमचे तुम्ही भांडवल गोळा केलेत तर साखर कारखान्यांना आम्ही परवानगी देऊ असे नियोजनकारांनी सांगितले. आज आम्ही आमचे भांडवल गोळा करून कारखाने उभारायला परवानगी मागतो तर ती नाकारण्यात येत आहे. वास्तविक ह्या गोष्टीचा नियोजनकारांना अभिमान वाटला पाहिजे; पण ते आमच्या आडच येत आहेत...जे आड येत आहेत ते देशाच्या हिताच्या आड येत आहेत. त्यांना अधिकारावर राहण्याचा अधिकार नाही. ह्या प्रश्नावर संघर्ष व्हायचा असेल तर होऊ द्या. माझ्यात तेवढी ताकद आहे. "

मुख्यमंत्र्यांनी एवढे आव्हान द्यायला कारणही तसेच आहे. महाराष्ट्रात सध्याच्या पंचवीस साखर कारखान्यांशिवाय आणखी सोळा कारखाने उभारण्यासाठी परवानगी नियोजन मंडळाकडे महाराष्ट्र सरकारने मागितली होती. ह्यासाठी

इण्डस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशनतर्फे तीन चतुर्थांश कर्ज अशा कारखान्यांना मिळते ते मिळू शकणार नाही, ह्या सबबीखाली प्रथम महाराष्ट्राची ही मागणी फेटाळली गेली. ह्या कर्जाची व्यवस्था महाराष्ट्र सरकार करणार असेल तर हे परवाने मिळू शकतील असेही पुढे महाराष्ट्राला सांगण्यात आले. आता या कर्जाची सोय महाराष्ट्र सरकारने केली आहे व असे असताही महाराष्ट्र सरकारला आवश्यक ते परवाने देण्याचे नियोजन मंडळाने नाकारले आहे. श्री. वसंतरावांच्या चिडीमागची पार्श्वभूमी ही अशी आहे. नियोजन मंडळ महाराष्ट्राला परवाने न देण्याबाबत दोन कारणे पुढे करते. चौथ्या योजनेच्या अखेरीस देशात होणारा खप व निर्यातीचा अंदाज घेऊन नियोजन मंडळाने साखरेचे उत्पादन—लक्ष्य ठरवले आहे. त्यानुसार मोठ्या संख्येने साखर कारखाने उभारण्याची गरज नाही असे नियोजन मंडळाला वाटते. जे थोडेसेच कारखाने उभारावयाचे उद्दिष्ट नियोजन मंडळान आखले आहे, त्यांच्या-साठी विभिन्न राज्यांनी ह्या आधीच मागणी पुढे केली आहे. महाराष्ट्रात आधीच भरपूर कारखाने असल्याने, महाराष्ट्राला आणखी नवीन कारखान्यांचे परवाने दिले तर साखर व्यवसायातला समतोल ढळेल व अन्य राज्यांत असंतोष पसरेल असे नियोजन मंडळाला वाटते. ह्यावर साखरेच्या खपाचे व निर्यातीचे नियोजन-कारांचे अंदाज चुकीचे आहेत. उत्पादन आणखी जास्त हवे, आणि भारतात उसाची लागवड महाराष्ट्र, म्हैसूर, मद्रास व आंध्र ह्याच राज्यांत चांगल्या प्रकारे होऊ शकत असल्याने ह्या राज्यांची मागणी डावलून समतोल साधायचा प्रयत्न केल्यास अनैसर्गिक ठरेल असे महाराष्ट्राचे म्हणणे आहे. एका दृष्टीने पाहिल्यास हे खरेही आहे. उत्तर प्रदेश व अन्य राज्यांतून झालेले साखर कारखान्यांचे प्रयोग फसलेले आहेत व बरेचसे कारखाने अत्यंत कठीण परिस्थितीतून जात आहेत. उलट, महाराष्ट्रात साखर कारखान्यांनी निश्चित प्रगती साधलेली आहे!

महाराष्ट्रात दर एकरी अडीच क्विंटल धान्य पिकते तर त्याच एकरात अठरा क्विंटल साखर तयार होऊ शकते. बाहेरून भीक मागून आणण्यापेक्षा साखर निर्यात करून त्याबद्दल धान्य आणावे असे श्री. नाईक पुढे म्हणतात. श्री. नाईकांचा हा युक्तिवाद कितपत समर्थनीय आहे? सध्या जगात साखरेच्या उत्पादनाने कमाल मर्यादा गाठलेली आहे व जागतिक बाजारपेठातून साखरेचे भाव कमालीचे खाली आले आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या प्रेरणेने नुकताच एक आंतरराष्ट्रीय करार साखर व्यापाराबाबत घडवून आणला गेला आहे. त्यानुसार भारताला दरसाल तीन लाख टन साखरेची निर्यात करता येईल व तीही किलोमागे ६० ते ९० पैसे ह्या दराने. भारताने हे निर्यात उद्दिष्ट जवळजवळ गाठलेले आहे. अधिक निर्यात करायची झाल्यास, साहजिकच, याहूनही कमी भाव भारतीय साखरेला पडेल व हा भाव महाराष्ट्रातल्या कारखान्यांना परवडेल असे वाटत नाही. देशातही साखरेच्या खपात फार मोठी वाढ होत नाही आहे; किंबहुना गुळाचा खप साखरेच्या दुप्पट

आहे, व साखरेच्या वाढत्या उत्पन्नानेही साखरेच्या दिशेने उत्साहजनक वाढ होत नाही असे दिसून आलेले आहे. शिवाय श्री. नाईकांचे भांडण एवढ्यावरच थांबणार नाही. कारण ह्या सोळांव्यतिरिक्त आणखी शंभर एक सहकारी संस्था साखर उत्पादनाच्या उद्देशाने महाराष्ट्रात प्रस्थापित झाल्या आहेत व त्यांचे अर्ज सरकार-दरबारी पडून आहेत. ह्या अर्जांचे काय होणार ? एवढ्या प्रचंड साखर उत्पादनाचा ओघ श्री. नाईक कुणीकडे वळवणार ? एवढ्या प्रचंड साखर उत्पादनाची आवश्य-कता ते नियोजन मंडळाला पटवून देऊ शकतील का ? कारण ह्या प्रश्नांच्या उत्तरा-वरच ह्या नाईक–नियोजनमंडळ वादाचे भवितव्य अवलंबून आहे. ह्यापेक्षा शेती-मालावरील प्रक्रिया, खत निर्मिती आदी उद्योगांवर हे सहकारी भांडवल खर्ची करून साखर धंद्याबरोबरच अन्य शेती-धंद्यांच्या वाढीचेही धोरण महाराष्ट्र सरकार स्वीकारू शकणार नाही का ?

# त्रिवार वंदन तुला !

'मुंबई समाचार' लिहून संपवत असतानाच ही आनंददायक बातमी समजली— पोर्तुगालच्या तुरुंगातून गोमांतकातले स्वातंत्र्यवीर मोहन रानडे ह्यांची मुक्तता झाली ! एका राष्ट्रवादी, ध्येयवादी तरुणाच्या समर्पित जीवनाचा आलेख डोळ्यां-समोरून तरळून गेला आणि नकळतच मनाच्या गाभाऱ्यात सूर उमटले, "स्वातंत्र्य-वीरा, त्रिवार वंदन तुला !" बेथीमच्या पोलीस चौकीवरील हल्ल्यातील चकमकीत पोटावर गोळ्या झेलून भयंकर जखमी झालेल्या ह्या तरुणाने आपल्या सहकाऱ्यांना मिळालेल्या शस्त्रास्त्र लुटीसह दूर जायला सांगितले आणि स्वत: पोर्तुगिजांच्या निष्ठुर कारावासाला तो समोरा गेला ! असा हा बेदरकार स्वातंत्र्यसैनिक, स्वातंत्र्याची किंमत चुकवून लिस्बनला तेरा वर्षेपर्यंत प्रचंड हालअपेष्टा सोसून आपल्यात परतत आहे. राष्ट्रवाद्यांनो, लोकशाहीप्रेमी–स्वातंत्र्यप्रेमी नागरिकांनो, ह्या ध्येयवादी मोहन रानडेला मानाचा मुजरा द्या !

वास्तविक सात वर्षांपूर्वीच गोवा विमुक्त झाला. तेव्हा पोर्तुगीज कैद्यांच्या बदल्यात श्री. मोहन रानडे व श्री. मस्कारन्हेस यांची सुटका भारत सरकारला करवून घेता आली असती. पण ते घडले नाही. त्यानंतर अनेकांनी— विशेषत: श्री. रानडे यांचे मित्र व स्वातंत्र्यसैनिक संगीतश्री सुधीर फडके व पोर्तुगाल सरकारचा रोष पत्करूनही त्या देशात रानडेंचे वकीलपत्र स्वीकारणारे श्री. शंकर कामत ह्यांनी—असंख्य प्रयत्न केले. श्री. मोहन रानडेंच्या मातु:श्रींनी पोप पॉलनाही लिहून पाहिले. आज शेवटी सर्व प्रयत्नांना यश येऊन श्री. रानडेंची मुक्तता होत आहे व ही बातमी प्रजासत्ताकदिनी ऐकायला मिळत आहे ! खरो-खरच सुवर्णयोग !

श्री. मोहन रानडे सांगलीचे. जन्म २६ नोव्हेंबर १९२५ रोजी झालेला. सावई ह्या गोमांतकातील गावात ते प्राथमिक शिक्षक म्हणून काम करीत होते. तिथे असतानाच त्यांचा आझाद गोमांतक दलाशी संबंध आला व त्यांनी भूमिगत चळवळीत भाग घ्यायला सुरुवात केली. २ जुलै, १९५४ रोजी नगरहवेलीवर स्वातंत्र्यसैनिकांनी हल्ला चढवून राजधानी सिल्व्हासा सर केली. त्या मोहिमेत श्री. सुधीर फडक्यांबरोबर श्री. रानडेही होते. नंतर त्यांनी पुण्यात दौरा काढून गोवा मुक्तिसंग्रामासाठी निधी गोळा केला. ऑक्टोबर १९५५ मध्ये बेधीमवरील हल्ल्यात ते पकडले गेले. १९५९ साली त्यांची लिस्बनला रवानगी झाली. आणि आज ते परत येत आहेत.

ह्या ध्येयवादी राष्ट्रभक्तापुढे आजही खूपच कार्यक्रम आहेत. विशेषत: गोमांतकाची देशाशी तादात्म्यता निर्माण करणे आणि विध्वंसनाकडे निराशेने वळणाऱ्या तरुणाला राष्ट्रीयत्वाच्या गाड्याला जुंपणे! श्री. मोहन रानडे निष्क्रिय राहणे शक्य नाही आणि म्हणूनच, त्यांच्या भारतातील यापुढील वास्तव्यात त्यांच्याकडून ह्या अपेक्षा!

श्री. मोहन रानडे विमोचन समितीचेही कार्य अद्याप संपलेले नाही. श्री. मस्कारन्हेस ह्यांच्या सुटकेचेही जारीने प्रयत्न झाले पाहिजेत! ह्या दोन देशभक्ताशिवाय, गोमांतकीयांना त्यांचे स्वातंत्र्य नक्कीच अपूर्ण वाटत असणार!

O

मातांनो
आपले बाळ
निरोगी असावे
असे आपल्याला
वाटते ना ?
बाळाच्या
कोणत्याही तक्रारींवर
खालील ठिकाणी
वैद्यकीय सल्ला
मिळेल.

**न्यू इरा होमिओपॅथिक फार्मसी**

दादर रेल्वे स्टेशनसमोर,
(पश्चिम) मुंबई–२८

## मोहनाचा नवा खडा !

मोहनाने परवा पुण्यात नवा 'खडा' मारला. दिमतीला मोठ्या ताकदीची चार माणसे आणलेली होती. प्रा. प्रधान होते. कुणी अकोलकर होते. कथालेखक शंकरराव खरात होते. त्यांनी रा. स्व. संघाचे मा. स. गोळवलकर यांचा भयंकर निषेध केला. 'नवाकाळ' पत्राच्या प्रतिनिधीला दिलेल्या मुलाखतीत श्री. गोळवलकर म्हणाले,

"समाजात सहकारी पद्धती हवी; यामुळे सुख लाभेल. आपल्या धर्मातील वर्णाश्रम व्यवस्था ही सहकारी पद्धतच होय !"

यावर त्यांना प्रश्न विचारण्यात आला की वर्ण हा जन्माने प्राप्त होत असल्याने ही व्यवथा गैर नाही काय ? यावर श्री. गोळवलकर म्हणाले—

"जन्माने प्राप्त होणाऱ्या चातुर्वर्ण्यव्यवस्थेत गैर काही नाही. मात्र त्यात लवचिकपणा ठेवायला हवा व तसा तो होताही. लवचिकपणा ठेवून जन्मावर आधारलेली चातुर्वर्ण्यव्यवस्था उचितच आहे."

श्री. गोळवलकर यांची मुलाखत फार मोठी आहे. त्यात ब्राह्मणांना दोष दिलेला आहे. मंत्र्यांच्या विलासी जीवनावर टीका आहे; परंतु हा सर्व भाग महत्त्वाचा नाही. पुनर्जन्म व कर्मानुसार पुनर्जन्म हा सिद्धांत गृहीत धरून चातुर्वर्ण्याची ही जी तरफदारी श्री. गोळवलकर यांनी केली आहे त्यामुळे मोहन धारिया यांचा प्रक्षोभ झाला हे बरोबरच आहे. पात्रतेनुसार व आवडीनुसार कर्म निवडण्याचा हक्क लोकशाहीत असताना हे काय उफराटे बोलणे ? चातुर्वर्ण्य ही वाईट रूढी आहे म्हणा आणि त्याच्या विध्वंसनासाठी सिद्ध व्हा असे सांगणारे स्वातंत्र्यवीर सावरकर कुठे आणि कुठे हे तथाकथित गुरुजी ! आज विज्ञान काय सांगते ? कर्मानुसार पुनर्जन्माचा बाष्कळ सिद्धांत या विज्ञानयुगात सांगण्याचे धाष्टर्य या माणसाला होते तरी कसे ! एखाद्या पुरोगामी, सावरकरसंप्रदायाच्या व हिंदू

समाजाच्या हिताची काळजी वाहणाऱ्या विचारवंताने ज्या हिरीरीने श्री. गोळवलकर यांचा समाचार घ्यायला हवा त्याच हिरीरीने श्री. मोहन धारिया, प्रा. प्रधान व शंकरराव खरात हे श्री. गोळवलकर यांच्यावर तुटून पडले हे पाहून आमचा आनंद शिगेला पोचला आहे. केरळात होऊ घातलेले नवे 'पाकिस्तान' आणि यापुढील काही वर्षांत जन्माला येणारी अनेक 'पाकिस्ताने', या प्रश्नांपेक्षा श्री. गोळवलकर यांनी हिंदू समाजावर जे घोर संकट आणलेले आहे, त्याचा तातडीने समाचार घेण्यासाठी प्रा. प्रधान, खरात यांच्यासारखी विचारवंत मंडळी पुढे सरसावली हे पाहून आम्हांला धन्य धन्य वाटले.

या हिंदू मनावरील पाशवी अत्याचारातील एकच गुन्हेगार पुढे खेचून श्री. धारिया–प्रधान–खरात यांनी स्वस्थ मात्र बसू नये. श्री. गोळवलकर यांनीच आपल्या मुलाखतीत चातुर्वर्ण्यव्यवस्थेला महात्मा गांधींचा पुरस्कार होता असा उल्लेख केलेला आहे. महात्मा गांधींना चातुर्वर्ण्यव्यवस्था मान्य होती, हे जर खरे असेल तर या गुन्ह्याचा सर्वांत मोठा गुन्हेगार म्हणून महात्मा गांधींचा निषेध व्हायला हवा. गांधींचे सुज्ञ शिष्य विनोबा भावे यांनी १९३२ साली धुळे तुरुंगात गीता-प्रवचनाचे निमित्त करून हाच गुन्हा केलेला आहे. पूजनीय साने गुरुजी यांनी ही प्रवचने लिहून घेऊन ती प्रसिद्ध करण्याची संधी विनोबांना दिली याचीही दखल घेतली जावी. या प्रवचनांच्या भारतातील बारा भाषांतून १०,४६,५०० प्रती आतापर्यंत खपलेल्या आहेत. हे विष किती पसरले आहे हे लक्षात घ्यावे व विनोबा व साने गुरुजी या दोघांना याचा जाब विचारण्यात यावा. १४ व्या अध्यायावरील प्रवचनात विनोबा म्हणतात––

"चातुर्वर्ण्याची व्यवस्था मला गोड वाटते, याचे कारण तीत स्वाभाविकता आणि धर्म आहे. हा स्वधर्म टाकून चालणार नाही. जो धंदा पूर्वापार चालत आला आहे तो जर नीतिविरुद्ध नसेल तर तो करणे हा चातुर्वर्ण्याचा विशेष आहे. चातुर्वर्ण्य आज बिघडले आहे. परंतु त्याची घडी जर नीट बसवता आली तर फार सुंदर होणार आहे. हल्ली पहिली २५–३० वर्षे नवीन धंदा शिकण्यात जातात. हिंदूधर्माने एवढ्याचसाठी वर्णधर्माची युक्ती काढली."

ही व्यवस्था गोड वाटते काय ? पुनः चातुर्वर्ण्याची घडी नीट बसवली तर फार सुंदर होणार आहे काय ? काय सुंदर होणार आहे ! हिंदू धर्माची युक्ती आहे काय ! मोहनराव, गप्र, शंकरराव या लोकांची गय करू नका. गावोगावी सभा घ्या, ठिकठिकाणी 'गीता–प्रवचने' जाळा ! साने गुरुजींचा निषेध करा.

जेथे चातुर्वर्ण्य नाही ... तिथली व्यवस्था चांगलीच आहे ! परंतु विनोबा सांगतात––

"धुके सर्वत्रच असते. परंतु जवळचे दिसत नाही. जवळचे कोपऱ्यात बसते आणि लांबचे स्वप्नात दिसते. परंतु हा मोह आहे."

मोहना, हा मोह आहे का रे ? हा मोह नाही हे सांगणे हेच प्रधान कार्य आहे. याविरुद्ध शांकरी तांडव झाले पाहिजे.

महाराष्ट्रापुरते बोलायचे तर महाराष्ट्रीय संतांनी याच वर्णाश्रमव्यवस्थेचा पुरस्कार करून बहुत घोटाळा करून ठेवलेला आहे. श्री. गं. बा. सरदारांनी म्हटले आहे—

" मराठी संतांना आधुनिक अर्थाने धर्मसुधारक म्हणता येणार नाही. संतांचे सांस्कृतिक कार्य त्यांच्या काळात प्रभावी ठरले यात नवल नाही. पण इंग्रजी अमदानीत जेव्हा महाराष्ट्रात प्रबोधन सुरू झाले तेव्हा न्यायमूर्ती रानडे यांच्यासारख्या आधुनिक सुधारणावाद्यांच्या प्रवक्त्यानेही एकनाथ—तुकाराम आदी संतांच्या कार्यापासूनच स्फूर्ती घेतली. "

समाजजीवनाचे सातत्य भंगू न देता आणि परंपरेतील सत्वांश नष्ट होऊ न देता या संतांनीदेखील काही कार्य केले असे दिसते. " Think not that I have come to destroy the law. I have not come to destroy, but to fulfill—" असे म्हणणारा येशू ख्रिस्त हा या संतांचाच पाठीराखा. आमचे म्हणणे जुना मार्ग उद्ध्वस्त करण्याचा आवदेखील आणू नये याचा अर्थ काय ? प्रतिगामी कुठले !

खरी मानगड मात्र पुढेच आहे बरं मोहनराव ! चातुर्वर्ण्यव्यवस्थेत हरिजनांवर घनघोर अन्याय या पूर्वकाळात झालेला आहे. आता अस्पृश्यता ही कायद्यानेच नष्ट झाली आहे. व्यवहारातही प्रगल्भ मनात या अस्पृश्य भावनेला आता थारा नाही. आता हरिजनांचा प्रश्न शिल्लक आहे तो—हिंदुधर्मांतर्गत सर्व जाति—व्यवस्थाच उखडून टाकण्याचा—या दृष्टीने द्र. मु. कळघमच्या राज्यात ' सेल्फ रिस्पेक्ट ' संघटनेने



अशी मागणी केली आहे की, एकाच जातीत विवाह करण्यास कायद्याने बंदी करावी ! मोहनराव–शंकरराव, हा उपाय तुम्हांला कसा काय वाटतो ? ही लोकशाही आहे. मूठभर उच्च वर्णीयांना बोंबलत ठेवून, सर्व इतर वर्णांचे जर यावर एकमत झाले ना तर आपण असा कायदाच करून टाकू ! एकदा कायदा करून सगळ्या जाती मोडल्या की लो. टिळक, महात्मा गांधी, विनोबा, साने गुरुजी, गोळवलकर यांची 'सुंदर' स्वप्ने धुळीला मिळतील. वर्णाश्रमव्यवस्था चांगली म्हणता काय हरामखोरांनो !

मोहना, तू खडे मार की हे जाती-जमातीचे घडे फुटलेच म्हणून समज !

## उंदरांच्या देशात........!

उंदराच्या एका जोडप्याला एका वर्षात १,००,००० किंवा अधिक पोरे होतात. होतात नाही झाली. अशी सहा हजार जोडपी धुळे जिल्ह्यातील नवापूर गावात सुखाने नांदत होती. म्हणजे वर्षात किती उंदीर झाले ? सहा हजार गुणिले एक लाख या संख्येत पुन्हा नवविवाहित जोडपीही. जोडपी पुन्हा वर्षाला लाखाचे धनी. प्रकरण कॉम्प्यूटरच्या आवाक्याबाहेर गेले. गावकरी त्रस्त झाले. धान्याच्या कोठारातून, रचलेल्या धान्यांच्या पोत्यांवरून, घरात माळ्यावरून, घरांच्या पाख्या-पाख्यांवरून आपले उंदीर दिवसाउजेडीही धावतायत. घरात लोकांची चीजवस्तू कुठेही असो, उंदरांनी फडशा पाडलाच. लाल त्रिकोणांच्या पाट्यांवर चढून उंदरांची पोरे शिवाशिवी खेळत. रात्री 'साधने' देखील फस्त करीत. सरकारने फुकट वाटायची आणि उंदरांनी ती कुरतडायची, असा प्रकार सुरू झाला. म्हणजे मुलांच्या सहज दृष्टीस पडू नयेत, अशा व्यवस्थित ठेवलेल्या गोष्टीही, उंदरांनी ताव मारण्यासाठी शोधून काढल्या; यावरून, घरातल्या मुलांच्या दृष्टीस पडणाऱ्या भाजीपाला, धान्यधुन्य, कपडे, पुस्तके या गोष्टींचा तर उंदरांनी फडशाच पाडला हे सांगणे नकोच.

ग्रामपंचायतीने पिंजरे लावले. काही पाच-पन्नास उंदीर सापडत. परंतु रोज दहा हजार जन्माला येणार आणि त्यातले पन्नास सापडणार ! ग्रामपंचायतीचा पिंजऱ्यावरचा विश्वास उडाला. उंदीर तरी पिंजऱ्यातले खोबरे खायला कशाला येतील ? ज्यांना बाहेर कर्तृत्व दाखवता येत नाही ते पिंजऱ्यात येतात. बाहेर शेते होती, धान्याच्या वखारी होत्या, ठिकठिकाणी घराघरातून साठवलेले धान्य होते–दिवसभर खच्चून पोटे भरली की रात्री उंदीर आपले झोपून राहू लागले. एखादा चुकलामाकला पिंजऱ्यात यायचा. लाचलुचपतीच्या कायद्यात जसा एखादा चतुर्थ श्रेणीतलाच सरकारी नोकर फक्त सापडतो तसा ! पंचक्रोशीत गणपती रोज वाहन बदलू लागले. आजचा उंदीर उद्या नाही. नवापूर गावात पंधरा हजार लोकवस्ती. दोन हजार घरे. उंदीर मात्र पंधरा-सोळा लाख.

ग्रामपंचायतीची सभा भरे. रोज अजंडा एकच, उंदरांचा प्रश्न ! रोज चर्चा. प्रश्न फक्त पुढच्या बैठकीवर ढकलण्यात येई, कारण कुणाला काही सुचले नाही, की प्रश्न पुढे ढकलतात असे दिल्लीला जाऊन आलेला एक ग्रामपंचायतीचा सभासद नेहमी सांगत असे.

दिवस असेच जात होते. एक दिवशी जॉन बायने नावाचा एक अमेरिकन तरुण अचानक नवापुरात आला. अमेरिकेत, या आयुष्याचे काय करावे याचा त्याला प्रश्न पडला होता. तिथे संपत्तीचा घूर होता. सेवा तरी कुणाची करायची ? सेवा करायला आसपासचे लोक अज्ञानी, मूर्ख आणि आळशी असावे लागतात. मग सेवाधर्म रंगू लागतो. ' अमेरिकन पीस कोअर ' या संस्थेने जॉन बायनेला सांगितले—" तू भारतात जातोस का ? तिथे सेवेला फार संधी असते. तुझ्या जीवनाला अर्थ येईल. तिथल्या लोकांना ठिकठिकाणच्या मिशनऱ्यांकडून सेवा करून घ्यायला फार आवडते. सरकारला तर परके लोक फारच आवडतात. तिथली वृत्तपत्रे अग्रलेख लिहितात-- ' मिशनऱ्यांचे वावडे का ? ' तेव्हा तू भारतात जा. नवापूर म्हणून गाव आहे. तिथे उंदीर माजले आहेत. ग्रामपंचायतीची पंचाईत झाली आहे. नुसते उंदीर कसे मारायचे, हे त्यांना शिकवलेस तरी वर्षभर काम आहे ! "

जॉन बायने असा भारतात आला होता. नवापुरात फेरी मारताच त्याच्या लक्षात आले की परिस्थिती कठीण आहे. कारण फक्त पिंजरे लावून उंदीर मारणे यापलीकडे काही करावे असे लोकांना वाटत नाही. उंदीर मारण्याकरिता दिडकी खर्च करण्याची कल्पना त्यांना सहन होत नाही. उंदीर मारण्यात खर्च केलेला एक रुपया, शेकडो रुपयांचे धान्य वाचवतो हे यांना पटत नाही. दोन गोष्टी करायला हव्यात....उंदीर रासायनिक विषाने मारता येतात हे यांना पटवायचे आणि मुख्य म्हणजे थोडे हातपाय हालवले तर निदान उंदीर मारता येतात असा लोकांचा आत्मविश्वास वाढवायचा !"

जॉन ग्रामपंचायतीत गेला. कचेरीत उपसरपंच विपिन चोखावाला म्हणून होते. गोरा माणूस आल्याबरोबर सरपंच अदबीने पुढे झाले.

" का येणे केले ?"

" मी अमेरिकेतून इथले उंदीर मारायला आलोय...मी उंदीर-हत्या स्पेशालिस्ट आहे...."

सरपंचांनी पंचायतीच्या सभासदांना सभागृहात धरून आणले...

" उंदीर मारणारा थोर अमेरिकन पुरुष आलाय. चला...चला..."

सगळे धावत आले. म्हणाले—" बायनेसाहेब, काहीही करा पण सोडवा या त्रासातून ! अमेरिकेत जसा काळ्यांचा प्रश्न आहे आणि इथेही या ' काळ्यां 'चा प्रश्न आहे. दोन्ही गंभीर आहेत...."

जॉनचे सगळे ऐकू लागले. त्याने एक विभाग निवडला. २,००० रुपये ग्राम-

पंचायतीने उंदीर हत्या–रसायनासाठी मंजूर केले. साहेब म्हणाला–

"आणखी २०० रुपये द्या! जाहिरात करावी लागेल. 'आम्ही उंदीर मारीत आहोत...'"

ग्रामपंचायतीत खडाजंगी झाली. उंदीर मारा पण हे २०० रुपये उगाच खर्च आहे. बायनेने समजूत घातली. हे लोकशिक्षण आहे. तूर्त तुम्ही खर्च करा. मी अमेरिकेत गेलो की ' नवापूर रॅट रिलीफ फंड ' उभा करीन. एका सभासदाने विचारले–" फंडात किती पैसे जमवू शकाल ?"

बायनेने आकडा सांगताच त्या सभासदाला मूर्च्छा आली. ' सरपंच ' करू म्हणताच तो ताडकन उठून बसला.

विषाचे फवारे मारलेले तेरा मण धान्य विवक्षित विभागात पसरण्यात आले. तीन महिन्यांत ४८००० उंदीर खलास झाले! प्रयोग यशस्वी झाला. चोखावालाने जॉनला मिठी मारली–

" कमाल आहे बुवा तुमची !"

गृहिणी खूप झाल्या. उंदीर दिसेनासे होऊ लागले. वीण थांबली. उंदराचा हा 'जॉन त्रिकोण ' अमेरिकेतून अचानक आला, यामुळे नवापूरवासियांनी त्याला शतशः धन्यवाद दिले. ग्रामपंचायतीच्या अजंडयावरील वर्षानुवर्षे खितपत पडलेला प्रश्न निकालात निघाला.

अमेरिकेच्या प्रयत्नाने व मदतीने नवापूरमधील नागरिकांचा उंदीर मारण्याचा आत्मविश्वास आता इतका वाढला आहे की विचारू नका! भारतातील ज्या ज्या खेडयांत उंदरांचा त्रास असेल त्यांनी ' अमेरिकन पीस कोअर 'ची मदत घ्यावी. सगळी धडपड त्यांची माणसे करतात. आपली बुद्धी न चालवता व पोटातले पाणी फारसे न हलता उंदीर मरू लागतात. शिवाय ' रॅट रिलीफ फाउंडेशन ' पैसेही कमी पडू देणार नाही.

' अमेरिकन पीस कोअर 'चे स्वयंसेवक भारतातील खेडयांपाडयातून असा आत्मविश्वास जागृत करतील, तर भारताचा उद्धार तर होईलच, परंतु अमेरिकन तरुणांपुढचा–" या आयुष्याचे काय करावे ?" हा प्रश्नही सुटेल. ' पीस कोअर ' चिरायु होवो.

ॐ शांतिः शांतिः शांतिः!

**– ग्यानबा**



ट्रॅक्टर आणि बॉयलर
चंद्रशेखर मराठे

# कापूस उत्पादनवाढीची समस्या

कापसाचे पीक आपल्या व्यापारी पिकापैकी सर्वांत प्रमुख आहे. देशातील सर्व राज्यांत मिळून ८० लाख हेक्टर जमीन या पिकाखाली असून वार्षिक उत्पादन ५५ लाख गासड्या आहे. कापसाच्या निर्यातीपासून आपणांस वर्षाला १२० कोटी रुपयांचे परकीय चलन मिळते. देशातील सर्वांत मोठा व जुना धंदा कापडधंदा कापसाच्या पिकावर अवलंबून आहे. गेल्या सतरा वर्षांत कापसाच्या उत्पादनात दुप्पट वाढ झाली आहे. १९५०–५१ मध्ये कापसाचे उत्पादन २८·६४ लाख होते ते १९६७–६८ साली ५५·६२ लाख गासड्या झाले. त्याचप्रमाणे कापसाचे सरासरी उत्पादन दर हेक्टरला १९५०–५१ मध्ये ८७ किलो होते ते १९६७–६८ मध्ये १२४ किलो झाले म्हणजे सुमारे ४३ टक्के वाढ झाली.

तरीसुद्धा जागतिक उत्पादकतेच्या संदर्भात भारतीय कापूस लागवडीची उत्पादकता फारच कमी भरते. एक गासडी कापूस पिकवण्यासाठी आपणांस दीड हेक्टर जमीन लागते तर रशियात एवढाच कापूस पिकवण्यास ¼ हेक्टर व अमेरिकेत ⅖ हेक्टर जमीन लागते. आपल्या कापूसलागवडीची उत्पादकता कमी असण्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे दिसतात :

१. भारतातील कापसाखालील क्षेत्रापैकी सुमारे ८४ टक्के क्षेत्र पावसावर अवलंबून असून या क्षेत्रास हमखास पाणीपुरवठ्याची सोय नाही. पावसाच्या अनिश्चितपणामुळ कापसाचे पीक कमीजास्त येते.

२. आपल्या कापूसलागवडीस खताचा पुरेसा पुरवठा होत नाही. जे काही खत उपलब्ध आहे, ते सर्व साहजिकच अन्नपिकांवर खर्च होते. अलीकडे कापसासाठी काही खते उपलब्ध होत असून ओलिताखालील कापूसक्षेत्राच्या उत्पादनात वाढ झाली आहे.

३. १९६२–६३ पर्यंत कापसाच्या बाबतीत पीक-संरक्षक उपाययोजनांचा अभावच होता. तदनंतर यासंबंधीचा व्यापक कार्यक्रम हाती घेण्यात आला तरी तोही पुरा पडत नाही. १९६७–६८ मध्ये १० लाख हेक्टर कापूसक्षेत्रापैकी केवळ २३ लाख हेक्टर कापूसक्षेत्रावर पीक–संरक्षक उपाययोजना करण्यात आल्या, असा अंदाज आहे. म्हणजे अद्यापि तीन चतुर्थांश पिकाला नाना तऱ्हेचे रोग व कीड यांस तोंड द्यावे लागतेच. एवढ्या मोठ्या पीक-क्षेत्रास हाताने वा जुजबी अवजारांनी जंतुनाशके पुरविणे केवळ अशक्य असून हवेतून फवारे मारण्याचीच सोय व्हावयास पाहिजे. सर्व प्रयत्न करूनही केवळ १ लाख हेक्टर जमिनीसच हवेतून जंतुनाशके पुरविता येतात.

४. आपली कापूसलागवड पाश्चात्य देशांप्रमाणे यंत्रसामग्रीच्या साहाय्याने (मेकॅनाईज्ड) होत नाही. तिकडे फार व्यापक क्षेत्रात कापसाची लागवड एकेका

दिवसात होऊ शकते. आपणांकडे लागवडीची प्रक्रिया बरेच दिवस चालत असल्याने जमिनीचा दमटपणा कमीजास्त होऊन पिकाच्या वाढीवर त्याचा परिणाम होतो. यंत्रसामग्रीच्या साहाय्याने खते व जंतुनाशके यांचा वापरही त्वरित करता येतो.

पाणीपुरवठ्याची हुकमी सोय असलेल्या कापूसक्षेत्रावर लक्ष केंद्रित करून आपण कापसाचे उत्पादन वाढवू शकू, पण कापूस उत्पादनात काही निश्चिती आणावयाची असेल तर आपणांस पावसावर अवलंबून असलेल्या कापूस-क्षेत्राकडेही कसून लक्ष द्यावयास हवे. ही गोष्ट इतरही पिकांबाबत खरी आहे. पाऊस पुरेसा पडूनही आपण जमिनीतील ओल टिकविण्याबाबत पुरेशी दक्षता घेत नसल्याने कापूस पिकाची फार हानी होत आहे. महाराष्ट्र, मध्यप्रदेश व म्हैसूर या प्रदेशांत सरासरी ६० ते १२५ सेंटीमिटर पाऊस पडूनही कापसाचे सरासरी उत्पादन कमी आहे याचे कारण हेच !

जमिनीत ओल जास्त असेल तर तिचा कापसाच्या पिकावर अनिष्ट परिणाम होतो. तसेच तिचे प्रमाण फार कमी झाले तरीही पिकाची हानी होते. त्यामुळे पाऊस जोरदार व सतत पडत असताना शेतातील पाणी काढून टाकणे आवश्यक आहे व पाऊस नसताना जमिनीतील ओल टिकविणेही महत्त्वाचे आहे. या मूलभूत बाबीकडे दुर्लक्ष झाले तर खते, जंतुनाशके वापरूनदेखील उत्पादन वाढणे शक्य नाही.

१९६२–६३ पासून कापसास पॅकेज योजना लागू झाली. या योजनेच्या अंतर्गत या कामास आवश्यक त्या सेवकवर्गाचा निम्मा खर्च करण्याचे भारत सरकारने ठरविले. त्याचप्रमाणे जंतुनाशके व त्यास आवश्यक अशी अवजारे यांच्या खर्चाच्या पाव रक्कम सबसिडी म्हणून देण्याचेही मान्य केले. चार वर्षांच्या अनुभवानंतर असे दिसून आले की राज्यांच्या खर्चात अचानक कपात वगैरे होते व तिचा या कार्यक्रमावर अनिष्ट परिणाम होतो. हे टाळण्याकरिता १९६६–६७ पासून केंद्रपुरस्कृत कापूस उत्पादनवाढ पॅकेज योजना तयार करण्यात आली व ही बियाणे शेतकऱ्यांस वाटण्यात आली.

जंतुनाशकांचे महत्त्व शेतकऱ्यांस पटावे यासाठी १९६७–६८ व १९६८–६९ या दोन वर्षांत निरनिराळ्या राज्यांत मिळून ५० एकरांचा एक असे २०० प्रात्यक्षिक प्लॉट तयार करण्यात आले. याचा सर्व खर्च भारत सरकारने केला. या उपाययोजनांचे यश काही उदाहरणांवरून स्पष्ट होते. मद्रास राज्यातील १४०० हेक्टरच्या पॅकेज योजनेमध्ये दर हेक्टरला २३३४ किलो कपास उत्पादन झाले. योजनेच्या बाहेरच्या क्षेत्रात हे प्रमाण केवळ १२४१ किलो होते.

१९७३–७४ अखेरपर्यंत कापसाचे वार्षिक उत्पादन ८१ लाख गासड्यांपर्यंत वाढविण्याचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट साध्य होण्यावर भारतीय कापडधंद्याचे भवितव्य अवलंबून आहे. कारण कापसाच्या चढत्या भावाने हा धंदा डबघाईला आला आहे. कापूस-उत्पादनाचे महत्त्व लक्षात घेऊन कापडधंद्यानेही या मोहिमेस सर्व साहाय्य करणे जरूर आहे. ○

# भारतीय एकात्मतेचा गणवेष

दि. के. बेडेकर

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते श्रीगुरुजी यांनी 'नवाकाळ'च्या संपादकांना नुकतीच एक मुलाखत दिली. 'तरुण भारत' (पुणे)च्या जानेवारी ३ व ४ च्या अंकात ती समग्र छापलेली आहे. संघाच्या कार्यकर्त्यांनी व इतरांनीही भारतीय एकात्मता व राष्ट्रहित साधण्याच्या दृष्टीने आपल्या प्रमेयांचा विचार करावा, हीच श्रीगुरुजींची इच्छा मुलाखतीमध्ये आहे. म्हणून त्यांपैकी काही प्रमेयांसंबंधी मी पुढील विचार वाचकांपुढे मांडीत आहे–

प्रथम एक गोष्ट स्पष्ट करावयास हवी. भारतामध्ये विविध धर्मपंथ, भाषासमूह आणि आर्थिक वर्ग आज नांदत आहेत. या सर्वांनी राष्ट्रहिताच्या दृष्टीने वागले पाहिजे, स्पर्धा व फुटीरपणा करू नये, स्वार्थांधतेने वागू नये; नाहीतर पेशवाईच्या अंताच्या वेळी झालेल्या लज्जास्पद प्रकाराची पुनरावृत्ती होईल, आणि देशावर परकीयांची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हुकूमत लादली जाईल. हा धोका टाळण्यासाठी भारतीय एकात्मता साधली पाहिजे, ही माझी श्रद्धा आहे. ही एकात्मता कशी साधावयाची, हाच खरा यक्षप्रश्न आहे.

श्रीगुरुजींनी असे सुचविले आहे की अहिंदू समूहांनी हिंदू व्हावे, हिंदू समाजधारणेसाठी चातुर्वर्ण्यव्यवस्था बळकट करावी, हिंदू धर्माची मूलतत्त्वे अद्ययावत विज्ञानाशी सुसंगत व बुद्धिनिष्ठ आहेत हे शंकराचार्यांनी सर्वांना सांगावे, आणि एकंदर सर्वच समाजव्यवहार सैनिकी शिस्तीने नागरिकांनी पार पाडावेत. हे करीत असताना ते अनासक्तीने पार पाडावे, म्हणजे श्रमाचा अमूक मोबदला मिळावा अशी भावना ठेवू नये. स्पर्धेच्या व स्वार्थाच्या जागी सहकाराची व त्यागाची भावना यावी, हे सर्वांना मान्यच होईल; पण सहकारामध्ये सैनिकी शिस्तीची व अनासक्तीची गरज आहे, ही गोष्ट श्रीगुरुजींच्या प्रतिपादनात विशेष भर देऊन सांगितलेली आहे.

हिंदु धर्माची मूलतत्त्वे विज्ञानसंगत व बुद्धिनिष्ठ आहेत, या प्रमेयाला वरील एकंदर मांडणीत महत्त्व आहे. ख्रिश्चन, मुसलमान, बौद्ध इत्यादी धर्मपंथांची मूलतत्त्वे विज्ञानाशी विसंगत आहेत व बुद्धिनिष्ठ नाहीत; उलट, हिंदू धर्माची मूल-

तत्त्वे विज्ञानाला व बुद्धिवादाला सुसंगत आहेत, असे खरोखर आहे का ? तसे असले तरी मग हिंदुधर्मप्रणीत समाजधारणेची तत्त्वे व धर्मरूढी एकात्मता साधे शकतील व भारताची भावी समृद्ध रचना करू शकतील का ?

## धर्मतत्त्वे आणि विज्ञानाची बदलती प्रमेयें

वस्तुत:, हिंदू धर्माची मूलतत्त्वे शाश्वत आहेत असे स्वत: श्रीगुरुजींनी मांडलेले आहे, आणि या तत्त्वांमध्ये " बदल पत्करणे " शक्य नाही असेही म्हटले आहे. उलट, विज्ञानाच्या बाबतीत उघडपणे असे आहे, की वैज्ञानिकांची प्रमेये सारखी बदलत आली आहेत व नवी प्रमेये सतत निर्माण झाली आहेत. वैज्ञानिक प्रमेयांची सत्यासत्यता ऐंद्रिय निरीक्षणाने व प्रयोगाने पडताळून घेतली जाते. तेव्हा, वैज्ञानिक प्रमेयांशी शाश्वत व अतींद्रिय दृष्टीने सिद्ध असलेली धर्माची मूलतत्त्वे सुसंगत असणार कशी ?

श्रीगुरुजींनी दिलेले उदाहरणच येथे तपासून पाहू. हिंदधर्मपरंपरेमध्ये विश्व ईश्वरनिर्मित मानले आहे. पण असे निर्मित विश्व मग अनादी कसे असेल ? आपल्या परंपरेत प्रकृती ही अनादी व त्रिगुणात्मक मानलेली आहे; पण ही प्रकृती ' मंडलाकार ' मानलेली नाही. श्रीगुरुजींनी येथे बिचाऱ्या आईन्स्टाइनला वेठीस धरले आहे. त्याच्या सापेक्षता सिद्धान्ताचा ईश्वरनिर्मित विश्वाशी किंवा त्रिगुणात्मक प्रकृतीशी काही संबंध नाही व या धर्मतत्त्वांना त्याच्या मताचा पाठिंबा आहे, असे सुतराम मानता येत नाही.

ईश्वरनिर्मित चातुर्वर्ण्याला बुद्धिनिष्ठेचा व विज्ञानाचा आधार आहे असे दाखविण्याच्या प्रयत्नात श्रीगुरुजींनी म्हटले आहे की, शिल्पशास्त्राने दगडांच्या चार जाती मानल्या आहेत व प्राणिशास्त्राने प्रत्येक प्राण्याच्या चार जाती मानल्या आहेत. पण हा सारा प्रयत्नच मुळात गैर आहे. धर्मतत्त्वे आणि पावित्र्याच्या कल्पना यांना पाठिंबा देण्यास विज्ञान असमर्थ आहे व या बाबी बुद्धीच्या पलीकडच्या आहेत. इतरही अनेक गोष्टी बुद्धीच्या क्षेत्रातल्या नाहीत. त्यांना बळेच बुद्धीचा आधार देऊ पाहणे शक्य नाही व इष्टही नाही. साधे कुटुंबातील आदराचे व प्रेमाचे संबंध घ्या, किंवा नैतिकतेची प्रेरणा घ्या. माणसाने माणुसकीने व समतेच्या बुद्धीने वागावे, खोटे बोलू नये, या गोष्टी विज्ञानाच्या किंवा तर्काच्या आधाराने सिद्ध कशा होणार? कैलासलेणे सुंदर आहे हे बुद्धीने जाणता कसे येईल ? सारांश, बुद्धीची व विज्ञानाची मर्यादा ओळखून श्रद्धेच्या क्षेत्रात यांचा वरचष्मा, हस्तक्षेपही, मान्य करता उपयोगी नाही.

मग हा प्रयत्न श्रीगुरुजींनी केला आहे तो का ? याचे कारण असे दिसते की, शिकलेल्या तरुण माणसांना धर्मश्रद्धा स्वीकारण्यात संकोच वाटू नये. हा संकोच विज्ञानामुळे व बुद्धीमुळे वाटतो तसे होऊ नये, अशी श्रीगुरुजींची इच्छा असावी. पण येथे निदान चुकीचे आहे व चिकित्साही म्हणून चुकीची आहे. चातुर्वर्ण्यासारखी

धर्मरूढी स्वीकारण्याला तरुण तयार होत नाही तो समतेच्या व माणुसकीच्या श्रद्धेमुळे होत नाही. ख्रिस्ती व महंमदी धर्मसंस्थेवर आघात झाले ते समतेच्या श्रद्धेने भारलेल्या अनुयायांना धर्मपीठांच्या सत्ताधाऱ्यांनी विषमतेचा पुरस्कार केलेला दिसला म्हणून झाले. विज्ञानाच्या व बुद्धिवादाच्या मर्यादांत राहणारी माणसे जुलमाच्याविरुद्ध बलिदान करण्याच्या व बंड करण्याच्या श्रद्धेने लढत नाहीत. ही लढणारी माणसे माणुसकीच्या श्रद्धेने प्रेरित झालेली असतात. तेव्हा अमूक धर्मतत्त्व किंवा रूढी चांगली आहे व समाजधारणेला आवश्यक आहे असे तरुणांना पटवून द्यावयाचे असेल तर समतेचा, न्यायाचा व माणुसकीचा आधार सांगायला हवा, सांगता यायला हवा. विज्ञानाचा आधार या कामी उपयुक्त नाही व गैरलागू आहे. कारण हा श्रद्धेचा, नैतिकतेचा प्रश्न आहे.

## चातुर्वर्ण्याची मीमांसा

या बाबतीत मात्र श्रीगुरुजींची भूमिका सुदैवाने हिंदु परंपरेवर आधारित अशीच आहे. त्यांनी म्हटले आहे की, चातुर्वर्ण्य ही केवळ "रूढी नसून धर्मच आहे. श्रुति-स्मृती ईश्वरनिर्मित आहेत व त्यांत सांगितलेली चातुर्वर्ण्यव्यवस्था हीही ईश्वरनिर्मित आहे." त्यांनी पुढे हे स्पष्ट केले आहे की, जात ही जन्मानेच ठरते; कारण कर्म-सिद्धान्तानुसार या ना त्या जातीत माणसाला जन्म मिळतो. म्हणजे, इतर संस्कृतीं-मध्ये श्रमविभागानुसार समाजात विषमता व वर्ग पडलेले दिसतात, तसे चातुर्वर्ण्य-व्यवस्थेचे नाही. येथे जन्माने जात ठरते; माणूस या जन्मी कोणत्या प्रकारचे काम करतो व त्याचे गुण कोणते आहेत, यावरून त्याची जात ठरत नाही. उलट, जात पाहून कर्म व गुण ठरविले जातात.

अशी जन्मावरून जात ठरविण्याची व्यवस्था भारताबाहेरीज कोठेही नांदलेली नाही, हे खरे. तसेच भारतात ही व्यवस्था अशीच नांदली हेही खरे. इतर ठिकाणी विषमता नांदली. आजही गोरे-काळे हा भेद, ख्रिश्चन व यहुदी हा भेद, असे भेद जगात नांदत आहेत, पण भारतीय जातिभेद आणि विषमता कर्मसिद्धान्तावर व म्हणून हिंदु धर्मतत्त्वावर आधारलेल्या आहेत. या अर्थाने चातुर्वर्ण्यव्यवस्था केवळ रूढी नसून धर्मच आहे, ही श्रीगुरुजींची भूमिका सत्य आहे. हे आवर्जून सांगायला हवे. कारण गेली साठ-सत्तर वर्षे एक असत्य सारखे सांगितले जात होते, ते असे की, चातुर्वर्ण्यव्यवस्था ही मुळात जन्मावर आधारलेली नव्हती, माणसाच्या या जन्मीच्या प्रत्यक्ष गुणांकडे व कर्माकडे पाहून त्याची जात ठरविण्यात येत असे; व पुढे केव्हा तरी या व्यवस्थेला जन्मसिद्ध जातिव्यवस्थेचे अवनत स्वरूप आले!

या जन्मसिद्ध जातिव्यवस्थेचे बुद्धिनिष्ठ आणि विज्ञानसंगत स्वरूप सिद्ध कर-ण्याचा प्रयत्न श्रीगुरुजींनी केला आहे. तो कसा ते पाहू. ते म्हणतात की, या व्यवस्थेमध्ये सहकाराचे तत्त्व मानलेले आहे व स्पर्धा टाळलेली आहे. पण हे समर्थन बरोबर नाही. सहकार या शब्दाचे व कल्पनेचे येथे घोर विडंबन आहे. सहकाराच्या

बाबतीत साधी मूलभूत गोष्ट अशी आहे की, त्यात दोन किंवा अनेक व्यक्तींनी स्वखुषीने व समानतेने एकत्र यावयाचे असते. स्वखुषीच्या जागी सक्ती किंवा बेशुद्धी असेल तर तो मग सहकार नसतो, बलात्कार असतो. आणखी एक गोष्ट सहकाराला आवश्यक असते. दोन व्यक्तींनी सहकार्याने कार्य केले व ते इतरांना विघातक असले तर त्या सहकार्याला अनैतिक मानावे लागते. सहकाराची ही आवश्यक व्याप्ती आहे. असे न मानले तर दहा-पाच जणांनी दरोडा घातला, साठेबाजी करून नफा मिळविला किंवा एखादा मठ किंवा संस्था स्थापून लोकांना लुबाडले तरी या गुन्ह्यांचा सहकार म्हणून गौरव करावा लागेल. किंवा दुसरे संमति-वयाच्या कायद्याच्या संदर्भात गाजलेले उदाहरण घेऊ. आपल्या नऊ वर्षांच्या पत्नीशी संभोग करून तिच्या मृत्यूला कारणीभूत झालेल्या पतीचे कृत्य तसे पाहिले तर वैवाहिक कायद्याला धरून होते. त्या अल्पवयीन मुलीने संभोगाला संमती दिली, असेही शक्य आहे; कारण त्या बिचारीला संभोगाचा अर्थही कळत नव्हता. पति-सेवा करणे हे पत्नीचे कर्तव्य आहे, एवढेच तिला कळत असावे. मग तो संभोग हा एक सहकार मानावयाचा का ?

चातुर्वर्ण्यव्यवस्थेमध्ये सहकार आहे असे मानता येत नाही, कारण यात स्वखुषीचा अंशही नसतो. महाराचा मुलगा अस्पृश्य म्हणून पशूच्या दर्जाचा मानला गेला, पशूहून त्याला अपवित्र मानले, ते त्याच्या जन्मामुळे; तो स्वखुषीने अपवित्रता स्वीकारीत नव्हता. ‘ माझा शिरच्छेद करा ’ अशी विनंती शंबुकाने रामचंद्र-प्रभूंना केली नव्हती. सक्तीच्या धर्मांतरात जेवढा बलात्कार आहे तेवढाच जन्माने जात लादण्यात आहे. म्हणून सहकाराचे तत्त्व येथे अभावानेच आहे. आश्चर्य असे आहे की, सहकाराचे तत्त्व जातिव्यवस्थेच्या आधाराला आहे, असे श्रीगुरुजींना मनोमन वाटते !

व्यक्तिव्यक्तींमधील, वर्गावर्गांमधील व राष्ट्राराष्ट्रांमधील स्पर्धेमुळे आज मानवी जीवन हिंसक, पोकळ व भयाकुल झाले आहे, तेव्हा स्पर्धेची हकालपट्टी करून सहकारावर आधारलेली समाजव्यवस्था हवी हे खरे. पण तो सहकार न्याय व समता यांवर आधारलेला हवा, साऱ्या समाजाचा तो नैतिक आधार व्हायला हवा. श्रीगुरुजींनी चातुर्वर्ण्यात्मक सहकार सांगितला आहे, तो नैतिक नसून अन्यायावर व बलात्कारावर आधारलेला आहे. स्पर्धेहून तो जास्त हिंसक आहे व हिंदू समाजाला परधर्मीयांच्या आक्रमणाला तोंड देण्यास असमर्थ बनविणारा आहे.

## अहिंदूंना प्रेमळ हाक

श्रीगुरुजींनी चातुर्वर्ण्याची गरज सांगून हिंदू समाजाच्या एकात्मतेलाच दूर लोटली आहे. पण त्यांची कल्पना अशी दिसते की, त्यांनी हिंदू समाजाच्या एकात्मतेची गुरुकिल्ली सांगितली आहे ! अहिंदू समाज भारतात नांदत आहेत व त्यामुळे धर्मपंथातील भेद व वेगळेपणा आहे. हे सारे नाहीसे करण्याचा तसाच एक

रामबाण उपाय त्यांनी सांगितला आहे व तो फारच साधा व सोपा आहे. सर्व अहिंदूंनी हिंदू धर्मात परत स्वगृही यावे अशी प्रेमळ हाक त्यांनी दिली आहे. नाही-तरी अनादी कालापासून ही अहिंदू माणसे हिंदू होतीच, त्यांनी चुकून दुसऱ्या धर्मात पाय टाकला आहे. तेथून त्यांनी परत यावे म्हणजे मग एकात्मता आपोआप साधेलच.

पण, यांना स्वगृही आल्यावर कोणत्या जातीत घ्यावयाचे ? हा प्रश्न चातुर्वर्ण्या-त्मक एकात्मता असलेल्या हिंदू समाजाला पडेल. काही बाबतींत हा प्रश्न अवघड नाही. नवबौद्धांचे उदाहरण घ्या. बौद्ध धर्माचा त्याग करून त्यांनी हिंदू धर्मात प्रवेश केला की त्यांना महारवाडा आहेच. स्वगृही त्यांचीही सोय होतीच. ती त्यांना प्रेमाने दिली जाईल. पण इतरांचे काय ? ज्यांच्या मूळ जातीचा आता विसर पडला असेल त्यांच्यासाठी एक परतलेल्यांची नवी जात करावी लागेल. पण ती करायला हिंदू समाज आनंदाने तयार होईल. एकात्मतेसाठी हवा तो त्याग करण्याची तयारी हिंदू समाजाची आहे, असे श्रीगुरुजींचे अहिंदूंना भक्कम आश्वासन आहे.

आश्वासनापुरतेच पाहिले तर स्वगृही परतलेल्यांना आणखी एक आश्वासन आहे. त्यांना त्यांच्या सवयींप्रमाणे परमेश्वराची आराधना करण्याचे स्वातंत्र्य राहील. म्हणजे प्रत्यक्षात असे होईल : एक ख्रिस्ती माणूस परत आला, तरी तो आपल्या चर्चमध्ये येशूची प्रार्थना करीत राहील, मुसलमान मशिदीत अल्लाची प्रार्थना करील, पारशी अग्यारीत जात राहील. हे सारे प्रार्थनाविधी करीत तो हिंदू धर्मात राहील. आपापल्या चर्चमध्ये प्रार्थना करणारे पोटपंथांचे ख्रिस्ती लोक शेवटी ख्रिश्चन म्हणून गणले जातात, तसा हा थोडाफार प्रकार होईल.

एक कल्पना म्हणून हे सारे मानायला हरकत नाही. पण हे सारे घडले तरी एकात्मता कशी साधेल ? कारण, आज हिंदू, ख्रिस्ती व मुसलमान यांच्यांत जो अंतराय पडला आहे तो कायमच राहील, प्रार्थनास्थाने अलग राहतील, प्रार्थना वेगळ्या राहतील व परमेश्वर एकच असला तरी त्याची लेकरे विभक्तच राहतील.

हे सारे इतके उघड आहे की ते भोळ्यातल्या भोळ्या माणसाला उमगेल. मग हेच एकात्मतेचे रहस्य म्हणून सांगताना श्रीगुरुजींच्या मनात आहे तरी काय असे वाटू लागते.

या बाबतीत माझा अंदाज असा आहे की, धर्म ही गोष्ट तुम्हाआम्हांला वाटते तशी श्रीगुरुजींना वाटत नाही. आपण धर्माला पवित्र, पारलौकिक व श्रद्धेय असा समजतो. धर्माला आपण एक उपयोगी साधन, अडाणी लोकांना शिस्तबद्ध कर-ण्याची युक्ती समजत नाही. पंढरपूरची वारी करणारा माणूस विठोबाची भक्ती करतो. देवदर्शनाला जाणारा मनुष्य व्यायाम घडावा म्हणून देवळापर्यंत जात नाही. मुलाला शिस्त लावण्यासाठी बाप त्याला धाक दाखवील, चोपदेखील देईल. पण याचा देवावरील भक्तीशी संबंध आहे, असे बापाच्या मनात येत नाही. पण

श्रीगुरुजींची भूमिका अशी असावी की, शिस्तीच्या दंडुक्याला धर्माची मूठ असलेली बरे; आणि मूठ म्हणून उपयुक्त असणे हाच धर्माचा स्वभाव आहे, आणि कार्य आहे. व्यक्तिश: श्रीगुरुजींची धर्मश्रद्धा अशी उपयुक्ततावादी असेल असे नाही, पण हिंदू राष्ट्रीयत्वाच्या जीवितकार्याच्या संदर्भात त्यांनी धर्माबद्दलची ही रुक्ष उपयुक्ततावादी भूमिका पत्करलेली दिसते. हिंदू समाजाच्या दुर्बल विस्कळीत अवस्थेने विव्हल झालेले मन धर्मभावनेचे खरे स्वरूप डावलून धर्माला समाजधारणेचे, म्हणजे हिंदू समाजाच्या संघटनेचे, केवळ साधन मानू लागणे, यात अशक्य काय आहे ? पण धर्माला साधनरूप बनविण्यात आपण धर्मश्रद्धेची अवहेलना करीत आहोत याचे भान हरपते ही खेदाची गोष्ट आहे.

राजकीय व आर्थिक स्पर्धेचा व सत्तासंपादनाच्या चढाओढीचा हा काळ आहे. या घोर वातावरणात पांढरपेशा सुशिक्षित माणूस धनिकांना व गरिबांना भिऊन वागत आहे व या धुमश्चक्रीत कशाचाही आधार घेऊन तगू पाहत आहे. त्याला धर्म हे साधन मिळाले तर बरे वाटते, पण दुसरेही साधन त्याला चालेल. त्याला फक्त तगून राहावयाचे आहे. आपले स्थान कमी न होता जगण्यासाठी धडपडावयाचे आहे.

## सैनिकी शिस्तीची एकात्मता

श्रीगुरुजींच्या मुलाखतीतील महत्त्वाच्या अशा प्रमेयाकडे आता आपण वळू. गांधीजींनी पुरस्कारिलेल्या अनासक्ति-योगाचा श्रीगुरुजींनी गौरव केला आहे. ‘ कर्मफलाची आशा न धरणे हे हिंदू धर्माचे मूलतत्त्वच आहे ’ असे सांगून त्यांनी समाजधारणेचा एक आदर्श पुढे ठेवला आहे. ते म्हणतात, “ अनुशासनबद्ध अशा समाजरचनेसाठी कर्मफलत्यागावर आधारलेली चातुर्वर्ण्यव्यवस्था आवश्यकच आहे. अर्थात पूर्वीएवढ्या लवचिकतेसह. ” पण चातुर्वर्ण्यव्यवस्थेची आवश्यकता सांगताना ते सैन्यातील शिस्तीचे उदाहरण देतात.

सैन्यातील शिस्त म्हणजे गणवेष, कवाईत व शस्त्राचा उपयोग असे साधारणत: आपण समजतो. पण गणवेषी शिस्त हा सैनिकी शिस्तीचा नुसता बाह्य आविष्कार आहे. सैनिकी शिस्तीचा आत्मा श्रीगुरुजींनी सांगितला तो आहे. सैनिकाने निमूटपणे आपल्या वरिष्ठांची आज्ञा पाळावयाची असते व आज्ञापालनाच्या मोबदल्यात काहीदेखील मागावयाचे नसते. ‘ कर्मफलत्याग ’, ‘ अनासक्ती-योग ’ या परंपरेतील तत्त्वांवर हा सैनिक गणवेष शोभून दिसतो का ? याचे उत्तर कोणी काही देवोत. श्रीगुरुजींच्या दृष्टीने सैन्यातील शिस्त हा अनासक्ती-योगाचा रम्य आविष्कार आहे.

या पार्श्वभूमीवर, चातुर्वर्ण्यातील लवचिकपणाचे तत्त्व म्हणजे काय ते पाहता येईल. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र एवढे चारच वर्ण माणसांचे आणि अतिशूद्र हे माणूस कोटीच्या बाहेरचे, अशी आपली चातुर्वर्ण्यव्यवस्था पूर्वी होती. पण, पुढे ब्राह्मणांत पोटजाती झाल्या, क्षत्रियांतही भेद झाले आणि वैश्य-शूद्रांत अनेक जाती

बनल्या. हे कसे झाले ? तर पूर्वीदेखील लवचिकपणा होता ! थोडा विस्तार झाला तो लवचिकपणामुळे होऊ शकला. पण विस्तारलेली ही जातिव्यवस्था जन्मसिद्धच राहिली व तिच्यामध्ये वरिष्ठ होते ते वरिष्ठ राहिले व दलित होते ते दलितच राहिले. धनुष्याची कांब लवचिक असते म्हणून तिला वाकवून तिला दोरी लावून बाणाला गती देता येते. तसा हा लवचिकपणा आहे. म्हणून या जन्मसिद्ध जातिव्यवस्थेला सामर्थ्य लाभते. यातून जो बाण सुटतो तो आपले लक्ष्य वेधतो व ते लक्ष्य विषमता टिकविणे हे असते. समाजातील व्यवहारांचे स्वरूप कितीही बदलो, पेशवाई जाऊन इंग्रजी राज्य येवो, बैलगाडी जाऊन विमाने येवोत, पारतंत्र्य जाऊन स्वातंत्र्य येवो; विषमता टिकून राहिली पाहिजे. वरिष्ठांची मत्ता व सत्ता वरिष्ठांच्या हाती राहिली पाहिजे, पांढरपेशा वर्गाला त्यात वाटा मिळाला पाहिजे आणि गरीब समाजाला मागण्या, निदर्शने व संप अशा सवयींपासून मुक्त करून निष्कामपणे, निमूटपणे राबण्याची शिस्त लागली पाहिजे.

लवचिकपणा असलेली चातुर्वर्ण्यव्यवस्था ईश्वरनिर्मित आहे व समर्थ आहे ती समाजधारणेला अशी उपयुक्त आहे म्हणून. समाजधारणेला उपयोगी आहे म्हणून ती धर्म आहे. हा सारा युक्तिवाद चालू विषम समाजव्यवस्था, गरिबांची असहायता व पिळणूक चालू ठेवण्यासाठी, गांबावलेल्या पांढरपेशांना आपले स्थान राखण्यासाठी व मत्तासत्तावाल्यांना सुखावण्यासाठी मुद्दाम समजूनउमजून केला जात आहे का ? असेल किंवा नसेल, असेही मानता येईल. हिंदू व अहिंदू भारतीय समाजाचे एक सुखस्वप्न या युक्तिवादाच्या मागे असेल. माझ्या परिचयाची अनेक तरुण-वृद्ध माणसे या सुखस्वप्नाने भारावलेली व ते मूर्त करण्यासाठी प्रांजलपणे असीम त्यागाला तयार असलेली मला माहीत आहेत. त्यांच्याबद्दल वाटणाऱ्या आदरामुळे व प्रेमामुळेच श्रीगुरुजींच्या भूमिकेसंबंधी ही निःस्पृह चिकित्सा करण्याचे धाडस मी केले आहे.

## श्रद्धा बलावर का माणुसकीवर ?

श्रीगुरुजींच्या मुलाखतीचे अखेरपर्यंत वाचन करीत असताना माझ्या मनावर झालेला एक परिणाम येथे नमूद करावयास हवा. आपले धार्मिक वाङमय वाचताना परमेश्वरभक्तीचा व श्रद्धेचा जिवंत प्रत्यय व जिव्हाळा माझ्या हृदयापर्यंत पोचतो. न्यायमूर्ती रानडे यांचे लेख वाचतानाही त्यांची आस्तिक्यबुद्धी शब्दागणिक जाणवते. आध्यात्मावरील ग्रंथ वाचताना मनातील तत्त्वजिज्ञासा जागृत होते व हेलावते. पण मुलाखत वाचताना असा काहीच प्रत्यय येत नाही. उलट, दिपवून टाकणारा बुद्धिवाद आणि युक्तिवाद जाणवतो. आईन्स्टाइनची ओळख आपल्याला होते, शंकराचार्यांचे कर्तव्य काय हे उमगते, आरेचे श्री. गोडबोले यांनी गायीची दूध देण्याची क्षमता खर्चाच्या दृष्टीने सर्वश्रेष्ठ आहे असे सांगितल्याचे कळते, सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधीशांचे चकित होणे कळते. आपण साधे वाचकही एकंदरीत

चकित व स्तंभित होतो.

मीदेखील चकित झालो हे खरे, पण इतर कशापेक्षा मला याचे आश्चर्य वाटले की, श्रीगुरुजींचा शस्त्रास्त्रांसंबंधीचा अभ्यास अधिकारवाणीने बोलण्याइतका मोठा आहे. रणगाड्यांचा पत्रा किती इंच जाड असावा लागतो आणि अणुबॉम्ब हा इतर शस्त्रांपेक्षा शेवटी कमी खर्चाचा कसा आहे, याबद्दलची त्यांची माहिती अचूक दिसते. अणुबॉम्बपेक्षाही स्वस्तात तयार करता येणारी रोगजंतूंचा फैलाव करून कोट्यवधी लोकसंख्येला नामशेष करू शकणारी अस्त्रे आज देशोदेशींचे वैज्ञानिक तयार करीत आहेत. ती अस्त्रेही भारताच्या संरक्षण-भांडारात शक्य तेवढ्या जलद तयार करू नयेत काय ? परकीय आक्रमकांविरुद्ध ती उपयोगी पडतीलच आणि राष्ट्रद्रोही वेगळेपणा ठेवून फितुरी करू पाहणाऱ्या लोकसमूहांविरुद्ध ती अण्वस्त्रांपेक्षा जास्त उपयुक्त ठरतील. एकतर सध्या शस्त्रांनी होणारा रक्तपात न होता संहार होईल व अण्वस्त्राप्रमाणे आबालवृद्धांचा होईल. दुसरे म्हणजे अण्वस्त्रे टाकून


तुमच्या चेहेऱ्याची नि सौंदर्याची काळजी घ्या

चिघळणारी मुरुमे नि पिंपल्स यांपासून हमखास संरक्षण मिळवा



७ दिवसांची उपचार-योजना—फक्त २ रु. पेक्षा थोड्या जास्त खर्चात



Nital

नितल

मुरुम पुटकुळ्यांवरील औषधि क्रीम

- जंतुनाशक औषधि द्रव्यांनी युक्त.
- केव्हाच लावण्यास सुरवात केली तर पुढे डाग राहात नाहीत
- फक्त २% इतका कमी गंधकाचा अंश असणारे एकमेव उत्पादन
- फक्त 'नितल' मध्येच व्हिटॅमिन एफ् असते की जे डाग राहू न देता मुलायम त्वचा निर्माण करते.



प्रतिबंधात्मक उपचार

मुरमे, पुटकुळ्या चिघळू नयेत किंवा चेहऱ्यावर डाग पडू नयेत म्हणून तुमच्या आवडीच्या तेल रहित फेस क्रीममध्ये थोडेसे 'नितल' मिसळून ते नेहमी वापरा.

सर्व प्रमुख केमिस्टांकडे मिळते.

बृहन्मुंबईकरिता वितरक

**मे. बी. जयंतीलाल ॲण्ड को.,** १५ मंगलदास रोड, मुंबई २

बृहन्मुंबईखेरीज महाराष्ट्रासाठी वितरक

**मे. एस्. एम्. प्रभू ॲण्ड सन्स,** १५ हनुमान रोड, बिलेपार्ले (पूर्व), मुंबई ५७

माणसांबरोबरच प्राणी व वनस्पती जळून जातात व क्षेपित भूमी अण्वस्त्र-कणांमुळे नंतर कित्येक वर्षे वसाहतीला लायक राहत नाही. रोगजंतूंच्या अस्त्रांनी फक्त माणसे मरतात व नंतर तेथ सफाई करून वसाहत करता येते. मी हे कदाचित व्यर्थ सांगत असेन, कारण संरक्षण-तज्ज्ञांपैकी कोणीतरी हे श्रीगुरुजींना आधी सांगितलेलेच असेल !

माझा शिस्तीवर विश्वास आहे, पण सैनिकी समाजधारणेवर नाही, तसाच माझा संरक्षणावर विश्वास आहे, पण अमानुष अस्त्रसंहारावर माझा विश्वास नाही. मी अहिंसावादी नाही, पण केवळ बलाने व हिंसेने भारताचे अंतर्गत व बाह्य प्रश्न सुटतील, इतर प्रयत्नांनी ते उलट अवघड होतील, असे मला वाटत नाही. मी पांढरपेशा वर्गाचा एक प्रतिनिधी व भारतीय नागरिक म्हणून शांततावादी आहे, अण्वस्त्रवादी नाही.

मला हे सांगावेसे वाटते. कारण श्रीगुरुजींच्या एकंदरीत भूमिकेत मला श्रद्धा-स्थान दिसते. ते बल, सैनिकी बल हेच. धर्म हे या श्रद्धेचे उपांग आहे, साधन आहे. विज्ञान हेदेखील बलाचे उपांग आहे. विज्ञानाने मानवजात समृद्ध होईल हे विज्ञानाचे वरदान येथे गौण दिसते.

शस्त्रबद्ध क्षत्रियांनी बलाने संरक्षिलेला प्राचीन समाज भयाकुल राहिला आणि आज तिसऱ्या महायुद्धाच्या, मृत्यूच्या, सावलीत भयकंपित झालेला आधुनिक समाज तसाच बलावरील अंधश्रद्धेच्या आहारी राहिला तर मोठा विनाश अटळ आहे. मग एकात्मता ही स्मशानशांतताच. अशा या घोर संकटकाळी श्रीगुरुजींनी दाखविलेला बलमार्ग हा हिंदू समाजाचे तात्कालिक आणि दूरगामी हित साधणार नाही, असे मला वाटते. उलट, आजच्या भारतीय समाजधारणेत जी विषमता, ढोंग, फाटाफूट व परकीयांच्या अनुकरणाची लाचार हाव आहे, ती कायम राहण्यास श्रीगुरुजींनी प्रतिपादन केलेली सैनिकी, गणवेषी चातुर्वर्ण्यात्मक शिस्तबद्धता कारणीभूत होईल. या गणवेषी राष्ट्रधारणेच्या स्वप्नापायी जर्मन राष्ट्रासारखे प्रगल्भ, सुबुद्ध राष्ट्र दुभंग झाले आहे, हा इतिहास न विसरण्यासारखा आहे. इतिहासाची पुनरावृत्ती होत नाही हे खरे, पण इतिहास नव्याने घडविणाऱ्यांना हे पाहण्याला वेळ नसतो, ते पाहण्यात रस नसतो.

मुलाखतीच्या वाचनाने माझे मन आपल्या मायभूमीच्या भवितव्यासंबंधी थोडे उदास झाले खरे, पण माझा विश्वास हिंदू व अहिंदू साध्या माणसांवर आहे. कारण माझी एकमेव श्रद्धा माणुसकीवर आहे.

O

# पति गेले ग काठेवाडी

वसु भगत

ब्रेख्त हा आज मराठी रंगभूमीवरील चर्चेचा प्रमुख विषय झाला आहे. 'मराठी रंगभूमी' म्हणताना त्या शब्दांच्या अर्थाची व्याप्ती मी अगदीच मर्यादित गृहीत धरली आहे. एरवी 'मराठी रंगभूमी'ला अस्सल चर्चेचे आणि अभ्यासाचे तसे वावडेच आहे. व्यक्तिगत कुचाळक्या आणि फारच झाले तर नव्यांनी जुन्यांची व जुन्यांनी नव्यांची तुच्छतेने टवाळी करणे, एवढ्यापुरतीच या चर्चा आणि अभ्यासांची मर्यादा असते.

तर मी ब्रेख्तविषयी काही लिहायला सुरुवात केली होती. ब्रेख्त या नाटककाराविषयी आणि त्याच्या नाटकांविषयी गेल्या वर्ष–दोन वर्षांत थोडेफार लिहिले–बोलले जाऊ लागले आहे. पण, खरे म्हणजे त्याचा अवतार मराठी रंगभूमीवर एवढ्या लवकर होईल असे वाटले नव्हते; कारण, मराठी रंगभूमी अद्याप एकीकडे शाकुंतल–मृच्छकटिकाच्या आणि दुसरीकडे 'डॉल्स हाऊस' लिहिणाऱ्या हेन्रिक इब्सेन या नाटककारांच्याच छायेत सुखासमाधानाने कालक्रमणा करीत आहे. लुइजी

पिरांदेल्लो आणि अल्बर्त कामू यांच्या नाटकांचे आणि नाट्यपद्धतींचे मराठीकरण जिथे 'प्रायोगिक' म्हणून सादर केले जाते; इतकेच नव्हे तर थोड्याशा वेगळ्या पद्धतीने मांडलेला 'शांतता ! कोर्ट चालू आहे'चा विषय अंतर्बाह्य मराठी रक्तामांसाचा असूनही जिथे प्रायोगिकच मानला जातो तिथे बर्टोल्ट ब्रेख्तचा अवतार व्हावा, ही नवलाचीच गोष्ट आहे. आणि त्याहूनही नवल या गोष्टीचे की, हा अवतार 'प्रायोगिक' मराठी रंगभूमीवर झालेला नसून चक्क व्यावसायिक मराठी रंगभूमीवर झालेला आहे. आणि त्याहूनही गंमत अशी की, हा अवतार मुंबईच्या प्रेक्षकांनी उत्साहाने स्वीकारला आहे.

मी ज्याला 'बर्टोल्ट ब्रेख्तचा मराठी अवतार' म्हणतो ते नाटक ब्रेख्तच्या कुठल्याही गाजलेल्या किंवा न गाजलेल्या नाटकाचा अनुवाद नाही. ते एक संपूर्ण, स्वतंत्र नाटक आहे. मराठी मातीत जन्माला आलेले. मराठी नाटककाराने लिहिलेले. त्या नाटकाचे नाव आहे "पति गेले ग काठेवाडी" आणि नाटककार आहेत श्री. व्यंकटेश माडगूळकर.

'पति गेले ग काठेवाडी' या नाटकात श्री. व्यंकटेश माडगूळकरांनी ज्या नाट्यपद्धतीचा अवलंब केला आहे ती नाट्यपद्धती ब्रेख्तची आहे, आणि म्हणूनच मी या नाटकाला 'ब्रेख्तचा मराठी अवतार' म्हणतो.

आज रंगभूमीवर विषयांची मोठी गंमतीदार वाटणी झाली आहे. अमुक विषय नाटकाचा; अमुक एक लोकनाट्याचा. नाटकाचा विषय लोकनाट्याला नाही चालायचा. त्याचप्रमाणे लोकनाट्याचा विषय रंगभूमीला नाही चालायचा. खरे म्हणजे कलाकृतीला कुठल्याच विषयाचे वावडे नसते. असू नये. तर, विषयांच्या जातवारीच्या या हिशेबाने पाहिले तर 'पति गेले ग काठेवाडी' या नाटकाचा विषय मूलतः लोकनाट्याचा. पण 'पति गेले ग काठेवाडी' हे रूढार्थाने लोकनाट्य नाही. नाटक तर नाहीच नाही. ती या दोन्ही प्रकारांतून लीलया फिरणारी गंमत आहे. त्यात लोकनाट्यही आहे आणि नाटकही आहे. थोडक्यात म्हणजे त्यात लोकनाट्याच्या ढंगाने नाटक वावरते व नाटकाच्या रंगाने लोकनाट्य रंगत राहते.

पडदा वर जातो तेव्हा संस्कृत रंगभूमीवरून मराठी रंगमंचावर आलेले सूत्रधार परंपरागत पद्धतीने गळ्यात हार घालून व हातात पूजेचे तबक घेऊन नांदी म्हणताना दिसतात. पण, नांदी पूर्ण व्हायच्या आधीच ढोलकीवर थाप देत शाहीर मंडळी पुढे येतात. म्हणजे आता आली की नाही पंचाईत ! आता इथे नाटक होणार आहे, की तमाशा होणार आहे, की नुसतेच नाटक-तमाशेवाल्यांत भांडण ? या भांडणात एखादा नाना ओक चक्क रवींद्र नाट्यगृहाच्या मॅनेजरलाच बोलावून जाब विचारू पाहतो की, आम्ही हे नाट्यगृह भाड्याने घेतले असता हे ढोलकीवाले इथे कसे ? सोवळ्याने करावयाच्या साबुदाण्याच्या खिचडीत कांदे कसे ? पण, तसे होते खरे ! दोघांची पुढे दिलजमाई होते. शाहीराच्या 'शुद्ध मराठी'त सांगा-



**कमलाकर सारंग । सौ. ललिता केंकरे**

यचे म्हणजे दोघांचा चक्क " संकर " होतो. आणि या संकरातून एक गंमतीदार कथा लोकनाटयाच्या सरळधोपट ढंगाने आकार घेऊ लागते.

पेशवाई आमदानीत मराठे सरदार दूरदूर उत्तर-दक्षिणेत जाऊन चौथाई वसूल करीत असत. त्या काळात मराठी तलवारीचा चहूकडे दरारा होता. त्या काळातील ही कथा. पुण्याजवळ असलेल्या मांबुर्ड नामक गावचा सुभेदार अशी चौथाई वसूल करण्यासाठी काठेवाडला जायला निघतो. त्याला एक अत्यंत रूपगुणवती भार्या होती. साहजिकच त्याचे आपल्या भार्येवर अतिशय प्रेम होते. अर्थात, जिथे उत्कट प्रेम असते तिथेच संशयाचेही घर असतेच. आपल्यामागे आपली पत्नी दुसऱ्या कुणाच्या मोहात तर सापडणार नाही, या शंकेने सुभेदार व्याकुळ होतो. त्याच्या मनातील शंका दूर व्हावी म्हणून त्याची चतुर बायको एक चतुर उपाय योजते. वकुळीच्या ताज्या फुलांचा तुरा त्याच्या पगडीत खोवते आणि आपले पातिव्रत्य कायम आहे तोवर हा तुराही ताजा राहील, त्याचा सुगंध दरवळत राहील, असे आश्वासन देते. सुभेदार प्रसन्न होतो. निश्चित चित्ताने चौथाई वसुलीच्या मोहिमेवर निघताना, पत्नीच्या आग्रहावरून, तिला तीन कामे सांगतो. एक म्हणजे, काहीही द्रव्य खर्च न करता एक महाल बांधावयाचा. दुसरे म्हणजे, स्वतःला एक सवत आणायची. आणि तिसरे म्हणजे सुभेदार मोहिमेवरून परत येण्यापूर्वी सुभेदाराच्या वंशाचा दिवा घरात तेवत ठेवायचा. आता या तीनीही कामगिऱ्या अशक्य

कोटीतल्याच. पण, सुभेदाराची पत्नी ही तीनीही कार्ये पार पाडण्याचे वचन देते.

सुभेदार काठेवाडी पोचतो. काठेवाडचा म्हातारा असूनही हिरवट असलेल्या जागीरदाराला बकुळीच्या फुलांचा सदैव ताजा राहणारा तुरा अस्वस्थ करतो. तो तुरा कोमेजून जावा यासाठी जागीरदार आपल्या दिवाणजीला भांबुर्डयाला पाठवतो. आणि नेमक्या याच संधीचा फायदा घेऊन सुभेदाराची पत्नी लोकनाटचातील नायिकेच्या चातुर्याने, पतीने आपल्यावर सोपवलेली नाजूक पण, अवघड कामगिरी यशस्वी करून दाखवते.

आता या गोष्टीची जातकुळी, कोणत्याही दंतकथेची किंवा लोककथेची जी जातकुळी असावी तशीच आहे. ती ' फँटसी 'च्या सदरात मोडते. अशा ' फँटसीज् 'ना सध्या जे नाटक म्हणून समजले जाते त्या नाटकाची बंदिस्त चौकट मानवत नाही. ती त्यांच्यावर लादली गेली तर त्यातली खरीखुरी गम्मतच नाहीशी होते. ही गोष्ट लक्षात घेऊनच श्री. व्यंकटेश माडगूळकरांनी लहान लहान प्रसंगांतून साऱ्या कथेची विभागणी केली आहे. श्री. व्यंकटेश माडगूळकर हे सिद्धहस्त चित्रपटकथा-कार आहेत. त्यांचा हा गुण येथे त्यांच्या मदतीला धावून आला आहे. एखाद्या चांगल्या पटकथेची सलगता (कंटिन्यूइटी) छोटचा छोटया घटनाप्रसंगांतून साधावी तशी सलगता त्यांनी येथे साधली आहे. चित्रपटाच्या पटकथेच्या बांधणीचे ज तंत्र आहे त्याचा नाटचलेखनात प्रभावी उपयोग करून घेता येईल, असे मला स्वतःला फार दिवसांपासून वाटत होते. असा वापर सुप्रसिद्ध पटकथाकार श्री. राजेंद्रसिंह बेदी यांनी, आपल्या " एक चादर मैलीसी " या कादंबरीचे गेल्या वर्षी जे नाटकात रूपांतर केले होते, त्यात केला होता. अर्थात, त्याची जात वेगळी होती. प्रकृती वेगळी होती. ' पति गेले ग काठेवाडी 'ची जात वेगळी आहे, प्रकृती भिन्न आहे आणि स्वरूपही निराळे आहे.

या नाटकाची वेगळी जात आणि भिन्न प्रकृती, निराळे स्वरूप आणि वेगळा ढंग लक्षात घेता त्याची निर्मितीही निराळयाच पद्धतीने होणे आवश्यक होते. ती या नाटकाची मागणी होती, गरज होती आणि साहित्य संघाच्या नाटचशाखेने सुजाणपणे ही मागणी लक्षात घेतली. चांगल्या नाटकाला जाणता निर्माता लाभला की नाटकाची निर्मिती कशी रंगतदार होते, याचे ' पति गेले ग काठेवाडी ' हे लक्षणीय उदाहरण आहे.

सौ. सुधा करमरकर यांनी हे नाटक दिग्दर्शित केले आहे. त्यांची बालनाटचे वगळली तर दिग्दर्शिका म्हणून आजवर त्यांचे खास असे काही कौशल्य नजरेत भरले नव्हते. या नाटकात मात्र त्या दिग्दर्शिका म्हणून नजरेत भरतात आणि त्याचबरोबर एक कुशल अभिनेत्री म्हणून आणि विशेष म्हणजे चांगल्या संगीत दिग्दर्शिका म्हणूनही नजरेत भरतात. भरतवाक्याच्या वेळी सारी पात्रे रंगमंचावर येतात, त्या वेळची एकूण रचना (काँपोझिशन) अत्यंत देखणी होती. मात्र अशीच


देखणी रचना सारी कथा सांगत असताना वापरली गेली असती तर आणखी गम्मत आली असती.

अशा नाटकात नटांचे भूमिकांशी तादात्म्य होणे, हा एक मोठाच दुर्गुण ठरतो. खरे म्हणजे, नटांचे भूमिकांशी तादात्म्य होते वगैरे गोष्टी काही खऱ्या नसतात. नट हा माध्यम असतो. त्या विशिष्ट व्यक्तिरेखेला, तिच्या साऱ्या बारकाव्यांसकट साकार करून कथा परिणामकारकरीत्या प्रेक्षकांपर्यंत पोचवणे एवढेच त्याचे काम असते. स्तालिस्लावस्की किंवा ब्रेख्त किंवा आमच्या भरतमुनींनी सांगितलेल्या नाट्यशास्त्रात किंवा नाट्यपद्धतीत हेच म्हटले आहे. पण, ब्रेख्त हा नटांच्या अलिप्ततेबरोबरच प्रेक्षकांच्या अलिप्ततेचाही पुरस्कार करतो. आपणच आपल्याला रंगमंचावर पाहत आहोत असे प्रेक्षकांना वाटता कामा नये. आरशात आपले प्रतिबिंब पाहताना जशी अलिप्तता राहते तशीच रंगमंचावरील कथा पाहताना राहावी, असा ब्रेख्तचा सिद्धान्त आहे. 'आयडेन्टिफिकेशन'चा सिद्धान्त त्याला मान्य नाही. या दृष्टिकोणातून पाहिले तर या नाटकातल्या नटांनी आपली कामगिरी चोख बजावली आहे, असेच म्हटले पाहिजे. कमलाकर सारंग यांचा सुभेदार, अरविंद देशपांडे यांचा दिवाणजी आणि दत्ता भट यांचा काठेवाडी जागीरदार या तीनीही प्रमुख भूमिका झकास झाल्या. त्यातही दत्ता भट अधिक लक्षात राहिले. सुभेदाराची पत्नी आणि तिची दासी मोहना ही या नाटकातली दोन स्त्रीपात्रे. सुभेदाराच्या पत्नीचे काम ललिता केंकरे यांनी छान केले. ललिता केंकरे ही एक अत्यंत गुणी कलावंत आहे. पण, त्यांना त्यांची भूमिका अजून मिळाली नाही, असेच मला सारखे वाटते. सुधा करमरकरांनी उभी केलेली मोहना छान होती.

रंग हे या नाटकाचे आणखी एक विलोभनीय वैशिष्ट्य. काही कथावस्तूच अशा असतात की, रंग ही त्यांची अपरिहार्य गरज असते. तो त्या कथावस्तूचा अत्यावश्यक घटक असतो. 'पति गेले ग काठेवाडी' या नाटकातून रंग वजा करा, नाटकातली खूपशी गम्मत कमी होईल.

'पति गेले ग काठेवाडी' ही तीन तास चालणारी एक गम्मत आहे. त्यातून उगाच कुणी काही गंभीर अर्थ वगैरे काढण्याच्या भानगडीत पडू नये. कारण, नाट्यगृहाबाहेर पडल्यानंतर नाटकातले काही म्हणता काही लक्षात राहणार नाही. असेही कधीकधी बडायलाच हवे असते. असे विसरण्यातही गम्मत असते.

○



# गोळीबार

न. बा. जोशी

एवढ्या मोठ्या माणसाच्या दारात हा तमाशा ! सगळेच विचित्र ! बघता बघता गर्दी जमू लागली होती. गर्दीत बघे होते, तसेच काही जाणते-नेणतेही होते. जाणत्यांच्या पोटात मॅगसल्फ घेतल्यागत कालवाकालव होत होती. भांडणाला जोर चढला होता. हे भांडण मिटावे असे सगळ्यांना वाटत होते. तरीपण बंद न होता तेजाळतच चालले होते. काटा बोचल्याप्रमाणे त्याच्या मनात ते सलत होते. आपण मध्ये पडावे असे त्याला सारखे वाटत होते; पण पाय हलेनात. तेथून सटकावे तर कोळ्याच्या जाळ्यात माशी अडकावी अशी त्याची अवस्था झाली होती. त्यातल्या त्यात पार मागे तो सरकला. बिन तोंडवळ्याच्या गर्दीत मिसळून गेला.

शब्दांच्या फैरी झडत होत्या. साहेबांचा सरळसोट स्वभाव त्यांना नडत होता. भूमीचा कंप आणि भूकंप ह्यांत फरक मोठा, असे बोलून वेळ मारून नेण्याची कला त्यांच्यात नव्हती. तसली मुत्सद्देगिरी त्यांस अवगत

नव्हती. अप्रिय आहे म्हणून खरे बोलणे टाळण्याचे त्यांच्या रक्तात नव्हते. एक घाव, दोन तुकडे असा त्यांचा खाक्या. जळो हे शरीर, तुटो हे शिर अशा शर्थीने लढलेल्या सैनिकांच्या नावाने वावरणाऱ्या, त्यांचे मुखंड म्हणवून घेऊ पाहणारांनी रुपये-आण्याच्या भाषा बोलाव्या, त्याकरता भांडावे हे साहेबांना अती विसंगत वाटत होते.

पुढे अनुदाने मिळतील, पोटापाण्याची व्यवस्था होईल अशा हलक्या हेतूने का सैनिकांनी छातीवर गोळ्या झेलल्या, तुरुंग भरले, संसाराची धूळधाण होऊ दिली ? नाही ना ? मग आता दिवस पालटले होते. कृतज्ञभावाने समाज थोडीफार सोय करू पाहत होता. गंगा वाहत होती. तिच्यात डुबी मारून पावन होणेच इष्ट होते. सैनिकांच्या ह्या स्वयंभू मुखंडांना तरी असे वाटत होते. किंबहुना तो आता सिद्ध-हक्कच झाला होता.

ही हक्काची भाषा हेच भांडणाचे मूळ होते. खरे सैनिक बाजूसच राहिले होते. त्यांच्या नावावर बरेच छक्केपंजे चालू झाले होते. आम्हांस किती द्यावे, त्याचे आम्ही काय करावे, हे ठरविणारे तुम्ही कोण ? असा ह्या मुखंडांचा खडा सवाल होता.

साहेबांची धारणा वेगळी होती. कर्तव्यबुद्धीने समाज देतो आहे ते घ्या व गोडी राखा, असे त्यांना म्हणावयाचे होते; पण ताणाताणीत, बोलाचालीत शब्दरूप मात्र भलतेच वळण घेऊ लागले होते. आता तर प्रकरण हातघाईवर येऊ घातले होते.

पोलिसांची गाडी येऊन थडकली. प्रकरण तेवढ्यावरच निभावले.

शान्तू सागुडकराने काही कमी भोगले नव्हते. जुन्या आठवणींची गर्दी त्याच्या मनात होत होती. गोळी लागल्याने अधू झालेल्या पायाचे ओझे त्याला जन्मभर वागवावे लागणार होते. दिडक्या चालीने पाय ओढीत तो हळूहळू रस्त्याला लागला. त्याचे मन फार सैरभैर झाले होते. अशा वेळी त्याला तंबाखूची तल्लफ यायची. त्याने चंची काढली. बार भरला आणि तो पिशवी खिशात ठेवू लागला तोच खिशातील दोन कागदांची त्याला आठवण झाली. त्याने ते कागद बाहेर काढले. ते होते अर्ज. दोन्हीही अनुदानांसंबंधीचेच.

दोन खुर्च्या लावलेले त्याचे छोटेसे कर्तनालय होते. त्यावर त्याची जेमतेम गुज-राण चालत होती. संसार असा त्याचा फारसा नव्हताच. एक मुलगा व म्हातारी आई. मुलगा शाळा शिकत होता. आईविना पोर ते ! शान्तू भूमिगत होता तेव्हा त्याचा पत्ता मिळावा म्हणून सगुणेला पोलिसांनी छळछळ छळले होते, मारमार मारले होते. सारे सहन करून तिने तोंड उघडून बेभरंवसा केला नव्हता. पण शान्तू अखेरीस सापडला होता. त्याला १५ वर्षांची दारुण शिक्षा झाली होती. त्याच्या शिक्षेनंतर मात्र सगुणा खचली होती. धीर सोडू नका, असा तिने राम

म्हणताना त्याला सांगावा पाठविला होता. तुरुंगात त्याला हे सर्व समजले तेही तिची मातिमसण झाल्यावर आठ दिवसांनी.

स्वातंत्र्य उगवले. त्याची सुटका झाली. तो जीवनाशी नव्याने झगडू लागला होता. ना त्याचे रानात शेत, ना गावात घर. किडूक मिडूक विकून आपला पिढीजात व्यवसाय त्याने नेटाने मार्गी लावला होता. पोटापुरते मिळू लागले होते. हजारोंनी पैसे मिळाले असते तर त्याला ते नको होते असे नाही. खरे राहिले मागे. दुरून, चुकून संबंध आलेल्या, पोलिसांना बातम्या देणाऱ्या भेदींपैकी काहींनी कागद रंगवून, वर उपकार करतो अशा थाटात अनुदाने लाटल्याची, कमाई केल्याची उदाहरणे त्याला माहीत होती. त्याचा मात्र स्वत:पुरता निश्चय होता. त्याने अर्ज केला नव्हता, तरीही अनुदान चालून आले होते. तेही नम्रपणे त्याने नाकारले होते. अधिक गरजवंतांना उपयोगी येईल अशी त्याची भावना. शिवाय ज्या ध्येयाने, जीवाच्या बाजीने त्याने लढाई लढली होती, त्या भावनेचे असे मोल करून घेणे त्यास पसंत नव्हते. काही निकटवर्तीयांनी त्याला खुळचात काढले होते. कित्येकांचे प्रेमळ हट्ट त्याला मोडावे लागले होते. तसा तो काही असा वागणारा एकाकी सैनिक नव्हता. पण त्याच्यासारख्याचे नव्या जमान्यात कौतुक नव्हते. पण त्यांना त्याचा नव्हता खेद. नव्हती खंत.

शान्तूबद्दल साहेबांना चांगली जाण होती. आदर होता. शान्तूची शिफारस असली तर काम हमखास, अशी बऱ्याच जणांची समजूत होती. कित्येकांनी त्यास गळ घातली होती. पण त्याने अनुदानाच्या शिफारशीचे बाबतीत मात्र सर्वांची निराशा केली होती. वास्तविक इच्छुकांनी त्याजकडे आता ह्याकरता यावयास नको होते. पण फिरून फिरून त्यास भीड घातली जात होतीच.

सर्वच बाबतींत सदासर्वदा कर्मठपणा करून चालत नाही. समझोता करावा लागतो. ह्यासंबंधीची कुण्या एका थोराने सांगितलेली एक मार्मिक गोष्ट दाखवून नुकतीच त्यास दोघांनी फिरून गळ घातली होती. कधी नव्हे ते त्याने त्यांचे अर्ज ठेवून घेतले होते. निवांत वेळी, चंद्रमौळी झोपडीत पडल्या पडल्या बराच विचार केला होता. देणारा देतो, घेणारा घेतो. आपल्याला नको. राहू दे. दुसऱ्याचे तेवढे चूक. आपलेच सदा बरोबर असा आग्रह का, असा विवेक करून त्याने ह्यापुढे तारतम्याने शिफारशी करावयाच्या, नाही म्हणून टाळायचे नाही, असे ठरविले होते. बोनीचे हे पहिले दोन अर्ज स्वत: साहेबांना नेऊन देण्याकरता तो सकाळी बंगल्यावर गेला होता. आजचा हा प्रकार झाला नसता तर गाठ झाली असती. बिचाऱ्यांची कामे झाली असती. आता फिरून खेप आली होती.

दुकानात गर्दी बरी होती. दोन्ही खुर्च्या चालू होत्या. दोघे-तिघे बसून होते. वर्तमानपत्रांची चळत चाळली जात होती. शान्तूने काऊंटरवरील वही उघडून आजची गिऱ्हाईकी तपासली. बेरीज ओढली. वाटीतील नगद दोनदा मोजून

हिशेब बरोबर असल्याची खातरजमा केली. नकळत खिशातील दोन्ही अर्ज हिशेबाच्या वहीत घालून ठेवले. रेडिओचा आवाज जरा लहान केला. फोटोला माळा चढविल्या. उदबत्त्या लावल्या. बाह्या वर सरकवीत बाकड्यावर बैठक मारली. गिन्हाइकाशी गप्पा मारत तो हळूहळू वर्तमानपत्रात रमला.

एवढ्यात वासू जीवणकर गडबडीने दुकानात आला. घामाने तो चिपकला होता. वासूने हळूच शान्तूच्या कानाशी लागून आपल्या अर्जाची चौकशी केली. शान्तू खिसे धुंडाळू लागला. अर्ज सापडेना. अखेर वहीची आठवण झाल्यावर तो टेबलाजवळ गेला. वहीतील अर्ज काढून वासूला दाखविला. अर्ज पाहून जीव भांड्यात पडला. शान्तूने स्वतः अर्ज साहेबांकडे नेऊन देणार असल्याचे त्याला सांगितले. वासूच्या आश्चर्याला पार राहिला नाही. शान्तू इतका कसा बदलला ! आंधळा मागतो एक डोळा, मिळतात दोन. वासूची तशी अवस्था झाली. आपला नवीन बेत शान्तूस पार पडू दे, तोच मनावर घेऊ दे, असा नवस मनातल्या मनात तो कुलस्वामिनीस बोलला.

त्याने शान्तूला दुकानाबाहेर काढले. जवळच्या हॉटेलात स्पेशल रूममध्ये बसल्यावर वासूने भराभर आरडर सोडली. आपला बेत हळूहळू शान्तूच्या गळी उतरविण्यास त्याने सुरुवात केली.

पकडलेला दिवस व सोडता सोडता वाढलेला अर्धा दिवस धरून वासू जास्तीत जास्त साडेनऊ दिवस तुरुंगात होता. त्याने शान्तूजवळील अर्जात आठ दिवस तुरुंग असे लिहिले होते. अलीकडे वासूने चौकशीचा उद्योग मांडला होता. हळूहळू तो शहाणा झाला होता. भूमिगत म्हणून लिहायचे, सर्टिफिकिटावर भागते. शिक्षाही अंदाजे अशी पुस्ती जोडून वाढवून लिहायची. पोलीस आला की बऱ्याच वेळा चिरीमिरीवर भागते, खपून जाते, वगैरे त्यास माहीत झाले होते. आता आपल्या अर्जात बदल वासूस करावयाचा होता. आठ दिवसांच्या ऐवजी महिनाभरचा टिळा लागला असता, शान्तूचे शिफारशींमुळे जमून गेले असते तर दोन हजारांऐवजी एकदम पाच हजार हाती आले असते. शिवाय शेती वा धंद्याला कर्ज, शिक्षणाची मोफत सोय, कर्जात सूट, सगळ्यांत सगवड करून घेता आली असती. नवा अर्ज लिहून आणून देतो, असे म्हणून त्याने शान्तूजवळ जुन्या अर्जाची मागणी केली होती.

वासूचे लक्ष नव्हते. नाहीतर शान्तूच्या कपाळावरची उजवी शीर तटाटून आलेली त्याला दिसली असती. जुन्या आठवणी येऊन शान्तू आतून केवढा भडकला आहे ते उमगले असते. शान्तू वरून शांत होता. त्याने खिशातून वासूचा अर्ज काढला. धीमेधीमे अर्जाचे बारीक तुकडे केले. वासूच्या चहाचे कपात ते हळूहळू सोडून दिले. वासू चमकला. पण धूर्तीने शान्तूला बोल लावला नाही. दुसऱ्या मार्गाने कसे अनुदान मिळवायचे ते त्याला माहीत झाले होते. शान्तू आडामोडा घालणाऱ्यातला नाही हेही त्याला माहीत होते, म्हणून त्याने दादापुता करून ही वेळ मारून नेली होती.

वासूच्या भरीस पडून उगाच ह्यात लक्ष घातले असे शांतूस झाले होते. दुसऱ्या अर्जाचे आता काय करावयाचे ? परत द्यायचा ? का सगळेच वासू नाहीत हे ओळखून शिफारस द्यायची ? काय करावयाचे ह्या संभ्रमात तो पडला होता. एक मात्र त्याने निश्चित केले होते. आपणहून अर्ज देण्याकरता सकाळप्रमाणे साहेबांकडे जायचे नाही. शिफारस दिली देऊ, पुढचे पुढे ज्याचे त्याने पाहावे.

रात्र झाली. तो अंथरुणावर पडला होता. दिवसभर तो बेचैन होताच. आता तर निवांतपणी अनेक विचारांनी त्याला भंडावले होते. जुन्या आठवणी त्यातच येऊन जात होत्या, झोप येत नव्हती. डोळा लागत नव्हता. दारू त्याला निषिद्ध नव्हती. कधीमधी थोडीफार नशा तो करायचा. आजही त्याने बाटली काढून थोडीशी कधीच चढविली होती. पण त्याचाही फारसा उपयोग होत नव्हता. केव्हातरी उत्तर रात्री त्याचा डोळा लागला होता. तो नेहमीप्रमाणे घोरू लागला होता.

आता साहेबांनी हे पुरे झंझाट त्याच्याच गळ्यात बांधले होते. हा पैसा, हे नियम, खरेखोटे करा आणि वाटा. पण दाणा आणि भूस वेगवेगळे करणे कठीण पडत होते. त्यातून मोठमोठे चळलेले त्याने पाहिले होते. वाढीव शिक्षा, अतिरंजित हाल, खोटे पराक्रम, भूमिगत पराक्रम सर्टिफिकेटाद्वारा सिद्ध केले जात होते. काहींनी तर वाटणीच्या भागीदारीचा सौदा त्याच्यापुढे मांडला होता. हे सगळे फारच–अतीच झाले होते. प्रत्यक्ष गोळीबारात भाग घेतला म्हणून शपथेवर सांगणारे बारा अर्ज त्याच्याकडे दप्तरी दाखल होते. पंधरा हजारांच्या अनुदानावर सर्वांनी हक्क सांगितला होता.

आहे हाताशी पैसा द्या वाटून. पण...हा पण शांतूस फार नडत असे. पूर्वी संग्रामात त्याच्याबरोबर काम करणारा अंभाव्या आता इन्स्पेक्टर अहंभावी झाला होता. शांतूने त्याचेबरोबर बरीच चर्चा करून त्यांनी एक अघोरी मार्ग ह्यातून काढला.

भागीदारी मागणाऱ्या बाराही जणांना एका संध्याकाळी त्यांनी जमविले. रात्रीच्या वेळी जीपमधून चढविले. जीप सोडल्या भरधाव. पूर्वीच्या लढ्यात गाजलेल्या गोळीबार पट्टीत सर्व येऊन दाखल झाले.

आता एकएक आठवले म्हणजे शांतूस गंमत वाटते. ते बाराहीजण भेदरले होते. त्यांनी एकेकास वेगळे बोलावून मुलाखत घ्यावयास सुरुवात केली. बोला, तुमचे कर्तृत्व काय, म्हणून त्यांस विचारले. त्या प्रत्येक वेळी इन्स्पेक्टर अहंभावी आपल्या अक्कडबाज मिशीवरून बोटे फिरवायचे तर शांतू दंड थोपटावयाचा. नुसती मुलाखतच ना. घ्या. काही हरकत नाही. एकेकाने हे भारूड लावले. मुलाखती संपल्या, आणलेले जेवण त्यांनी सर्वांस वाटून दिलेले होते. सारे आता स्वस्थ होते. आता परतायचे अशा समजुतीत होते. तोवर बारा पोलिसांना घेऊन दोन जीप हजर झाल्या होत्या. बापरे ! हे पोलीस तर होते हत्यारी. आता इन्स्पेक्टर अहंभावींनी पुरा चार्ज घेतला होता. त्यांनी सर्व अर्जवाल्यांना एका ओळीत उभे केले.

समोर रायफल सावरीत पोलिसांची पलटण उभी राहिली. पट्टीत सर्व मिळून सव्वीस तर माणसे. पण रोजचा सराव पडला ना! अहंभावींनी गाडीतला माईक काढला. ते माईकवर सांगू लागले, "घाबरू नका. साधीशी परीक्षा आहे ही. पोलिसांच्या हातातील बारा रायफलींपैकी फक्त एकीमध्ये बार आहे. बाकी अकरांत वायबार आहेत. पोलिसांपैकी कुणाचे बंदुकीत बार आहे हे कुणालाच माहीत नाही. हजारो गोळ्या घातलेले, ५–५० गोळ्या लीलया छातीवर झेललेले तुम्ही शूर स्वातंत्र्यसैनिक. एक गोळीच काय लागली तर लागू दे एखाद्याला. त्यातून आम्ही शिपाई, तुमचे बंधू. जिवानिशी कोणी जायचा नाही ही माझी गॅरंटी–"

बाराही जणांत चुळबूळ सुरू झाली होती. अशी जीवघेणी परीक्षा द्या म्हणणे हा त्यांचा अपमान होता. शिवाय आता लोकशाहीचा जमाना. अनुदान मागितले म्हणून काय असे गोळीबारास उभे राहा म्हणायचे ! चालणार नाही असे. परंतु येथे गाठ अहंभावींशी होती. त्यांनी कुणाचीच डाळ शिजू दिली नाही. आता सुटका नव्हती. पळून तरी कोठे, कसे जायचे ! माईकवरचे शब्द त्यांच्या कानात अजून घुमत होते. " जिवानिशी कोणी जायचा नाही ही माझी गॅरंटी. "

नेटाने सगळे उभे राहिले. शांतूलाही आता राहवले नाही. त्याने अहंभावींचा हात झटकला. दिडक्या चालीने शड्डू ठोकीत तो लाईनचे मध्ये जाऊन उभा ठाकला. अहंभावींनी पिस्तुलाला कुरवाळीत, अक्कडबाज मिशावरून पालथी मूठ फिरवीत हुंकारले होते, " ओ. के. बॉस. खा गोळी तूही. "

सर्व तयारी पुरी झाली होती. अहंभावींच्या हुकुमाचीच काय ती खोटी होती. पिस्तुलाला कुरवाळीत अहंभावी आता आकडे मोजत होते. वीस, एकोणवीस, अठरा ...अकरा. शांतूला अहंभावींच्या नजरेत मिस्किल चमक दिसली. त्यांनी वळून आजूबाजूस पाहिले. पाच–सहा जण गुल झाले होते. दहा, नऊ, आठ...तीनपर्यंत आकडे आले. शांतूने बाजूस पाहिले. स्वतःस धरून तिघेच लाईनीत राहिले होते. दोन, एक, धूम, धडाड. बंदुका कडाडल्या. शांतूसह तिघेही शाबूत होते. मुळात सगळेच वायबार. लागेल कोठला कुणाला ?

पोलिसांनी धावपळ करून सगळ्या पळपुट्यांना एकत्र केले होते.

शांतूने गोळीबारास बेधडक तोंड दिलेल्या त्या दोघांना कडकडून मिठी मारली. अहंभावींनीही अधिकार विसरून मिठी मारली होती. शांतूने त्या दोघांस खरे निधड्या छातीचे म्हणून गौरविले होते. आणि अनुदानाचा पुरा निकाल लावला होता.

तुम्ही त्यागाबद्दल पैसे घेऊन बाकीच्यांचे लाईनीत येणार नाही. तुम्हांस अनुदान कशास ? तुम्हांस अनुदान पूज्य रुपये असा त्यांचा ह्या दोघांचे बाबतीत निकाल होता. त्यांनी आता निकाल मानला होता. पळपुट्यांच्या दशकडीचा निकाल आधीच झाला होता.

एवढ्यात त्यांना झाडाआडून हमू ऐकू आले होते. आवाज हुबेहूब साहेबांच्या

हसण्यासारखा वाटत होता. साहेब येथे कुठे मध्येच उपटले असे वाटून अहंभावी व शांतू आजूबाजूस पाहू लागले. पण तो भासच होता. तेव्हा ते दोघे राहून राहून खदखदून हसू लागले होते.

शांतूची आई "अरे, येडत्रावाणी हसतोस काय झोपेत ?" असे म्हणून शांतूस गदगद हलवून उठवत होती. एकूण हे सर्व स्वप्नच होते तर! त्याने सुटकेचा निःश्वास सोडला.

× × ×

शांतूचा निश्चय झाला होता. आपल्याला अनुदान मागणीच काय पण शिफारस वगैरे काही जमायचे नाही, असे त्याने पक्के ठरविले होते. स्वतः जाऊन दुसरा उरलेला अर्ज तो ज्याचा त्याला आधी परत करून येणार होता.

○


प्रखर देशभक्ती
सूत्रबद्ध संघटना
अमोघ वक्तृत्व
देशाच्या राजकारणातले यशस्वी डावपेच
परराष्ट्र राजकारणावरील पक्की मांड
हे सर्व हिटलरपाशी होते
तरी अखेर
त्याचा पराभव का झाला ?

नाझी भस्मासुराचा उदयास्त

वि. ग. कानिटकर
मूल्य : पंचवीस रुपये

# पुस्तके

## वज्रप्रहार

इस्रायल या छोटया, नवजात राष्ट्राने अरबस्तानच्या वाळवंटातही समृद्धीचे पीक फुलविले आहे. एकेकाळी दुधा-मधाचा असलेला हा देश पुन्हा ‘ सुजला सुफला ’ करण्याची त्या राष्ट्राची महत्त्वाकांक्षा आहे. पण त्याही-पेक्षा कौतुक वाटते, ते इस्रायलसारख्या चिमुकल्या राष्ट्राने शत्रूराष्ट्रांच्या गराडयातही आपले स्वातंत्र्य टिकवले; एवढेच नव्हे तर शत्रूंच्याच छातीत धडकी भर-वली. जागतिक राजकारणातील हा एक चमत्कार होय. पण जगाला या चमत्काराचे दर्शन झाले १९६७ मध्ये. सहा दिवसांच्या विद्युत्गतीच्या युद्धात आक्रमक युद्धाचा वज्रप्रहार करून इस्रायलने बलाढय समजल्या जाणाऱ्या इजिप्तचा नक्षा उतरवला तेव्हा. अशा या छोटया व वीर्यशाली राष्ट्राचा इतिहास त्याच्या स्थापनेपासूनच स्फूर्तिप्रद आहे. निदान भारतीयांना तरी तो खचितच आहे. दुर्दैवाने या स्फूर्तिदायक वीरगाथेचा प्रसार निदान मराठीत तरी फारसा झालेला नाही. अगदी अलीकडच्या काळात कै. नाना पालकर यांनी ‘ छळाकडून बळाकडे ’ या नावाने हा इतिहास लिहिला आहे. त्याखेरीज दुसरे नवे पुस्तक मला तरी दिसत नाही. श्री. वि. स. वाळिंबे यांचे ‘ वज्रप्रहार ’ हे पुस्तक या दृष्टीनेच महत्त्वाचे वाटते.

द. मा. मिरासदार

इस्रायलसंबंधी मराठीत अधिक ग्रंथ, अधिक माहिती आवश्यक आहे. याचे आणखी एक कारण असे की, आपल्या सरकारचे धोरण अकारणच इस्रायलविरोधी आणि अरब राष्ट्रांना अनुकूल आहे. आपल्या सरकारने इस्रायलच्या निर्मितीपासून या क्षणापर्यंत त्याला राजनैतिक मान्यता देण्याचे नाकारले आहे. इस्रायलची निर्मिती म्हणजे अँग्लो–अमेरिकनांचा अरबविरोधी केवळ एक कट या दृष्टीनेच आमची धोरणे आखली गेली व अजूनही जात आहेत. अशा स्थितीत इस्रायल-संबंधी अधिकात अधिक माहिती मिळवून पूर्वग्रहरहित, निर्मळ दृष्टीने या राष्ट्राची प्रेरणा शोधणे विशेषच अगत्याचे ठरते. वाळिंबे यांच्यासारख्या पत्रकार लेखकाने याच हेतूने आपली लेखणी उचलली असल्याचे वाचकाला जाणवते.

ता. ५ जून १९६७ ते १२ जून १९६७ या सहा दिवसांत इस्रायलने जो अभूत-पूर्व पराक्रम गाजवला तो खरोखरीच युद्धशास्त्राच्या क्षेत्रातील एक चमत्कार मानावा लागेल. वाळिंबे यांनी या दिवसाच्या रोमांचकारी वृत्तांतापासुनच आपल्या निवेदनाला प्रारंभ केला आहे. नंतर उपलब्ध झालेल्या सर्व तपशीलाचा अर्थपूर्ण व उचित उपयोग करून पहिली दोन प्रकरणे त्यांनी अत्यंत थरारक व वाचनीय केली आहेत. हा वृत्तांत वाचत असताना इस्रायल आणि त्याचे संरक्षणमंत्री श्री. मोशे दायान यांच्याविषयी विस्मय आणि कौतुक एवढ्याच भावना वाचकांच्या मनात उचंबळतात. या युद्धाचा प्रत्यक्ष वृत्तांत आणि त्याची नंतरची कारणमीमांसा यांचा ऊहापोह केल्यावर मग लेखकाने मध्यपूर्वेतील राजकारणाचे बारकावे आणि इस्रायलच्या स्थापनेपासूनचा इतिहास वाचकांना सांगितला आहे. १९६७ पूर्वीही अरब राष्ट्रांशी झालेली दोन युद्धे, अरब निर्वासितांचा प्रश्न आणि इस्रायली नागरिकांची ज्वलंत राष्ट्रभक्ती याचे वेधक दर्शन या भागात वाचकाला घडते. आंतरराष्ट्रीय पटावर खेळले जाणारे जागतिक शक्तींचे डावपेच या पार्श्वभूमीवर सामान्य वाचकालाही कळतात आणि दैनिक वृत्तपत्रांतून येणाऱ्या बातम्यांची अर्थ-पूर्णता उलगडू लागते. सामान्य वाचकालाही कळेल इतक्या सोपेपणाने, सुबोधतेने आणि आवश्यक तपशीलाने ही हकीकत लेखकाने रंगवलेली आहे. वाळिंबे यांची शैलीही प्रासादिक, स्पष्ट आणि नेमका आशय मोजक्या शब्दांत व्यक्त करणारी आहे. त्यांचे उद्दिष्ट स्पष्ट आहे. त्यांच्या या सर्व विवेचनाला एक विशिष्ट दिशा आहे. लेखकाच्याच शब्दांत सांगावयाचे झाले तर, "ज्याच्या सीमेवर शत्रुराष्ट्रे उभी असतात अशा राष्ट्राने आपल्या सर्वभौमत्वाची प्रतिष्ठा राखण्यासाठी कोणती धमक दाखवावी लागते याचा इस्रायल हा वस्तुपाठच मानला जातो." मला वाटते, लेखकाचे हे अंतरंग पुरेसे बोलके आहे. त्यावर अधिक भाष्य करण्याची गरज काय?

हे पुस्तक संपूर्ण वाचल्यावर असे वाटते की, सामान्य वाचकांसाठी वाळिंबे यांनी मोठी मोलाची कामगिरी बजावली आहे. युद्धाची रम्य आणि स्फूर्तिदायक कथा त्यांनी तपशीलवार, नकाशांसह पुरवून वाचकांची भूक भागवली आहे. या पुस्त-

काच्या लेखनानंतरही इस्रायलने बैरुतच्या विमानतळावर केलेला गनिमी काव्याच्या पद्धतीचा प्रचंड बाँबहल्ला जगात खळबळ उडवणारा ठरला. अशा वृत्तांतासह—आणि अधिक नकाशे देऊन वाळिंबे यांनी त्याची दुसरी आवृत्ती काढावी. त्याची आम्हांला फार गरज आहे. नव्हे, अशीच इतरही अनेक विषयावर त्यांनी अशी वाचनीय आणि एकप्रकारे स्फूर्तिप्रद पुस्तके लिहावीत. ही कामगिरी ते उत्तम रीतीने पार पाडतील असे हे छोटे दीडशे पानी पुस्तक वाचल्यावर मनात येऊन जाते. ◻

---

# गरुडझेप

---

देशगौरव सुभाषचंद्र बोस आणि त्यांची 'आझाद हिंद फौज' यांसंबंधी वेळोवेळी पुष्कळ माहिती प्रसिद्ध झाली आहे. मराठीत काही पुस्तकेही त्यावर आहेत. मग वाळिंबे यांचे हे नवे पुस्तक कशासाठी? केवळ आझाद हिंद फौजेच्या स्थापनेला पंचवीस वर्षे पूर्ण झाली म्हणून? त्यांच्या स्वातंत्र्यप्रीतीला आणि दुर्दम्य उत्साहाला विनम्र भावाने वंदन करण्यासाठी म्हणून? की त्याचबरोबर आणखीही काही हेतूने?

निवडक चित्रे, नकाशे, सुबक मुद्रण यांनी आकर्षक वाटणारे वाळिंबे यांचे 'गरुडझेप' हे पुस्तक मनात या शंका बाळगून मी वाचायला घेतले. त्यातील प्रस्तावनेकडे माझे लक्ष पहिल्यांदा वेधले. वाळिंबे लिहितात—"...भारताच्या स्वातंत्र्याचा प्रश्न आंतरराष्ट्रीय पातळीवरून हाताळला जावा यासाठी, पहिल्या महायुद्धाचा उद्भव होण्याच्या सुमारास सावरकरांच्या 'अभिनव भारता'ने जर्मनीशी संधान बांधले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात नेताजींनीही तोच धाडसी प्रयोग केला. त्यामुळे, **गेल्या वर्षी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे चरित्र लिहिल्यानंतर आपण नेताजींचेही चरित्र लिहिले पाहिजे**, असे मला वाटू लागले..."

प्रस्तावनेतील ही वाक्ये मोठी बोलकी वाटली. वाळिंबे कदाचित हे सहज लिहून गेले असतील. कदाचित केवळ एक वस्तुस्थिती म्हणून त्यांनी या गोष्टीचा उल्लेख केला असेल; पण भारतीय राजकारणाचे निरीक्षण करणाऱ्या विचारी माणसाला हे पटेल की, वाळिंबे यांनी सुभाषबाबूंचे चरित्र लिहिण्यासाठी योग्य ठिकाणाहून प्रेरणा घेतली आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा मनःपिंड ज्याला समजला त्यालाच सुभाषबाबूंचा मनःपिंड समजेल. धगधगीत देशभक्ती, मातृभूमीसाठी सर्वस्व अर्पण करण्याची आकांक्षा, वास्तववादी राजकारण, तर्कशुद्ध युक्तिवाद, प्रखर बुद्धिमत्ता ही वीर सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये. सुभाषबाबू त्याच कुळात जन्मलेले

आहेत. स्वातंत्र्याची आकांक्षा ही उभयतांची निष्ठा आहे. त्यासाठी परकीय राष्ट्रांचे साह्य वेळप्रसंगी आपद्धर्म म्हणून घेण्यात दोघांनाही कमीपणा वाटत नाही; किंबहुना दिव्याने दिवा लावावा त्याप्रमाणे सावरकरांच्या क्रांतिकारक विचारांचा वारसा सुभाषबाबूंनी आपल्या आयुष्यातील अखेरच्या कालखंडात स्वीकारला, ही वस्तुस्थिती आहे. बॅरिस्टरीची वस्त्रे अंगावर चढवून लाल किल्ल्यात आझाद हिंद फौजेच्या वीरांचे न्यायालयात रक्षण करण्यासाठी धावणारे महापुरुष एक राजकीय डावपेच म्हणून तो खेळ खेळत होते. त्यांना सुभाषबाबूंच्या विचारांचे कसलेही प्रेम नव्हते. त्यांच्या अनुयायांना सुभाषबाबूंच्या जीवनाचे रहस्य समजणे कठीण आहे. याउलट, सैनिकीकरणाच्या मोहिमेला चालना देऊन देशाचे क्षात्रतेज जागृत करणारे सावरकरांचे तत्त्वज्ञान हेच सुभाषचंद्रांचे जीवन समजावून घेऊ शकेल. सुभाषबाबूंचे मोठेपण केवळ कृतज्ञतेने मान्य करणे वेगळे आणि त्या मोठेपणाचे रहस्य उलगडून सांगणे वेगळे. वाळिंबे यांच्या प्रस्तावनेतील ही वाक्ये म्हणूनच मला फार उद्‌बोधक वाटली.

वाळिंबे हे वृत्तीने आणि व्यवसायाने पत्रकार आहेत. पण त्यांच्या व्यक्तिमत्त्वात ललित लेखकाचाही एक पैलू आहे. त्यामुळे हे चरित्र एखाद्या कादंबरीसारखे उत्कंठापूर्ण झाले आहे. लेखनाचे तंत्रही त्यांनी एखाद्या ललित कृतीचेच वापरले आहे. सुभाषबाबू गुप्त रीतीने काबूलला पोचले, तेव्हापासून या वृत्तांताला प्रारंभ होतो. त्यांच्या काबूलमधील वास्तव्यात अनेक माणसे, अनेक अडचणी कशा भेटतात, प्रतीक्षेमध्ये दिवसामागून दिवस कसे लोटतात, आशा-निराशांचे कल्लोळ मनात कसे आंदोळतात यांचे चटकदार वर्णन वाळिंबे यांनी केलेले आहे. या सर्वांमधून धीरोदात्त सुभाषबाबूंचे दर्शन आपल्याला घडते. त्यांची शरीराने भव्य, गौरकाय आणि वृत्तीने मनस्वी अशी मूर्ती आपल्या मनात ठसते आणि मग त्यांच्या जीवन-वृत्तांताला खरा प्रारंभ होतो. ' Flashback' च्या तंत्राने सांगितलेला हा त्यांच्या जीवनचरित्रातील अध्याय वाळिंबे यांनी ललितलेखकाच्या आत्मीयतेने रंगवलेला आहे.

बाळपणापासून काँग्रेसचे अध्यक्ष होईपर्यन्तचे सुभाषबाबूंचे जीवन अनेक ठिकाणी स्फूर्तिप्रद आणि तेजस्वी आहे; पण वाळिंबे यांनी हा कालखंड धावत्या पद्धतीने निवेदन केला आहे. दुसरे महायुद्ध सुरू होते. वैयक्तिक सत्याग्रहाच्या चळवळी सुरू होतात आणि कोलमडतात. स्वातंत्र्याच्या एकमेव आकांक्षेने भारलेले सुभाषचंद्र या संधीचा कसा उपयोग करून घेता येईल याचा विचार करीत असतात. याच सुमारास त्यांची आणि वीर सावरकरांची भेट होते आणि सुभाषबाबूंच्या सुप्त विचारांना स्फुल्लिंग मिळतो. या परिस्थितीत इंग्लंडचे शत्रू ते आपले मित्र या न्यायाने जर्मनी, इटली, जपान या राष्ट्रांचे साहृय घेऊन सशस्त्र युद्धाच्या मार्गानेच स्वातंत्र्य मिळवावे लागेल, एरव्ही ते मिळणार नाही—हा विचार मनात पक्का करून सुभाषबाबू निसटतात. येथून त्यांच्या जीवनातील खरा तेजस्वी कालखंड सुरू

होतो. वाळिंबे यांची लेखणी या प्रकरणापासून पुन्हा संथ आणि सूक्ष्म होते. पुढचा सर्व वृत्तांत सुभाषबाबूंच्या रहस्यमय मृत्युपर्यंतचा त्यांनी मोठ्या रसाळपणे आणि आत्मीयतेने सांगितला आहे. आझाद हिंद फौजेच्या स्थापनेसाठी सुभाषबाबूंनी केलेली धडपड, आझाद हिंद सरकारच्या स्थापनेचा धीरगंभीर दिवस, इंफाळच्या मोहिमेतील उत्कट क्षण, सर्वच गोष्टी लेखकाने फार जिव्हाळ्याने सांगितलेल्या आहेत. त्या वाचत असताना ठिकठिकाणी मन भरून येते. उत्कट स्वातंत्र्यप्रेमाने तळमळणारी, अहोरात्र कष्ट करणारी, सर्वस्व पणाला लावणारी, खऱ्याखुऱ्या अर्थाने 'नेताजी' झालेली सुभाषबाबूंची सैनिकी गणवेषातील गंभीर मूर्ती आपल्या डोळ्यांसमोर उभी राहते आणि ती कितीतरी वेळ हलतच नाही. पुस्तकाचे शेवटचे पान वाचक संपवतो तेव्हा कृतज्ञता, आदर, विस्मय या भावनांनी स्तब्ध होऊन त्याचे मन अंतर्मुख होते. मला वाटते, वाळिंबे यांच्या पुस्तकाचे हे मोठेच यश मानावे लागेल.

**[ वज्रप्रहार । गरुडझेप – लेखक : वि. स. वाळिंबे. अभिजित प्रकाशन, १०४७ सदाशिव, पुणे २. – किंमत : चार रुपये व सहा रुपये अनुक्रमे. ]**

○


# पुरंदऱ्यांची नौबत

**ब. मो. पुरंदरे**

**मूल्य साडेतीन रुपये**

**राजहंस प्रकाशन**

१०२५ सदाशिव, पुणे २

# भिंतीच्या पेंबड्या

सुधाकर राजे

## ☐ टाटा स्टीलचा ब्लाऊज-पीस

फार प्राचीन काळी अश्मयुग होते. त्यानंतर लोहयुग आले. सध्या प्लास्टिक, टेरिलीन, जॉर्जेट इत्यादी युगे एकसमया वच्छेदेकरून चालू आहेत. आता यानंतर आणखी काही तरी नवीन युग सुरू होईल असा माझा भाबडा अंदाज होता.–पण अहो आश्चर्यम् ! लोहयुग पुन: परत आलेले दिसते. न्यूयॉर्कच्या एका फॅशनपरमेश्वराने अत्याधुनिक स्त्रियांसाठी धातूच्या काचोळ्यांची कल्पना काढली आहे, अन् त्यांतल्या श्रीमंती काचोळ्या तर सोन्याच्या पत्र्याच्या केल्या आहेत असे परवा वर्तमानपत्रांत वाचले. अर्थात् श्रीमंत स्त्रियांसाठी सोन्याच्या काचोळ्या, तर मध्यमवर्गीयांसाठी चांदीच्या–निदान जर्मन सिल्व्हरच्या–व गरीबांसाठी तांबे, पितळ व लोखंडाच्या असतील, असा अंदाज करायला हरकत नाही.

म्हणजे आता टू वाय टूचा जमाना जाऊन भिलाई पोलाद-कारखान्यातल्या ब्लाऊज-पीसचा जमाना येऊ घातला आहे की काय ? अन् टाटा टेक्स्टाइलचे कपडे जाऊन टाटा स्टीलचे कपडे येणार की काय ? बाकी कपडे हे कापडाचे असतात ही कल्पना आता इतिहासजमा होऊ लागली आहे असे म्हणायला हरकत नाही. कारण काही मंडळी कागदाचे कपडे करण्यात गुंतली आहेत तर आता ही मंडळी सोन्या-चांदीचे व लोखंड-पितळेचे कपडे करू पाहत आहेत. एकेकाळी ' इंडिया दॅट् वॉज भारता 'त लखलखीत पोलादाच्या धारदार तरवारी होत असत. आता ' भारत दॅट् इज इंडिया 'त त्याच पोलादाच्या टोकदार काचोळ्या होणार हा काळाचा महिमा की त्याच्या बायकोचा ?

आता कपडे हे सामाजिक प्रतिष्ठेचे व्यवच्छेदक लक्षण आहे आणि सुती साडी, फुल वायलची साडी अन् टेरिलीनची साडी यांची चढती सामाजिक कमान प्रत्येक नवऱ्याला माहीत आहे. पण यापुढे हे गणित कसे मांडायचे ? विशेषत: साधी वायल, ' हाफ्-फुल ' वायल आणि फुल वायल हा सूक्ष्म भेद कसा दाखविता येईल ? मला वाटते, त्यासाठी टेंपर्ड स्टील, माइल्ड स्टील, कार्बन स्टील हे पोलादाचे निरनिराळे प्रकार लक्षात ठेवावे लागतील; अन सोन्याची काचोळी असली तरी १४ कॅरेट-पासून २४ कॅरेटपर्यंत चढती कमान ठेवावी लागणारच. एकूण काय, झगे ल्यावे लोखंडाचे तेव्हा देवपणी नाचे.

## ☐ ऋषि-मुनींच्या तपश्चर्येतला लंच-ब्रेक

आधुनिक जीवनामुळे मनावर पडणारा ताण कमी करण्यासाठी एका ब्रिटिश मानसशास्त्रज्ञाने अशी सूचना केली आहे की, प्रत्यक माणसाने आपले काम दिवसांतून एकदा दहा मिनिटे थांबवून जीवन म्हणजे काय? आपल्याला त्यातून काय मिळवायचे आहे? इत्यादी मूलभूत प्रश्नांचे मौलिक मनन करावे. कल्पना मननीय आहे. पण जीवनाची समस्या सोडविण्यासाठी आपल्याकडच्या ऋषि-मुनींनी दहा हजार वर्षे तपश्चर्या केल्याच्या दंतकथा आहेत. ती समस्या दहा मिनिटांच्या "वैचारिक सुटी"त सुटेल असे हा साहेब छातीवर हात ठेवून सांगू शकेल काय? शिवाय कुणाला कुठले मनन मौलिक वाटेल याचा काय नेम सांगावा? उदाहरणार्थ, उद्या या योजनेप्रमाणे प्रत्येकाने दहा मिनिटे समाधी लावावी अन वानगीदाखल काही मते तपासली तर मौलिकतेची खालील व्हरायटी सापडू शकेल—

राजकीय मुत्सद्दी : या जगात मूलभूत कमतरता आहे ती पक्षांची! अवघ्या १५–२० दिवसांत माझे सर्व पक्ष पालटून झाले आहेत, तेव्हा माझ्यासारख्याला पुढचे जीवन कसे शक्य आहे?

मंत्री : हे जीवन स्वर्गमय करण्याचा सोपा मार्ग म्हणजे पार्लमेंट-सभासदांनी चांभार-चौकशा करण्याची वाईट खोड सोडून द्यावी. प्रत्येक वेळी "सरकार या प्रकरणी अधिक माहिती गोळा करीत आहे," अशी टोलवाटोलवी करण्याचा माझा मलाच कंटाळा येऊ लागला आहे.

जिल्हापत्राचा संपादक : हे जीवन रटाळ, नीरस होण्याचे मुख्य कारण म्हणजे जगात लाखो गाई-म्हशी असूनही एखादीलाच दोन डोक्यांचे वासरू किंवा शिंगरू होते.

विद्यार्थी : हल्लीच्या जीवनातली सर्वांत मोठी समस्या म्हणजे हल्लीच्या दगडात काही दम राहिला नाही. शाळेच्या इमारतीची एकेक खिडकी फोडायला चार चार दगड लागावेत याला काय जीवन म्हणायचे?

कारकून : जोपर्यंत जग लोअर डिव्हिजन क्लार्क आणि अप्पर डिव्हिजन क्लार्क अशा दोन गटांत दुभंगलेले आहे तोपर्यंत जगाची फाईल कधीच निकालात निघायची नाही.

कारकुनिका : जगात सगळे काही ठीक आहे, फक्त ही सुमी कार्टी ट्रॅन्स्फर होऊन टळेल तर बरे होईल. अकाउन्टस्मधल्या बन्या बागळेने मला सिनेमा दाखवला तर हिच्या काकाचे काय जाते?

नवरा : आपली ही मौखिक मंथन सोडून मौलिक मनन करील तर जगातला अर्धा गोंगाट कमी होईल. उरलेला अर्धा गोंगाट कमी होण्यासाठी शेजारच्या कुळकर्णी वहिनींची दातखीळ बसायला हवी.


○

# बर्लिनचा हुंदका

सोनियाचा दिवस नि काळाकुट्ट दिवस ! प्रत्येक राष्ट्राला नि व्यक्तीला आपल्या जीवनात केव्हा न केव्हा तरी अनुभवावे लागणारे दोन दिवस ! देशभक्तांच्या रक्ताचे पाट वाहून गेल्यानंतर एखाद्या राष्ट्राच्या भाग्यवान पिढीच्या वाटयास येणारा सोनियाचा अमृतमय दिवस आणि बेवकूफ तथाकथित शांतिभाटांच्या अक्षम्य घोडचुका नि प्रमादापायी एखाद्या राष्ट्राच्या दुर्भागी पिढीच्या नशिबी येणारा गुलामगिरीचा काळाकुट्ट दिवस !

सोनियाचा दिवस हा बुद्धीला नि भावनेला पटणारा विचार ! पण काळाकुट्ट दिवस ? दिवस आणि काळाकुट्ट ? विसंगती वाटेल क्षणभर ! पण थोडया विचारांती बुद्धीला आकलन होईल, की एखाद्या राष्ट्राच्या जीवनात अनपेक्षितपणे उगवणारा दिवस, त्यावर उगवणाऱ्या सूर्याच्या तेजःपुंज प्रभा फाकूनही, काळाकुट्ट असू शकतो !

१५ ऑगस्टचा दिवस नाही का भारताच्या आयुष्यात एकाच वेळी सोनियाचा नि काळाकुट्ट ठरला ? सोनियाचा एवढयाचकरिता, की त्या दिवशी दीडशे वर्षांच्या दास्यशृंखलातून भारत मुक्त झाला; आणि काळाकुट्ट अशाकरिता, की त्याच दिवशी भारतीय राष्ट्रपुरुषाच्या देहाची दोन शकले झाली.




हीच ती बर्लिन भिंत

वैभवशाली जर्मन राष्ट्राच्या जीवनातही असे दोन दिवस उगवले. व्हर्सायच्या गुलामगिरीच्या तहाचा कागद टरकावून हिटलरने त्याचे तुकडे केले तो १९३९ मधला सोनियाचा दिवस आणि जागतिक सत्तालोभाच्या पिपासेपायी हिटलरने जर्मनीच्या वाटयास आणून दिलेला १९४५ मधला काळाकुट्ट दिवस ! ज्या दिवशी रशियाच्या नि अमेरिकेच्या सैन्याने सबंध जर्मन राष्ट्राचा पुरा कबजा घेतला नि जर्मनीचे दोन विभाग पाडून आपापल्या मर्जीतल्या राजकर्त्यांची कळसूत्री बाहुली निर्माण केली तो जर्मनीच्या वाटयास आलेला काळाकुट्ट दिवस !

परंतु विजिगीषू जर्मन राष्ट्राचे दुर्भाग्य इथेच संपले नाही. दुर्दैवाचा दुसरा एक प्रचंड हादरा जर्मनीला बसला. दोन जर्मन राष्ट्रेच काय पण त्या राष्ट्राच्या जग-द्विख्यात बर्लिन राजधानीचेही दोन तुकडे पाडण्यात आले. केव्हा ? १९६१ मधल्या १३ ऑगस्ट या दिवशी ! दुसऱ्या जागतिक युद्धाच्या समाप्तीनंतरही चालू राहि-लेल्या राजकीय तत्त्वज्ञानाच्या संघर्षाची १९६१ च्या १३ ऑगस्ट या दिवशी सांगता

— — — — — — —

**चित्तरंजन घोटीकर**

— — — — — — —

झाली. पूर्व बर्लिन नि पश्चिम बर्लिन ! युद्धोत्तर मानवतेने एकाच उत्कृष्ट शिल्पाची अविचारापोटी निर्घृणपणे स्वहस्ते केलेली दोन शकले !

असे काय घडले या दिवशी ? एक अमानुष घटना घडली. युद्धसमाप्तीनंतर, १९४५ पासूनच, पूर्व जर्मनीतून (German Democratic Republic) पश्चिम जर्मनीत (Federal Republic of Germany) अखंडपणे वाहणारा निर्वासित जर्मन मानवतेचा प्रचंड लोंढा १३–८–१९६१ रोजी एकाएकी खाड्कन थांबला. का ? काय घडले एकाएकी ? 'शेतकऱ्यांच्या नि कामकऱ्यां'च्या सुखासीनतेची नि समृद्धीची प्रतिज्ञा घेतलेल्या जर्मन शासनकर्त्यांनी या दिवशी सकाळी १० वाजता बर्लिनच्या सभोवतालच्या सत्तर मैलांच्या सीमेपर्यंत अकाळ–विकाळ रणगाड्यांचा धिंगाणा घातला. हे रणगाडे संगीनधारी सैनिकांसह बर्लिनच्या वेशीपर्यंत घणघणाट करीत सैरावैरा पिसाटपणे धावत सुटले. वेशीवर त्यांनी फेरा धरला. या रण-गाड्यांच्या संरक्षणाखाली, वेशीवर त्यापूर्वीच दबा धरून बसलेल्या सशस्त्र सैनि-कांनी असंख्य लॉऱ्यांमधून भराभर काँक्रीटचे भक्कम खांब, भयंकर काटेरी तारांची वेटोळी नि अडथळे निर्माण करण्याचे तत्सम इतर साहित्य मोठ्या प्रमाणावर उतरविले. या पिसाट घुमश्चक्रीच्या काही थोडा वेळ अगोदरच, बर्लिनच्या पूर्व भागातून, अनेक जर्मन निर्वासित बर्लिनच्या विमुक्त पश्चिम भागात रेल्वेने प्रवास करून आले होते. या भोळ्याभाबड्या, निष्पाप निर्वासितांना पुसटही कल्पना नव्हती, की आपणांस सबंध बर्लिन शहरातून वेशीपर्यंत घेऊन आलेली गाडी ही शेवटचीच होती. १३–८–१९६१ रोजी सकाळी सात वाजताच बर्लिनच्या सीमा-रेषेपर्यंत येऊन पोहोचलेल्या निर्वासितांची रणगाड्यांच्या नि लॉऱ्यांच्या या घुम-श्चक्रीने अक्षरशः गाळण उडाली. ते सैरावैरा पळत सुटले. तथापि, त्यांना कोंडीत पकडण्यात आले. जगायचे की मरायचे ? त्यांच्यासमोर समस्या उभी ठाकली. जीव मुठीत घेऊन ते धूम पळत सुटले. वाट फुटेल तिकडे ! कित्येकजण गोळ्यांना बळी पडले. अनेकांनी वेशीवरील 'स्प्री' नदीत स्वतःला धडाधड झोकून दिले. कारण सीमाबंदीच्या नि तटबंदीच्या या 'लोकशाही उपक्रमा'त तोपर्यंत 'स्प्री' नदीचा समावेश करण्यात आला नव्हता. 'स्प्री'मधून पोहत पोहत हे सुदैवी जीव पश्चिम भागातील दुसऱ्या किनाऱ्यावर येऊन पोहोचले.

राष्ट्रा-राष्ट्रांची एकच अखंड नि संलग्न भूभागाची फाळणी ही एक युद्धोत्तर हिंस्र मानवीकृती ! भारताची फाळणी, पॅलेस्टाईनची फाळणी, व्हिएटनामचे तुकडे, कोरियाचे विभाजन, जर्मनीची शकले ! असे हे राष्ट्रा-राष्ट्रांचे कृत्रिम विभाजन ! तथापि, एकाच कुटुंबाचे विभाजन होत असते; कित्येक वेळा ते अपरिहार्यही असते, या सामान्य नियमानुसार राष्ट्रा-राष्ट्रांची फाळणी ही एक वेळ बुद्धीला पटूही शकेल. परंतु वैभवशाली जर्मनीच्या विभाजनाबरोबरच त्याच्या अतिसुंदर बर्लिन राजधानीचेही विभाजन ? विभक्त कुटुंबाबरोबरच कुटुंबातील कर्त्यासवरत्या

देहाचेही तुकडे ? नुसतीच निर्बुद्ध नाही तर अमानुष वाटते ही घटना ! तथापि, लोकशाहीची, व्यक्तिस्वातंत्र्याची, आचार–विचार स्वातंत्र्याची ग्वाही देणाऱ्या युद्धोत्तर मानवतेने हेही शक्य करून दाखविले. शून्यातून स्वर्ग निर्माण करावा त्याप्रमाणे शिस्तबद्धपण नि पूर्वनियोजनानुसार हिटलरने निर्माण केलेल्या जगप्रसिद्ध बर्लिन शहराचे दोन विभाग केले गेले. पूर्व बर्लिन नि पश्चिम बर्लिन ! रमणीय नि वैभवशाली बर्लिनच्या बरोबर मधोमध राक्षसी भिंत बांधली गेली.

बर्लिनची भिंत ! बर्लिन वॉल ! हिंस्र मानवीकृतीचे जिवंत प्रतीक ! युद्धोत्तर विश्वाला चांगलेच ज्ञात असलेले ! "ही भिंत आम्ही जरूर जमीनदोस्त करू; पण त्याबद्दल फक्त संबंधित नेत्यांत काही देवाणघेवाणीच्या उपयुक्त वाटाघाटी झाल्या तरच !" प. जर्मनीचे भूतपूर्व परराष्ट्रमंत्री विली ब्रँट वदून गेले. "भावा–भावांमधले, माय-लेकींमधले, कूजनात रमलेल्या नि प्रीतिगानात धुंद झालेल्या प्रेमिकांमधले, पालक-पाल्यांमधले हे अजस्र भिताड जमीनदोस्त करून टाकून आम्हा भ्रात्यांना एकमेकांस कडकडून मिठी मारायची आहे," हीच आजच्या जर्मन जनतेची–विशेषतः बर्लिनवासियांची–तीव्र भावना आहे. या ध्येयाच्या पूर्ततेकरिता चोरून–मारून, सशस्त्र रशियन रक्षकांची नजर चुकवून, हे भिताड ओलांडून, पूर्व भागातून पश्चिम भागात जीव मुठीत धरून पळून येणाऱ्या कित्येक निष्पाप बालकांची नि स्त्री–पुरुषांची सीमेवरच हत्या झाली. काही सुदवी जीव यशस्वी झाले; ही दुस्तर भिंत अनेक क्लृप्त्या–युक्त्यांनी ओलांडून पल्याड गेले; तर अनेक दुर्भागी जीव रक्ताच्या थारोळ्यातच कुजून मेले.

"ही भिंत उखडून टाकली जाईल ! पण स्वाभिमानाचा नि प्रतिष्ठेचा बळी देऊन नाही !" विली ब्रँट म्हणाले. सबंध जर्मन जनतेच्या भावनाच नाही का व्यक्त झाल्या या उक्तीत ?

१३ ऑगस्ट १९६१ पासून लाखो बर्लिनवासियांना चालू शतकातल्या या कुरूपतेच्या नि असुंदरतेच्या सहवासात जीवन कंठावे लागत आहे. 'कुरूपतेचा, विद्रूपतेचा अपरिहार्य सहवास', हे एका फ्रेंच पत्रकाराचे उद्‌गार आहेत. किती यथार्थ नि सूचक ! दोन जिवलग सख्यांची, दोन भ्रात्यांची, एकाच रक्ताच्या दोन मानवी देहांची विभागणी ! कृत्रिम नि अनैसर्गिक ! मानवतेची मूल्ये मानणाऱ्या, जोपासणाऱ्या, प्रीतिबंधने जाणणाऱ्या मानवतेने याविरुद्ध आवाज उठविला; निषेध नोंदविला; टाहो फोडून जगाच्या वेशीवर ही व्यथा टांगली. पण या भिताडातला एकही दगड इकडचा तिकडे सरकला नाही. भगदाड दूरच राहो, पण एखादे छोटे भोकही या भिंतीत पडू शकले नाही. कसे पडणार ! धगधगत्या नग्न संगिनींचा अहोरात्र जागता पहारा असल्यावर तिला कोण नि कसे भगदाड पाडण्यास धजणार ! उलट आता तर बर्लिन भिंतीच्या पक्केपणात, मजबुतीत, क्रूरतेत अवजड नि अतिभयानक भरही घातली गेली आहे. देहाचे जाळून क्षणार्धात भस्म करणाऱ्या

विजेचा प्रवाह खेळणाऱ्या अणकुचीदार तारांच्या भेंडोळयांनी हे भिंताड मढविले गेले आहे. 'आधुनिक बंदिस्तते'वर 'अत्याधुनिक तटबंदी'चा अंगरखा पांघरण्यात आला आहे. आ वासणारे, मृत्यूला आमंत्रण देणारे खंदक खोदण्यात आले आहेत !

तथापि, रोखल्या गेलेल्या संगिनींच्या सामर्थ्याने दडपून टाकलेल्या मानवतेच्या श्वासांचे हुंकार बाहेर कसे फुटणार ! 'असे घडले नाही हो !' म्हणून अट्टाहासाने तारस्वरांत जगाला ओरडून सांगण्याचे कम्युनिस्टप्रणीत पूर्व जर्मनीच्या शासनाचे नित्याचेच प्रयत्न फोल ठरले आहेत. 'फॅसिस्टांपासून बचाव करण्याकरिता निर्माण केलेली सीमाबंदी', 'शांततेच्या, कायद्याच्या, सुव्यवस्थेच्या रक्षणाकरिता अंमलात आणलेली अपरिहार्य उपाययोजना,' इत्यादी या भिंतीबद्दलची सोज्वळ बोधवचने जगाच्या तोंडावर फेकूनही कम्युनिस्टेतर मानवांचे समाधान होऊ शकलेले नाही, हे सत्य !

१२ डिसेंबर १९६१ रोजी कॅनडाचे भूतपूर्व पंतप्रधान जॉन डिफेनबेकर म्हणाले, "सिमेंट-दगडांची ही भिंत म्हणजे पूर्व जर्मनीच्या शासनकर्त्यांच्या संपूर्ण अपयशाचे नि राजकीय दिवाळखोरीचे एक भरभक्कम प्रतीकच आहे. संभाव्य परचक्रापासून स्वसंरक्षणाकरिता जगातल्या अनेक राष्ट्रांनी बांधलेल्या दगडांच्या भिंती इतिहासाने पाहिल्या. इतिहासाच्या पानापानांवर त्यांची नोंद झालेली दिसेल. परंतु भावनिक नि राष्ट्रीय एकात्मतेच्या बंधनांनी जखडलेल्या सबंध लोकवस्तीच्या झुंडीच्या झुंडी राष्ट्राच्या एका भागातून दुसऱ्या भागात जाण्यापासून परावृत्त करण्याकरिता जाणूनबुजून निर्माण करण्यात आलेल्या या बर्लिन-भिंतीसारखे उदाहरण, याव्यतिरिक्त, दुसरे शोधूनही सापडणार नाही," हे विधान चूक आहे, असा कोणता सच्चा मानवतावादी म्हणेल ?

पूर्व जर्मनीच्या 'कामगारांच्या नि शेतकऱ्यां'च्या शासनाच्या मगरमिठीतून सुटण्याकरिता, १९४५ ते १९६१ च्या दरम्यान, ३,७००,००० पूर्व जर्मनवासी जीव मुठीत घेऊन, सुखी जीवनाचे नवीन दालन उघडण्याच्या हेतूने, पश्चिम जर्मनीत पळून आले. नाना मार्गांनी ! नुसत्या जुलै १९६१ मध्येच ३०,४१५ निर्वासित पळून आल्याची नोंद आहे. का हे लोक आले पळून ? अन्नधान्याचा अपुरा पुरवठा, जीवनावश्यक वस्तूंची चणचण आणि किरकोळीने विकल्या जाणाऱ्या जीवनोपयोगी वस्तूंच्याही राष्ट्रियीकरणाच्या विचारांचे वारे, हीच कारणे ! दुसरे काय असणार ? पळून जाणाऱ्यांचा बंदोबस्त करण्याकरिता भिंत बांधली जाणार आहे, अशा दाट अफवांचा इन्कार जरी 'वॉल्टर उल्ब्रिच' या पूर्व जर्मनीच्या पंतप्रधानाने केला असला तरी, कडक बंदोबस्त करून सीमाबंदी जारी केली जाणार आहे, अशा वृत्तपत्रांतील बातम्यांमुळे नि आकाशवाणीवरील तत्सम सूचनांमुळे, धोक्याची चाहूल हेरून, कित्येक पूर्व जर्मनवासी सावध झाले होते. १९६१ च्या ऑगस्टच्या पूर्वार्धात पश्चिम बर्लिनमध्ये पळून आलेल्या २,००० निर्वासितांची नोंद

आहे. हा दररोज पळून येणाऱ्या निर्वासितांचा आकडा आहे, हे लक्षात ठेवण्यासारखं आहे. तथापि, १३ ऑगस्ट १९६१ हा दिवस उजाडला नि वर वर्णन केल्याप्रमाणे निर्वासितांचा हा प्रवाह खाड्कन थांबला; नव्हे तो रोखण्यात आला.

१३ ऑगस्टनंतर, रणगाडयांच्या नि लॉऱ्यांच्या घुमश्चक्रीनंतर मात्र पाचच दिवसांनी 'शेतकऱ्यांच्या नि कामगारां'च्या शासनाने सीमाबंदी जारी केली. बर्लिनचे भिताड बर्लिन शहराच्या बरोबर देहामधून बांधून काढीत आणल्यामुळे, शहराच्या पूर्व भागात भितीस संलग्नपणे लागून असलेली सर्व घरे जबरदस्तीने खाली करण्यात आली. ऑक्टोबर १९६५ मध्ये या घरांचे तळमजलेच ठेवण्यात आले; खिडक्या नि दरवाजे उंच बांधलेल्या भिताडाने झाकून टाकण्यात आले. आपल्या माता–पित्यांपासून अशा रीतीने अनपेक्षितपणे दुरावलेल्या, विभागलेल्या बालकांना पश्चिम भागाकडून दुसऱ्यांच्या खांद्यावर किंवा डोक्यावर उभे राहून, पलीकडे डोकावूनच, आपली मीलनाची इच्छापूर्ती करावी लागली. तथापि, या राक्षसी अडथळयाला नि अणकुचीदार तारांच्या मेंडोळयांना न जुमानता, १३–८–१९६१ नंतर २४,५०० पूर्व जर्मन निर्वासित पश्चिम जर्मनीत, आपल्या हृदयाचे ठोके मोजीत, पळून आले. कम्युनिस्ट शासनाने या निर्वासितांचा 'राष्ट्राचे शत्रू', 'देशद्रोही' या नित्याच्याच शेलक्या 'गौरवास्पद' विशेषणांनी 'गौरव' केला. सीमेवर सज्ज ठेवलेल्या सशस्त्र रक्षकांना या 'पलायनवाद्यां'ना गोळया घालून जागच्या जागी ठार करण्याचे हुकूम देण्यात आले. पूर्व जर्मनी नि पश्चिम जर्मनी अशी विभागणी केलेल्या ८६५ मैलांच्या या विभाजनरेषेच्या आसपास, पळून जाण्याचा प्रयत्न करणारांपैकी १४६ निर्वासितांना गोळयांनी यमसदनास पाठविण्यात आले. सशस्त्र रक्षकांपैकीच जे पश्चिम भागात भीतीने पळून आले त्यांनी दिलेल्या आकडयांवरून सुमारे २,००० रक्षक स्वतःच पश्चिम भागात पळून आले. त्यांच्याच निवेदनाप्रमाणे, त्यांच्याच शासनाच्या केवळ समाधानाकरिता, भूतदया म्हणून, निर्वासितांवर बंदुकी न चालवता, त्यांनी हवेतल्या हवेतच वार काढले. शासनाच्या रोमारोमांत भिनलेल्या सूडाचे निव्वळ नाटक केले.

पूर्व जर्मनीच्या कम्युनिस्ट शासनाचा त्यांनीच नेमलेल्या या तरुण सशस्त्र रक्षकांवरही विश्वास नसावा असे दिसते. बर्लिन भितीच्या सीमाबंदीवर २१४ निरीक्षण केंद्रे असून (Observation Posts) त्यांपैकी एक ६० फूट उंच आहे. या सर्व निरीक्षण केंद्रांवर झगझगीत प्रकाशझोत पाडणारे विद्युत शोधक-दीप (Search Lights) बसविले असून ती टेलिफोन्सनीही सुसज्ज आहेत. त्यांवर अहोरात्र जागता पहारा करणाऱ्या सशस्त्र रक्षकांच्या दोन पाळया आहेत. त्यांची कामे दोनच! डोळयांत तेल घालून चोवीस तास पहारा करणे नि त्याचबरोबर आपल्याच इतर रक्षकबंधूंवरही सूक्ष्म पाळत ठेवणे. शासनकर्त्यांचा नि त्यांच्याच प्रजाजनांचा असा हा परस्पर विश्वासाचा मामला आहे. धन्य ते शासनकर्ते नि धन्य ते प्रजाजन!

' सहकार्याच्या नि परस्पर विश्वासा 'च्या या विक्षिप्त जीवघेण्या खळामुळेच खुद्द अनेक रक्षकच नजर चुकवून पश्चिम भागात पळून आले असल्यास नवल काय ! तीही माणसेच नव्हेत काय ? त्यांनाही आपला जीव प्यारा नाही का ?

या ' आधुनिक सीमाबंदी 'बरोबरच सुमारे ५०० मैलांच्या जमिनीच्या पट्ट्यांवर खोल खंदकही खणले असून त्यांतही अहोरात्र पहारा चालू असतो. या खंदकांतही झगझगीत प्रकाशाचे ५७ विद्युत-दीप आपले कार्य करीत असतात.

या बर्लिन–भिताडामुळे नि खंदकामुळे मूलभूत मानवी हक्कांची नित्य पायमल्ली चालू असल्याने, एक तिरस्करणीय राक्षसी वास्तू म्हणूनच पश्चिम जर्मन-जगत त्याकडे बघते.

' ला व्हेरिटे टोगोलेज ' (La Verite Togolaise) या पत्राचा प्रमुख संपादक ' जोसेफ विलसन ' नमूद करतो की, " या भिताडापलीकडील पूर्व जर्मन-जगात भाषण-स्वातंत्र्य नि मत-स्वातंत्र्य ही नित्य पायदळी तुडविली जात आहेत. " तसेच " या कृत्रिम सीमाबंदीमुळे आपली स्वत:चीच किती मानहानी झाली आहे नि आपल्या प्रतिष्ठेलाही किती जबरदस्त धक्का बसला आहे, याची जाणीव सोव्हिएट राजकर्त्यांना व्हायला पाहिजे " असेही तळमळीचे उद्गार इंग्लंडचे भूतपूर्व पंतप्रधान सर अ‍ॅलेक्स डग्लस होम यांनी काढले आहेत.

बर्लिन-भिंतीच्या या मानवनिर्मित अघोरी उपाययोजनेमुळे सीमाबंदीच्या दोन्ही बाजूंस राहणाऱ्या बर्लिन वासियांच्या कोमल भावना जोझ् ल्यूना कॅस्ट्रो या फिलिपाईन्सच्या एका पत्रकाराने यथार्थपणे शब्दांकित केल्या आहेत. तो लिहितो, "नाजुक नि मृदू मानवी भावनांचे खच्चीकरण नि दयार्द्र निष्पाप मानवतेची निर्घृण हत्या यांचे मूर्तिमंत करुण प्रतीक म्हणजे आजचे बर्लिन होय ! सोव्हिएट शासनाने जुलूम-जबरदस्तीने लादलेल्या या अनैसर्गिक नि कृत्रिम विभाजनातूनच ही अमानुषता जन्मास आली आहे. हे विभक्तीकरण साफ खोटे आहे; मूलभूत मानवी भावनांच्या विरुद्ध आहे. कारण जिच्यावर ते लादले गेले आहे, ती पवित्र भूमी न्यायाचा नि सत्याचा विचार करता, एकाच मातीची आहे; तिचे सर्व कण संलग्नपणे एकमेकांना घट्टपणे बिलगून बसले आहेत; त्यांची जाती एकच आहे; त्यांचे विभाजन असह्य नि अशक्य आहे."

एकाच रक्तामांसाच्या लाखो देहांचे विभाजन करणाऱ्या या बर्लिन-भिंतीचा ' शृंगार ' तरी किती पाहा : १३ ऑगस्ट १९६१ नंतर बांधून काढलेल्या या भितीची एकूण आजपर्यंतची लांबी आहे १५ किलो मीटर ! मुद्दाम अडथळा निर्माण केलेल्या भागाची, पाडलेल्या घरांसहित, लांबी २४·२ किलो मीटर ! तिच्या सर्वांगावर वेढलेल्या अणकुचीदार तारांच्या मेंडोळ्यांची लांबी १३९·६ किलो मीटर ! वापरण्यात आलेल्या या तारेची एकूण लांबी १२,००० ते १४,००० किलो मीटर ! भिंतीच्या बाजूला खोदलेले खंदक ८२ किलो मीटर ! विद्युत्

प्रवाह खेळविलेल्या तारांच्या कुंपणाची लांबी ४१·५ किलो मीटर ! ऑगस्ट १९६६ पर्यंत तयार केलेली 'आधुनिक तटबंदी' २८·२ किलो मीटर ! १३–८–१९६१ नंतर साफ मोकळा केलेला दाट वृक्षराजींचा संरक्षित पट्टा, पाऊल टाकल्यास मृत्यूच आ वासून ठाकलेला विस्तीर्ण प्रदेश आणि भितीच्या आसपासचा प्रदीर्घ पट्टा मिळून एकूण ५००,००० ते ५५०,००० चौरस मैल !

या राक्षसी भितीच्या अल्याड नि पल्याड राहणारे सर्व बर्लिनकर, "श्वासांनो ! जा वायुसंगे ओलांडून भित अन् आईला कळवा अमुच्या हृदयांतील खंत।" हीच कुसुमाग्रजांची काव्यपंक्ती आर्तपणे मानवतेला ऐकवीत असतील काय ? बर्लिनचा हा हृदय गलबलून टाकणारा हुंदका 'एकात्म-मानवते'चे धडे देणाऱ्या प्रागतिक लोकशाहीला पाझर फोडील काय ? ○


वीर सावरकर, आत्मार्पण दिनानिमित्त विशेष सूट !

रुपये ४ ची पुस्तके २॥ रुपयांत

प्रचलित विचारांना हादरा देणारे आणि खळबळ माजविणारे

## स्वा. वीर सावरकर यांचे विज्ञाननिष्ठ निबंध

**भाग १ : पृष्ठे ८४ : मूल्य २ रुपये**

★ मनुष्याचा देव नि विश्वाचा देव ! ★ ईश्वराचे अधिष्ठान म्हणजे काय ? ★ खरा सनातन धर्म कोणता ? ★ यक्ष (पूर्वार्ध–उत्तरार्ध) ★ गोपालन–गोपूजन नव्हे ! ★ हा बौद्धिक आवडेपणा नव्हे काय ?

**भाग २ : पृष्ठे ९३ : मूल्य २ रुपये**

★ दोन शब्दांत दोन संस्कृती ! ★ आजच्या सामाजिक क्रांतीचे सूत्र ★ पुरातन की अद्यतन ? ★ मंत्र : यंत्राने का बेकारी वाढते ? ★ न जनयेत बुद्धिभेदम् म्हणजे काय ? ★ जर का आज पेशवाई असती ? ★ आमच्या धर्मभावना दुखवू नका अं !

हे विचारप्रवर्तक निबंध असलेली चार रुपयांची दोन पुस्तके

केवळ अडीच रुपयांत + टपालव्यय एक रुपया

**दोन्ही पुस्तके छापून तयार आहेत.**

आमच्याकडे किंवा आपल्या पुस्तक विक्रेत्यांकडे मागणी करा.

समग्र सावरकर वाङ्मय खण्ड १ ते ८ : पृष्ठे ५६०० : मूल्य १२०

लिहा : **वीर सावरकर प्रकाशन**

**सावरकर सदन, ७१ शिवाजी उद्यान, मुंबई २८**

# संगणक....म्हणजे आपला कॉम्प्युटर

दत्तप्रसाद दाभोळकर

कृपया तुमची नोंदवही उघडा. आणि न विसरता एका तारखेची नोंद करा. मंगळवार तारीख २१ जानेवारी. या दिवशी भारतीय शास्त्रज्ञांनी भारतात बनविलेल्या संगणकाचे मुंबईत औपचारिक उद्‌घाटन झाले. अगदी तुम्ही आयुर्विमा कॉर्पोरेशनमध्ये नोकरीला नसलात तरी या संगणकांच्या खूप गोष्टी तुम्ही ऐकल्या असतील ! हे यांत्रिक मेंदू फक्त गणितेच करतात असे नव्हे तर खूप आश्चर्यकारक गोष्टी करते. परवा उद्‌घाटन झालेला हा आपला भारतीय संगणक एका सेकंदात दोन लक्ष पन्नास हजार बेरजा-वजाबाक्या करू शकतो. शास्त्रज्ञांच्या कामातील चुका शोधतो. शत्रुपक्षाची विमाने येत असतील तर त्यांचा मार्ग आणि वेगसुद्धा आधी सांगू शकतो.

परवाच्या उद्‌घाटन समारंभाच्या वेळी या यांत्रिक मेंदूच्या बुद्धिमत्तेची पहिली चुणूक कळली. डॉ. सेठना आणि विक्रम साराभाई ज्या वेळी या संगणकाला सामोरे गेले, त्या वेळी मिस्किल डोळ्यांच्या या संगणकातून पटकन एक चिठ्ठी बाहेर पडली, " आपल्यासारखे सन्मायनीय पाहुणे माझ्या वाढदिवसाला आले याचा मला खूप आनंद होतोय ! " तुमच्या माझ्यासारख्या माणसाला भुताटकी वाटावी अशी ही गोष्ट. हे विक्रम साराभाई हे या संगणकाला कसे कळले ? यांचे स्वागतच करावे असे त्याला का वाटले ? क्षणभर घाबरून जावयास झाले. तुम्हांला म्हणून सांगतो. पाठीमागच्या रांगेत मी उभा होतो. पण संगणकाला सामोरे जावयाची काही हिंमत झाली नाही. घ्या काय, या संगणकातून कदाचित चिठ्ठी बाहेर आली असती, " महाशय, तुम्ही दुसऱ्या माणसाच्या आमंत्रणपत्रिकेवर या कार्यक्रमाला हजर आहात आणि नंबर एकचे मूर्ख आहात ! " बाहेरच्या बाहेर सुबाल्या करताना एक मात्र ठरवले. पुन्हा कधी याला भेटावयास आलो तर याच्या समोर जोरात ' इंग्रजी हटाव ' म्हणून घोषणा द्यावयाची. पाहूया तरी इंग्रजीत उत्तरे देणारा हा बच्चंजी काय उत्तर देतोय ते !

बाकी या यांत्रिक मेंदूची बुद्धिमत्ता ही साऱ्या मानवजातीलाच काही दिवसांनी फार मोठी डोकेदुखी होईल. निदान विज्ञानक्षेत्रात दादा समजल्या जाणाऱ्या आय-

झॅक अॅसिमॉवला असे वाटते. तो म्हणतो, " आज हे यांत्रिक मेंदू मानवी मेंदूपेक्षा फार खालच्या पातळीवर आहेत हे खरे. कारण मानवीमेंदू हा कोटयवधी पेशींचा बनविलेला आहे, तर हे यांत्रिक मेंदू फक्त काही सहस्र विद्युत् पेशींचे बनविलेले आहेत. वरवर पाहता मानवी मेंदूइतका कार्यक्षम असा यांत्रिक मेंदू बनावयास खूप खूप वर्षे लागतील. पण वस्तुस्थिती वेगळी आहे. कारण आणखी काही दिवसांनी आपण जे यांत्रिक मेंदू बनवू ते मानवी मेंदूइतके हुशार नसतील. पण ते यांत्रिक मेंदू स्वतःहून हुशार असे यांत्रिक मेंदू आपोआप बनवू शकतील. एकदा अशी यांत्रिक मेंदूने स्वतःहून हुशार असे यांत्रिक मेंदू बनवावयाची प्रक्रिया सुरू झाली की अल्पावधीत मानवी मेंदूपेक्षा अनेक पटींनीने हुशार असे यांत्रिक मेंदू तयार होतील !–आणि मग हे यांत्रिक मेंदू मानवाला बाजूला सारून स्वतःच पृथ्वीचे राज्य करतील. एक वेळ स्वतःच निर्माण केलेल्या या भस्मासुराचा दास बनण्याची पाळी विज्ञानाच्या शिवशक्तीवर येईल !" ☐

---

# औषध नलगे मजला

---

भावनेला व्यवहारात खरोखरच काही स्थान असते का? असावे का? गोहत्येच्या संदर्भात हा प्रश्न अनेकदा विचारला गेला आहे. एका वेगळ्या संदर्भात या प्रश्नाचं उत्तर शास्त्रज्ञांनी नुकतंच दिलंय. इंग्लंडमधील ' जर्नल ऑफ मेडिसिन '-मध्ये आलेला हा मजेशीर किस्सा बघा. एका डॉक्टरने मधुमेहाने पछाडलेले एकशे चाळीस रोगी निवडले. या सर्व रोग्यांना कायम ' सल्फा औषधे ' घ्यावी लागत. ही औषधे घेतली नाहीत तर त्यांची प्रकृती बिघडत असे. या डॉक्टरने त्या रोग्यांना सल्फा औषधांऐवजी सहा महिने अत्याधुनिक स्वरूपाच्या ' प्लॅस्बो गोळ्या ' दिल्या. या गोळ्या रंगीबेरंगी होत्या. त्यांची खूप जाहिरात करण्यात आली होती. जालीम स्वरूपाच्या गोळ्या म्हणून डॉक्टरांनी या गोळ्यांची खूप प्रशंसा केली होती. सहा महिन्यांत त्यापैकी एकाही रोग्याने आपली प्रकृती बिघडल्याची तक्रार केली नाही. म्हणजे त्या रोग्यांना सल्फा औषधांऐवजी प्लॅस्बो गोळ्या घेऊन चालले असते. आणि हे सर्व झाल्यावर त्या डॉक्टरने जाहीर केले, " प्लॅस्बो गोळ्यांत कोणतेच औषध नाही. हे रोगी कारण नसताना सल्फा औषधावर पैसा खर्च करीत आहेत !"

अनंत काणेकरांच्या ' रुपेरी वाळू 'वर, वरताण करणाऱ्या या प्रयोगाने वैज्ञानिक क्षेत्रात सध्या वादळ माजले आहे. माणसाच्या आजारपणात त्याच्या भावनेला सर्वांत अधिक महत्व आहे. आणि धंदेवाईक औषधी कंपन्या कारण नसताना जाहिरातबाजीच्या जोरावर मानवाला औषधाच्या नादी लावत आहेत, असे सांगणारा

एक वर्ग आता तयार होतो आहे. न्यूयॉर्क विद्यापीठातील वैद्यकीय विषयाचा प्राध्यापक डॉ. फ्रँक पाश्चर याने तर कमाल केली. त्याने अनेक प्रकारच्या रोग्यांना ही जालीम स्वरूपाची प्लॅस्बो औषधे दिली. तो म्हणतो, "कोणतेही औषध नसलेल्या या प्लॅस्बो गोळ्यांनी रोगी केवळ बरे होतात असे नव्हे, तर एखाद्या औषधाने मळमळणे, ओकारी येणे, जादा झोप येणे वगैरे ज्या गोष्टी घडतात त्यासुद्धा या प्लॅस्बो गोळ्यामुळे घडतात. कारण आजारपणात मानवाची इच्छाशक्ती खरी महत्त्वाची आहे. दुर्बळ मानवाला औषधाचा गुलाम बनविणे तर चूक आहे." एक गोष्ट खरी. आजच्या 'अपोलो' आणि 'सोयुज'च्या युगात माणूस विज्ञानाच्या लंब्याचवड्या गप्पा मारतोय. पण स्वतःचे मन, मेंदू, भावना या गोष्टी त्याने अजून शास्त्रीय पद्धतीने नीटपणे समजावून घेतलेल्या नाहीत. मानवी मन, मानवी भावना या काही अद्भुत शक्ती आहेत. उपवासाने आणि लंघनाने माणूस बरा होतो हे कदाचित म्हणूनच शक्य आहे. कारण लंघनात तुमच्या शरीराच्या नैसर्गिक गरजा आणि अडचणी यांच्यावर मात करावयास तुमच्या मनाला तुम्ही तयार करत असता.

जसजसे दिवस जातील तसतसे प्लॅस्बो गोळ्यांचे अधिकाधिक पराक्रम आपणांस ऐकावयास मिळतील. प्लॅस्बो गोळ्यांमागचा सिद्धांत खरा की खोटा हे पण काही दिवसांनी सिद्ध होईल. तूर्तास मात्र, 'औषध न लगे मजला' म्हणणाऱ्या या लोकांनी धंदेवाईक औषधी कंपन्यांची झोप उडवलीय ! ◻


## टोपीवाला....'मिरर स्क्रीन'

३१ जानेवारीला गोरेगावला टोपीवाला चित्रपटगृहाचे उद्घाटन झाले. हे चित्रपटगृह आलिशान आहे, अनेक सुखसोयींनी सुसज्ज आहे, फार अवाढव्य आहे, या साऱ्या गोष्टी खऱ्या. पण या गोष्टी दुय्यम आहेत. भारताच्या नव्हे तर जगाच्या चित्रपट व्यवसायात 'टोपीवाला' हे नाव कायमचे नोंदवावे लागेल. ––एका महाराष्ट्रीय संशोधकाने शोधून काढलेल्या आणि ज्याचे ''जागतिक हक्क' त्या संशोधकाच्या नावावर आहेत अशा एका नव्या कल्पनेवर या चित्रपट गृहाची उभारणी केलेली आहे.

सध्या या चित्रपटगृहात नेहमीप्रमाणेच साध्या पडद्यावर सिनेमा दाखवला जाईल हे खरे. पण काही दिवसांनी या चित्रपटगृहात 'मिरर स्क्रीन' उभारला जाईल. 'मिरर स्क्रीन'चे वैशिष्ट्य हे आहे, की तुम्ही साधा पडदा वापरूनही चित्रपटगृह चालवू शकता. वाटेल त्या वेळी त्याच चित्रपटगृहात तुम्ही मिरर स्क्रीन उभारून त्या चित्रपटगृहातील खुर्च्यांची संख्या तीनशेपर्यंत वाढवू शकता. ही गोष्ट इतकी फायद्याची आहे की, मोठ्या शहरांतील सारी चित्रपटगृहे काही वर्षांतच

मिरर स्क्रीन बसवून घेतील. मॉस्को विद्यापीठातून डॉक्टरेट घेऊन आलेल्या आणि पवईच्या इंडियन इन्स्टिटयूटमध्ये प्रोफेसर असलेल्या डॉ. मराठे यांनी हा मिरर स्क्रीन शोधून काढलाय. आणि हा मिरर स्क्रीन समजावून घ्यावयासही फार सोपा आहे. नेहमीच्या चित्रपटगृहात पडद्यापासून खूप अंतरावर खुर्च्यांची पहिली रांग असते. पडद्याच्याजवळ बसले तर प्रेक्षकांच्या डोळ्यांना त्रास होतो म्हणून ही एवढी जागा फुकट घालवावी लागते. मराठे यांच्या शोधात पडद्याच्या मागे एक आरसा उभारलेला आहे. पडद्याच्या मागील बाजूस उलटी उठलेली प्रतिमा आरशात सरळ उठते. आणि पडद्यासमोरच्या फुकट जाणाऱ्या जागेतील प्रेक्षक त्या आरशात सिनेमा बघतात. आरशाच्या अगदी जवळ बसले तरी डोळ्यांना त्रास होत नाही. उलट अगदी लांब बाल्कनीत बसून सिनेमा बघितल्याचे समाधान मिळते.

साधे चित्रपटगृह





प = पडदा

ख = खुर्च्यांची पहिली रांग

'ख' च्या मागील बाजूचे लोक पडद्यावर सिनेमा बघतात.

'खप' ही जागा फुकट जाते.

मराठे यांचे चित्रपटगृह




प = पडदा

ख = खुर्च्यांची पहिली रांग

आ=आरसा

'ख' च्या मागील बाजूचे लोक पडद्यावर सिनेमा बघतात.

खआ या जागेतील लोक आरशात सिनेमा बघतात.

मिरर स्क्रीनची ही कल्पना तुम्हांला समजली नसली तरी फारसा वैताग करून घेऊ नका. कारण काही तांत्रिक अडचणींमुळे टोपीवाला चित्रपटगृहात मिरर स्क्रीन उभारणे थोडे लांबणीवर पडलेले आहे. पण लवकरच या अडचणीवर मात करून हा आरसा उभारला जाईल. आणि त्या वेळी खुद्द डॉ. मराठेच 'विज्ञानेश्वरी 'त 'मिरर स्क्रीनची गाथा' 'माणूस 'च्या वाचकांना सादर करणार आहेत.

# तीसरी कसम

## एक चित्रकाव्य

हिंदी चित्रपटांतील ख्यातनाम गीतकार ' शैलेन्द्र ' यांनी काही महिन्यांपूर्वी जगाचा निरोप घेतला, पण निधनापूर्वी हिंदी चित्रपटसृष्टीला एक अमोल देणगी दिली. ही देणगी म्हणजेच "तीसरी कसम" ! ' शैलेन्द्र ' यांच्या काव्यात्म वृत्तीची ओळख त्यांच्या गीतांमधून सदैव येत असे, हे तर खरेच; पण ही वृत्ती त्यांनी चित्रपट काढताना ठेवली आहे त्याचे कौतुक करावे तेवढे थोडेच !

चित्रपटाची कथाच मुळात मोठी नाजूक आहे. जणू काव्याचा विषय आहे. तरुणतरुणींच्या भावडचा, निष्काम प्रेमाचे तरल, मृदू चित्रण यात केलेले आहे. हीरामण हा सरळ स्वभावाचा, नेकीने काम करणारा गाडीवान. दुर्दैवाने त्याच्या व्यवसायात त्याला दोन वेळा चांगली अद्दल घडते. एकदा गाडीतून चोरीचा माल दुसरीकडे नेत असताना आणि दुसऱ्या वेळी बांबू–वासे वाहून नेत असताना. ह्या दोनही वेळी त्याला जो त्रास सहन करावा लागतो त्यामुळे तो शपथ घेतो, की पुन्हा म्हणून छकडचातून या गोष्टी न्यायच्या नाहीत. नंतर हीरामण गाडीतून माणसे नेऊ लागतो. एक दिवस एका तमाशातल्या नाचीला दूर लांब जत्रेच्या ठिकाणी पोहोचविण्याची कामगिरी त्याच्यावर येते. हीराबाई नुसती सर्वसामान्य नाची नाही तर एक गुणी कलावती आहे. माणसांची तिला किंमत आहे. पैशापेक्षाही भावना तिला श्रेष्ठ वाटतात. अशी हिराबाई हीरामणच्या निष्कपट, भावडचा स्वभावावर एकदम खूष होते आणि हीराबाईच्या प्रेमळ वागणुकीमुळे भारावला गेलेला हीरामण तिला देवता समजू लागतो. तिच्याबद्दल कुणी वाईट बोलले तर मारामारी करायला धावून जातो. एकमेकांकडे आकर्षित झालेले हे दोघे परस्परांवर अनुरक्त होतात; पण दोघांतील संबंध पवित्र आहेत. हा पवित्रपणा कायम टिकावा, हीरामणचे स्वप्न भंग पावू नये म्हणून हीराबाईला मोठ्या नाइलाजाने त्याच्यापासून दूर जाण्याचा निश्चय करावा लागतो. त्यातून हीराबाईवर आसक्त झालेला जमीनदार तिने साफ नकार दर्शविल्यामुळे हीरामणच्या



राजकपूर । वहिदा रेहमान

जिवावर उठण्याचा संभव असतो. हे सारे आपल्यामुळे होत आहे हे जाणून घेऊन हीराबाई लांब निघून जाते. हीरामणला याचा काहीच अर्थबोध होत नाही. त्याला वाटते, हीराबाईने आपल्याला फसविले; आणि म्हणून तो शपथ घेतो पुन्हा कधी तमासगीर बाईला गाडीतून न्यायचे नाही ! अशा या कथेत सर्वसामान्य प्रेक्षकांना आवडणारा धांगडधिंगा नाही, विनोद नाही. तसला काहीही प्रकार नाही. सारी कथा हीरामण-हीराबाईच्या भोवती फिरविली आहे. त्या दोघांची व्यक्तिचित्रणे जास्तीत जास्त प्रभावी करण्याकडे कटाक्ष ठेवला आहे आणि म्हणूनच चित्र पाहत असताना सुबुद्ध, सुजाण प्रेक्षक कथेत सहज समरस होतो.

कथेतील हळुवारपणा दिग्दर्शक वासू भट्टाचार्य यांनी मोठ्या कौशल्याने आणि तितक्याच नाजूकपणाने टिपला आहे. बंगाली दिग्दर्शक बुद्धी, कल्पकता याची जणू देणगी घेऊनच जन्माला येतात की काय, असे हे चित्र पाहताना वारंवार जाणवत होते. आणि एकाही हिंदी दिग्दर्शकाजवळ हे वैशिष्टच नसावे याचे वाईट वाटते. वासू भट्टाचार्य यांनी कथेशी राखलेला प्रामाणिकपणा कौतुकास्पद आहे. निर्मात्याप्रमाणे दिग्दर्शकानेही कसलीही तडजोड करून चित्र बिघडविले तर नाहीच, उलट काही प्रसंग अशा बहारीने टिपले आहेत की चित्राची खुमारी वाढलीच आहे. हीरामण आणि हीराबाई या दोघांतील कितीतरी प्रसंग असे आहेत, की जे केवळ कल्पक

दिग्दर्शकामुळेच उठावदार झाले आहेत. एकच उदाहरण देतो. हीराबाई गाडीत झोपलेली आहे. तिचे पाय उघडे पडले असून पोटरीवर कसलासा किडा चालताना हीरामणला दिसतो. आता हा किडा हाताने दूर करावा तर हीराबाईचा गैरसमज व्हायचा. तेव्हा त्या स्थितीत तो फुंकर मारून किडा दूर करू पाहतो. या फुंकरीने किडा दूर होत नाहीच, पण हीराबाईला सुखद स्पर्श होऊन ती कूस बदलते. किडा दूर करणे हीरामणला जमत नाही. हा प्रसंग केवळ अभिनयाने, मनात उडालेला गोंधळ स्पष्ट करून चित्रीत करण्यासाठी दिग्दर्शक तसाच समर्थ हवा होता. सुदैवाने वासू भट्टाचार्य ह्या ताकदीचे आहेत.

वासू भट्टाचार्य यांचे कौशल्य व्यक्त होण्यात कलाकारांचाही तितकाच वाटा आहे. राज कपूर, वहीदा रेहमान या कलाकारांचा अभिनयाचा दर्जा, त्यांची समज, या गोष्टी नव्याने सांगायला पाहिजेत असे नाही. हिंदी चित्रसृष्टीत दोघांनी मिळविलेले स्थान त्यांच्या कर्तबगारीची साक्ष पटविणारे आहे. या चित्रात तर दोघांच्या अभिनयगुणांची स्पर्धा पाहताना प्रेक्षक खूष होतो. दोघेही तुल्यबल असले तरी काही प्रसंगी वहीदा रेहमानचे श्रेष्ठत्व विशेष जाणवते. हे प्रसंग केवळ मूक आहेत, त्यात काम फक्त डोळ्यांचे आणि मुद्राभिनयाचे. वहीदाने या प्रसंगाचे अक्षरशः सोने केले आहे. बाकी कलाकार कुणी आवर्जून उल्लेख करावा असे नाहीत.

आता चित्रपटाचे तांत्रिक अंग ! आज हिंदी चित्रसृष्टीत रंगीत चित्रांचा जमाना आलेला. अशा काळात ब्लॅक अॅण्ड व्हाईट चित्र काढणे हे तर धाडसाचेच, पण त्यापेक्षाही कौतुकाची गोष्ट अशी की, चित्र ब्लॅक अॅण्ड व्हाईट असूनही कुठेही खटकत नाही, हे छायाचित्रकाराचे खास कौशल्य ! खेड्यातील वातावरण, जत्रेतील दृश्ये ही छायाचित्रकार सुब्राता मित्रा यांनी मोठ्या कौशल्याने टिपली आहेत. विशेषतः, रात्रीच्या सीन्समध्ये वातावरणातील धूसरता बहारीने व्यक्त झाली आहे. चित्रपटाच्या यशात छायाचित्रकाराचाही फार मोठा वाटा आहे. संगीतकार शंकर जयकिशन यांचे संगीत लयबद्ध, परिणामकारक असले तरी बॅकग्राऊंड म्युझिक विशेष मनोरम आहे. सतारीच्या बहारदार गती विविध प्रसंगांच्या वेळी फारच मोहकपणे ऐकविल्या आहेत. त्यामुळे प्रसंग फुलण्यास मदत होते.

चित्रातील दोषच दाखवायचे तर मध्यंतरापर्यंत कथा काहीशी थंडपणाने चालते, बराच वेळ काही घडत नाही त्या वेळी थोडा कंटाळा येतो ही गोष्ट सत्य असली तरी त्याच वेळी कलाकारांचा अभिनय, तांत्रिक करामती पाहून हा कंटाळा निघून जाण्यास मदत होत असते, ही गोष्ट आवर्जून सांगावीशी वाटते. एकंदरीत हे चित्रपण नुसते चित्रच नाही तर चित्रकाव्य—पाहून काही वेगळे, कलात्मक पाहिल्याचा आनंद निश्चित होतो. म्हणून सुजाण, सुबुद्ध प्रेक्षकांनी तरी त्याची कदर जरूर केली पाहिजे.

—सुधीर दामले

# तुमचे भविष्य

# आमचा अंदाज

श्री. गो. जोशी सायनाचार्य

( ८ ते १४ फेब्रुवारी–राशिभविष्य )

**मेष** : साडेसाती आणि त्यातून मंगळ आठवा. ही ग्रहस्थिती स्वास्थ्य नष्ट करणारी आहे. एकच समाधानाची गोष्ट, सूर्य लाभस्थानी येत आहे. आपले परिश्रम अगदीच वाया जाणार नाहीत.

मुख्यत: या काळात अधिक लक्ष द्या प्रकृतीकडे. सांपत्तिक ताण फारसा जाणवणार नाही. पण अनावश्यक खर्चाला आळा घालण्याची नितांत गरज भासू लागेल.

या वेळी कोणतेही साहस करणे इष्ट ठरणार नाही. व्यापारधंद्यात तर सारे व्यवहार डोळ्यांत तेल घालून करायला हवेत.

महिलांना तर तोंडाला अक्षरश: कुलूप घालण्याशिवाय अन्य मार्ग नाही. प्रत्येक बाबतीत जुळते मिळते घेण्याची प्रवृत्ती ठेवलीत तरच हा अनिष्ट काल निभावून न्याल.

दि. १२ ते १४ घाईगर्दीने अनेक कामे उरकावी लागतील.

**वृषभ** : मंगळ सातवा येणार आहे म्हणून मुळीच डरू नका. गुरू पंचमात असेपर्यंत कोणत्याही ग्रहाला तुमच्याकडे वक्रदृष्टीने पाहण्याचे धाडस करवणार नाही. सहज काही करावे आणि ते अपेक्षेबाहेर यशस्वी ठरावे, असाच तुम्हांला पदोपदी प्रत्यय यायला लागेल. साहित्यसृष्टीत तुमचे महत्त्व वाढेल, वैज्ञानिक क्षेत्रात प्रतिष्ठा उंचावेल, प्रतिभेचा उन्मेष बहरेल, सर्वत्र विक्रमी यश लाभेल.

या आठवड्यापासूनच कर्तृत्वाचे एक वेगळेच दालन उघडले जाईल. अनपेक्षित लाभ होईल, नव्या व्यवसायधंद्याला प्रारंभ होईल, तुमच्या प्रगतीला दाही दिशा अपुऱ्या पडतील. याच आठवड्यात मंगलकार्याचेही ठरेल.

दि. १०–१२–१४ या दिवसांचे महत्त्व प्रकर्षाने जाणवेल.

मिथुन : मंगळाचे षष्ठस्थानी आगमन घडत आहे. विरोधकांना ठोकरून काढणे आता सहजशक्य होईल. आपली सर्व रेंगाळलेली कामे गती घेऊ लागतील. व्यावसायिक संघर्ष मिटतील. स्थावरासंबंधीचा पेचप्रसंग सुटेल.

चौथ्या गुरूबद्दल गैरसमज करून घेऊ नका. तोच तुम्हांला प्रगतीचे नवे क्षेत्र मिळवून देईल. अभिनव-आकर्षक असे काही करून दाखवण्याची तुमची इच्छा याच काली सफल होईल.

कला-क्रीडा क्षेत्रात तुम्हांला आता कोणी प्रतिस्पर्धीच उरणार नाही. सामाजिक क्षेत्रातील मोठया जबाबदाऱ्या उचलाव्या लागतील.

दि. १०–११–१२ अपेक्षेबाहेर यश देणारा काल.

कर्क : लवकरच चौथ्या मंगळाची डोकेदुखी थांबेल, आणि प्रसन्न वातावरण सर्वत्र दिसायला लागेल. तुमचा अनिष्ट काल आता ओसरला असे म्हणायला मुळीच हरकत नाही.

स्थगित कामे गती घेऊ लागतील, हुकलेली संधी पुन्हा लाभेल, उद्योगधंद्यांचे बदललेले तंत्र यशस्वी होत असल्याचा साक्षात्कार घडू लागेल.

यांत्रिक, तांत्रिक व्यवहाराशी आपला संबंध असेल तर त्यामध्ये खूप मोठया उलढाली व्हायला लागतील. स्थावराचा व वाहनाचाही प्रश्न आता सुटायला हरकत नाही. अनारोग्य, सांपत्तिक अडचणी हे सारे प्रकार नाहीसे होतील.

दि. ११ ते १३ या कालावर लक्ष केंद्रित करा.

सिंह : चौथ्या मंगळाची मुळीच खंत बाळगू नका. तो चोरपावलाने येईल आणि मुकाटयाने निघून जाईल. त्याचे अस्तित्वही आपणांस जाणवणार नाही. थोडा खर्च वाढेल, प्रकृतीवरही ताण पडेल. पण त्यामुळे विशेष काही बिघडणार नाही.

या महिन्यात व्यावसायिक प्रगतीची प्रसादचिन्हे दिसायला लागतील.

वक्तृत्व प्रभावी ठरेल, साहित्यात प्रसिद्धी मिळेल, राजकीय वातावरणात वजन वाढेल.

विरोधक थोडाफार त्रास देण्याचा प्रयत्न करतील. पण त्यामुळे तुमची प्रतिष्ठा मुळीच धोक्यात येणार नाही.

उद्योगधंद्यात अनेकांचे सहकार्य लाभेल. दूरचा प्रवासही घडेल.

दि. १२ ते १४ विशेष अनुकूल काल.

कन्या : मंगळासारखा समर्थ ग्रह पराक्रमात येत आहे. आणि तो तिथे ६–७ महिने वास्तव्य करणार आहे. हे अनन्यसाधारण सामर्थ्य सतत तुमच्या पाठीशी

असल्यामुळे, आपण ज्या ज्या क्षेत्रात पाऊल टाकाल तिथे तिथे विक्रम करून दाखवाल. सतत प्रवास घडेल. नोकरीधंद्यात तर अनेक पायऱ्या ओलांडून प्रगतीकडे झेप घ्याल.

सामाजिक–राजकीय प्रतिष्ठा उंचावेल, तुमच्यापैकी कित्येकांना परदेशांस जाण्याचीही संधी लाभेल.

कला-साहित्याशी आपला संबंध असेल तर त्यामध्येही तुमचा आवाज उठू लागेल.

दि. १० ते १२ या कालाची नोंद ठेवा.

तूळ : सध्याचे ग्रहमान अपेक्षेप्रमाणे चांगले नसले तरी मंगळ तुमच्या राशीतून निघून गेला हे काय कमी आहे?

आता हरवलेले स्वास्थ्य लाभेल. मनातील उद्विग्नता झटकली जाईल. आणि त्यामुळेच हळूहळू प्रगतीकडे पावले पडायला लागतील.

सांपत्तिक अडचणी बऱ्याच प्रमाणांत दूर व्हायला लागतील. वरिष्ठांच्या कृपेने नोकरीधंद्यातील प्रगतीकडे हळूहळू पावले पडायला लागतील.

नवे स्नेहसंबंध जोडले जातील. राजकीय क्षेत्रात भाग घ्यावा असे वाटू लागेल. आता माघार घेण्याचा प्रसंग सहसा येऊ नये.

दि. १०–१२–१३ अपेक्षित यश पदरी पडावे.

वृश्चिक : मंगळाचे तुमच्या राशीत आगमन घडत आहे. आणि साधारणपणे ७ महिने त्याचे तिथेच वास्तव्य घडणार आहे. ही अवस्था शारीरिक, मानसिक ताण वाढविणारी आहे. पण आपल्या व्यवसायधंद्यावर त्याचा मुळीच अनिष्ट परिणाम होणार नाही. उलट या मंगळामुळे निर्धार-निष्ठा उफाळून येईल, अशक्य कामेही शक्य होतील.

शेती, धान्योत्पादन, खते या व्यवसायांत तर नेत्रदीपक यश मिळू शकेल. अनेक मार्गांनी हाती खूप पैसा येईल.

विज्ञान-संशोधन क्षेत्रांतील व्यक्तींनाही या कालासारखा सर्वांगाने अनुकूल काल यापूर्वी क्वचितच अनुभवण्यास मिळाला असेल.

दि. १०–१२–१४ विशेष यश देणारा काल.

धनु : व्ययातील मंगळामुळे थोडेफार खटकल्याशिवाय राहणार नाही. पराक्रमस्थ सूर्य हे एकच आशास्थान. शिकस्तीचा प्रयत्न केलात तर नोकरीधंद्यात अपेक्षित यश पदरी पडावे.

या आठवड्यात धावपळ-धडपड फारच करावी लागेल. प्रवास घडेल. अवघड जबाबदाऱ्या उचलाव्या लागतील, स्थावराच्या समस्या सुटण्याची लक्षणे दिसू लागतील. सांपत्तिक ताण सतत कित्येक दिवस सहन करावा लागेल. या वेळी आपल्या कार्यक्रमाचे वेळापत्रक बदलावे लागेल.

दि. १२–१३–१४ थोडेफार अनुकूल दिवस.

**मकर :** कित्येक दिवसांपासून आपणांस गुरू अनुकूल आहेच. आता मंगळही एकादशात आलेला आहे. ग्रहांचा हवा तसा कौल मिळालेला आहे. थोडचा प्रयत्नानही अनन्यसाधारण यश मिळवू शकाल.

कलाक्षेत्रात, यांत्रिक व्यवसायात, व्यापारधंद्यातही या वेळी आपणांस असे काही यश मिळेल की, सारे जग तुमच्याकडे आदराने पाहू लागेल.

पण ही आत्यंतिक प्रगतीची अवस्था थोडा काल आहे. शनी चौथा आला की, तुमच्या प्रगतीला आळा बसू लागेल. यासाठी जे जे काही करायचे असेल ते ते आताच करा. दि. १० ते १३ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**कुंभ :** अशक्य वाटणारी, न होणारी कामे यशस्वी केल्याने तुमच्यातील सुप्त कर्तृत्वाचे जगाला दर्शन घडेल. मंगळ दशमात आलेला असल्यामुळे आपण आता काहीही करायचे ठरविलेत तरी त्यांत घवघवीत यश लाभल.


साहित्य–संशोधन, सामाजिक–सांस्कृतिक कार्य या बाबतींत तुमचे स्थान निश्चितच उंचावेल. कित्येक दिवसांनी इतका चांगला काल तुमच्या वाट्यास येत आहे. प्रगतीचे नवे क्षेत्र दृष्टिक्षेपात येईल, आपल्या नव्या व्यवसायधंद्याला धनिकांचे हार्दिक सहकार्य लाभेल. प्रवास वरचेवर घडेल.

दि. ११–१२–१३ या कालावर लक्ष केंद्रित करा.


**मीन :** मंगळ भाग्यस्थानी आलेला आहे आणि दीर्घकाल तिथेच त्याचे वास्तव्य घडणार. मंगळाचे एवढे सहकार्य फक्त तुम्हांलाच लाभणार आहे. बदली–बढतीचे योग दृष्टिक्षपात येतील. तुम्हांपैकी कित्येकांना परदेशांस जाण्याची संधी लाभेल.

आकर्षक–अभिनव असे काही उत्स्फूर्त लेखन हातून घडेल आणि त्यामुळे तुमचे साहित्याच्या क्षेत्रातील स्थान एकदम उंचावेल.

या काळी तुमच्या कर्तृत्वाला दाही दिशा अपूर्ण वाटू लागतील. सांपत्तिक लाभही मोठे होतील. दि. १०–१२–१४ अत्युत्तम काल. ○



# दोन किंवा तीन मुले पुरेत



कुटुंब नियोजन केंद्राची खूण लाल त्रिकोण

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H–649

# व्होल्गा जेव्हा लाल होते

| लेखक | प्रस्तावना | मूल्य |
| --- | --- | --- |
| वि. स. वाळिंबे | ना. ग. गोरे | अठरा रुपये |

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव पेठ, पुणे २

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., १७–ब, कोथरूड, पुणे ४ येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे, येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**